जून २०१९/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



# मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम - २०१९

CMF

महाराष्ट्र शासन



"उद्याचा महाराष्ट्र घडविण्यात माझ्यासोबत सहभागी व्हा!"

**श्री देवेंद्र फडणवीस**
मा. मुख्यमंत्री

## युवकांसाठी प्रशासनात सहभागी होण्याची व राज्याच्या विकासाला हातभार लावण्याची संधी.

**२१ ते २६ वयोगटातील** किमान एक वर्षाचा अनुभव असलेल्या **प्रथम वर्ग पदवीधर युवकांचे** या ११ महिन्याच्या फेलोशिप कार्यक्रमामध्ये स्वागत आहे.

**अर्ज करण्याचा अंतिम दिनांक**
**जून १४, २०१९**

अधिक तपशीलासाठी : https://mahades.maharashtra.gov.in
हेल्पलाईन क्रमांक : ७०३०९ २४३३३ / ०२२ ४९२९ ५११८

# अंतरंग



## जनतेचा कौल खंबीर नेतृत्वाला! ६

कधी काळी तिसऱ्या जगाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भारताची महासत्ता होण्यासाठी दमदार वाटचाल श्री. नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखाली पाच वर्षांपूर्वी सुरू झाली. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीतील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अभूतपूर्व विजय हा श्री. मोदीजींच्या नेतृत्वाखालील विकासयात्रा भविष्यात कायम ठेवण्याची राष्ट्रभावना व्यक्त करणारा आहे.

**जननायक** ८ | **नवभारताची निर्मिती** १० | **पहिले पर्व, अप्रतिम प्रगती...** १२



## संवाद साधणारा सेतू १९

संवाद सेतूच्या माध्यमातून आलेल्या ४ हजार ४५१ तक्रारींपैकी दुष्काळाशी प्रत्यक्ष संबंधित २ हजार ३५९ तक्रारीचे निराकरण करण्यात येत आहे. या प्रत्येक तक्रारीचे निवारण करण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धती अवलंबण्यात आली आहे. मुख्यमंत्री कार्यालयात या प्रत्येक तक्रारीच्या निवारणासाठी पाठपुरावा करण्याची यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.

## सामना दुष्काळाशी १९-४०

१५१ पूर्ण तालुक्यातील १७ हजार ९८५ गावे, २६८ महसुली मंडळांतील ५०९० गावे, तसेच ५० पेक्षा कमी पैसेवारी असलेली ५४४९ गावे अशा एकूण २८ हजार ५२४ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या दुष्काळावर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज आणि सक्रिय झाले आहे.

## शिक्षण सुविधा, निर्वाहभत्ता, शुल्क प्रतिपूर्ती, शिष्यवृत्ती ४२-५८

राज्य शासन आणि केंद्र शासनामार्फत वेगवेगळ्या संवर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षणाच्या सुविधा सुलभतेने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विविध योजना राबवण्यात येतात. यामध्ये शिष्यवृत्ती, फेलोशीप, निर्वाहभत्ता, परदेशातील शिक्षणाच्या सुविधा वसतिगृहे, परीक्षा आणि शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती आदींचा समावेश आहे. या योजनांचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांना प्रगतीची उंच शिखरे गाठणे सहज शक्य आहे.




| | |
|---|---|
| जनतेचा कौल खंबीर नेतृत्वाला! | ६ |
| जननायक | ८ |
| नवभारताची निर्मिती | १० |
| पहिले पर्व, अप्रतिम प्रगती... | १२ |
| संवाद साधणारा सेतू | १९ |
| दखल आणि दिलासा | २२ |
| साहेब, आम्ही आभारी आहोत... | २४ |
| टँकर सुरू झाले... | २५ |
| यंत्रणा सज्ज आणि सक्रिय | २७ |
| जनावरांना चारा आणि पिण्याचे पाणी | ३० |
| उन्हाळ्यातही पाणी... | ३५ |
| पाणी असे मिळेल... | ३६ |
| वेध हवामानाचा | ३८ |
| परदेशातील शिक्षणासाठी संधी | ४२ |
| शिका आणि समर्थ व्हा... | ४८ |
| अशा आहेत राज्यसेवा... | ५४ |
| महाराष्ट्राला पुढे नेणारे अभियान | ५७ |

वर्ष ७० वे | अंक १२ | जून २०१९

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — डॉ. संभाजी खराट
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन — मीनल जोगळेकर
- वितरण — मनीषा पिंगळे, मंगेश वरकड, अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ९३७२२३०३२०
(सकाळी १०.३० ते ५.३० कार्यालयीन कामकाजा दिवशी)

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.



# प्रेरणा आणि ऊर्जा

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशविदेशातील विविध कार्यक्रमांत जनतेशी संवाद साधताना काढलेले हे प्रेरणादायी उद्गार....**

*'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित, दलित व आदिवासींची सेवा करण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. विकासाच्या प्रवासात मागे पडलेल्या आणि टाकण्यात आलेल्या समुदायांमध्ये आता एक चेतना जागृत झाली आहे. ते आता विकासासाठी आणि त्यांच्या अधिकारांसाठी प्रयत्न करीत आहेत. ही चेतना बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली भेट आहे.'*

(१४ मार्च २०१८, छत्तिसगडमध्ये आयुष्मान भारत योजनेच्या शुभारंभप्रसंगी)

*'चांगले शिक्षण, परवडणारी घरे आणि उत्तम पायाभूत सुविधा या देशातील मध्यम वर्गाच्या आकांक्षा आहेत. त्यांना जीवन सुलभता अपेक्षित आहे, जी देण्यात आम्ही कटिबद्ध आहोत.'*

(७ फेब्रुवारी २०१८, लोकसभा)

*'आज भारत हा जगातील सर्वात युवा देश आहे. तरुणांची अनेक स्वप्नं आहेत, आकांक्षा आहेत. त्यांची ऊर्जा त्यांना योग्य ठिकाणी वापरता यावी, त्यांना स्वत:च्या जोरावर रोजगार कमावता यावा या दिशेने सरकार सतत प्रयत्न करत आहे.'*

(९ जानेवारी २०१८, प्रवासी संसदीय परिषद )

*'भारत सध्या वेगाने बदलत आहे. पूर्वी कधीच नव्हते एवढ्या प्रमाणात आणि वेगाने. एक 'न्यू इंडिया' आकार घेत आहे.'*

(३१ मे २०१८ सिंगापूर येथील एका कार्यक्रमात).

*'देशाच्या युवावर्गाच्या जीवनात खेळाला विशेष स्थान असले पाहिजे. खेळ हा व्यक्तिमत्त्व विकासाचे खूप चांगले माध्यम आहे.'*

(३१ जानेवारी २०१८, खेलो इंडिया स्कूल गेम्सच्या शुभारंभावेळी)

*'आपल्या विद्यापीठांनी पारंपरिक शिक्षण पद्धतीकडून नावीन्यपूर्ण शिक्षणाकडे वळले पाहिजे.'*

(१४ ऑक्टोबर २०१७, पाटणा विद्यापीठाचा शतक महोत्सवी समारंभ)




**चंद्रकांत (दादा) पाटील**
मंत्री, महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), कृषी, फलोत्पादन

# नव्या पर्वाचा प्रारंभ

देशाच्या प्रधानमंत्रिपदी श्री. नरेंद्र मोदीजी दुसऱ्यांदा विराजमान झाले आहेत. जनतेने प्रचंड बहुमताने त्यांच्या गळ्यात विजयश्रीची माळ टाकली. भारतीय जनतेच्या आशाआकांक्षांचे मोदीजी प्रतीक ठरले आहेत. 'मोदीजी आहेत तर, सर्व गोष्टी शक्य आहेत', हा विश्वास नागरिकांनी मतपेटीतून व्यक्त केला आहे. 'सगळ्यांची सोबत, सर्वांचा विकास', हे सूत्र अंगीकारून मोदीजींनी गेल्या पाच वर्षांत भारतामध्ये नवे चैतन्य निर्माण केले. प्रत्येक घटकाचा विकास समानपणे करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. त्यामुळेच भारतीय नागरिकांनी पुन्हा एकदा त्यांच्यावर प्रचंड विश्वास दाखवला आहे.

मोदीजींनी भारताला जगातील सर्वश्रेष्ठ, सर्वोत्तम आणि सामर्थ्यशाली राष्ट्र बनवण्याचे स्वप्न बघितले आहे. त्यासाठी ते अथक व अविश्रांत परिश्रम करत आहेत. गेल्या पाच वर्षांत त्यांनी एकदाही सुट्टी घेतली नाही. सतत आणि सदैव देशहिताला सर्वोच्च प्राधान्य ते देत असतात. ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान यांची सांगड घालून त्यांनी भारताला 'डिजिटल युगात' समर्थपणे आणले आहे. तरुणांच्या मनातले जाणणारा हा नेता. त्यांना रोजगार-स्वयंरोजगाराच्या विविधांगी संधी मिळाव्यात म्हणून मुद्रा, स्टार्टअप योजनांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले. 'काम मागू नका, तर काम देणारे व्हा' हा त्यांचा मूलमंत्र भारतीय तरुणांचे आत्मबळ आणि आत्मविश्वास वृद्धिंगत करणारा ठरला आहे.

आपल्या देशाच्या लोकसंख्येच्या ५० टक्के भाग असलेल्या महिला ह्या त्यांच्यासाठी मातृशक्ती आहेत. म्हणूनच महिलांना दिलासा देणाऱ्या आणि त्यांच्या आत्मसन्मानात वाढ करणाऱ्या स्वच्छता अभियान, सौभाग्य योजना, उज्ज्वला योजना, बेटी बचाओ-बेटी पढाओ अशा योजनांनी महिलांच्या आकांक्षांना नवे पंख दिले आहेत. मोदीजींनी महाराष्ट्राच्या विकासाकडेही पूर्ण लक्ष दिले आहे. नागपूर, मुंबई-पुणे येथे सुरू असणारे मेट्रो प्रकल्प, राष्ट्रीय महामार्गाचे विविध प्रकल्प, शेतकऱ्यांना विविध प्रकारे मदत, राज्यात आयआयआयटी, आयआयएम्स यांसारख्या केंद्रीय शिक्षण संस्थांची स्थापना अशा कितीतरी योजना महाराष्ट्रात कार्यान्वित झाल्या आहेत. मोदीजींच्या स्वप्नातील 'नवभारताच्या निर्मितीत' महाराष्ट्र महत्त्वाचा आणि मोठा सहभाग देण्यास सज्ज झाला आहे.




गेल्या दोन-तीन वर्षांपासून महाराष्ट्रात समाधानकारक पाऊस पडला नाही. त्यामुळे यंदा दुष्काळ आणि टंचाईची तीव्रता वाढलेली आहे. नदी-नाले-विहिरी कोरड्या झाल्या आहेत. पिण्याचे पाणी, गुरांना चारा, रोजगार हमी योजनेतील कामे उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या सर्व भागातील सरपंचांशी प्रत्यक्ष बोलून त्यांच्या समस्या, अडचणी आणि प्रश्न समजून घेतले आहेत. या समस्या तातडीने सोडवण्यासाठी त्यांनी सर्व संबंधितांना निर्देश दिले आहेत. टंचाई व दुष्काळी परिस्थितीशी सामना करण्यासाठी राज्य शासन आपली सर्व शक्ती प्रभावीरीत्या वापरणार आहे. टंचाई कामासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. केंद्र सरकारने महाराष्ट्राला या परिस्थितीशी यशस्वीपणे सामना करता यावा म्हणून अधिकाधिक निधी द्यावा, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

या कठीण परिस्थितीत शेतकरी, सामान्य नागरिक, पशुपालक व त्यांची जनावरे यांना सर्व प्रकारचा दिलासा देण्यासाठी पुढील काळात सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार आहे. या संकटाची तीव्रता आपण सर्वजण एकत्रितरीत्या, सामूहिक जबाबदारीने कमी करू शकतो.

लोकराज्यच्या जूनच्या अंकात टंचाई निवारणार्थ राज्य शासनामार्फत ज्या विविध उपाययोजना करण्यात येत आहेत, त्याचा विस्तृत आढावा घेण्यात आला आहे.

दहावी आणि बारावीचे निकाल आता लागले आहेत. या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींचे मन:पूर्वक अभिनंदन. जी मुले अनुत्तीर्ण झाली आहेत त्यांनी अजिबात निराश होण्याची गरज नाही. अधिक जोमाने आणि उत्साहाने प्रयत्न करून ते या परीक्षा व पुढील परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतात. या अंकात आम्ही शासनामार्फत विद्यार्थ्यांच्या हितासाठी ज्या वेगवेगळ्या शैक्षणिक योजना राबवण्यात येतात त्याची माहिती समाविष्ट केली आहे. हा अंक आपणास आवडेल अशी खात्री आहे.

**चंद्रकांत (दादा) पाटील**
अतिथी संपादक

# जनतेचा कौल खंबीर नेतृत्वाला!

**देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

कधी काळी तिसऱ्या जगाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भारताची महासत्ता होण्यासाठी दमदार वाटचाल श्री. नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखाली पाच वर्षांपूर्वी सुरू झाली. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीतील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अभूतपूर्व विजय हा श्री. मोदीजींच्या नेतृत्वाखालील विकासयात्रा भविष्यात कायम ठेवण्याचीच राष्ट्रभावना व्यक्त करणारा आहे. त्यासोबतच तो देशातील सर्व समाजघटकांच्या विकासाशी खरीखुरी बांधिलकी जोपासणाऱ्या सरकारचे प्रयत्न आणि विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब करणाराही आहे. त्यामुळे त्याचे साऱ्यांनी खुल्या दिलाने स्वागत करायलाच हवे.

## मतदारांनी जोपासले राष्ट्रभान

यावेळच्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी जोपासलेले राष्ट्रभान ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. देशाला विकासाच्या मार्गावर जायचे असेल तर बहुमताचे सरकार हवे, देशाच्या सीमा सुरक्षित हव्या असतील तर दूरदृष्टीने निर्णय घेणारे खंबीर नेतृत्व हवे आणि देशाला जगात सन्मानाने ताठ मानेने उभे राहायचे असेल तर एक मजबूत सरकार हवे हे ओळखून देशातील जनतेने आपला कौल दिला आहे. मजबूत सरकार आणि खंबीर नेतृत्वाच्या बळावर देश विकासाचा एक नवा अध्याय रचेल, यामध्ये आता कोणालाही शंका नाही.

देशातील जनता विकासाच्या बाजूने उभी आहे, हे सार्वत्रिक निवडणुकांच्या निकालांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. त्यासोबतच जात, धर्म, पंथ, वर्ग आणि प्रादेशिकतेच्या अस्मितांपेक्षाही राष्ट्र आणि राष्ट्रहिताचा विचार सर्वाधिक महत्त्वाचा असल्याचेही देशातील मतदारांनी एकमताने सिद्ध केले आहे. सर्वांगीण विकास आणि राष्ट्रभक्तीने प्रेरित झालेल्या जनतेने महासत्ता होऊ पाहणाऱ्या देशाला एक मजबूत सरकार देण्यासाठीच मत दिले, हे या निकालांनी स्पष्ट केले आहे. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने केलेल्या स्वच्छ, स्पष्ट, निर्मळ कारभाराला जनतेने दणदणीत कौल देऊन देश आता भ्रष्टाचाराविरोधात एकमुखाने उभा असल्याचे स्पष्ट केले आहे.

## प्रधानसेवकास पोचपावती

श्री. मोदीजी यांनी गेली पाच वर्षे स्वत:ला प्रधानसेवक या नात्याने देशसेवेत समर्पित होऊन केलेल्या कामाची ही पोचपावती आहे. त्यांनी केलेल्या कामावर जनतेने दाखवलेला विश्वास म्हणजे हा विजय आहे. देशात राजकीय स्थिरता आणि विकासाच्या मार्गावरून सुरू असलेला प्रवास अधिक गतीने व्हावा यासाठी जनतेने दिलेला हा कौल केवळ सकारात्मकच नाही तर देशाच्या एकूणच राजकारणाला राष्ट्रकारणाकडे नेणारा आहे. त्यामुळेच हा विजय ऐतिहासिक असून, इतिहासाचे हे सुवर्णपान लिहिण्याची कर्तबगारी सर्वार्थाने नरेंद्र मोदीजी यांची आहे. या विजयाबद्दल मी महाराष्ट्रातर्फे श्री. मोदीजींचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. या इतिहासाचे शिल्पकार असणाऱ्या आमच्या मतदारांचेसुद्धा आभार आणि अभिनंदन!

## बार बार-मोदी सरकार

लोकसभा निवडणूक जाहीर झाली, तेव्हा लोकांमधूनच आवाज आला होता तो म्हणजे 'फिर एक बार मोदी सरकार', नव्हे तर 'बार बार-मोदी सरकार'. देशाचा चेहराच नव्हे, तर जागतिक पातळीवर नवी प्रतिमा निर्माण करणारी अभियाने, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करणारे प्रकल्प, देश जोडणारे महामार्गाचे जाळे, निरामयी आरोग्याची हमी, घराघरात पोहोचलेली वीज, चुलीचा धूर दूर करणारे गॅस कनेक्शन्स अशी अनेक विकासकामांची पोचपावतीच जणू मतदारांनी दिली आहे. शौचालय केवळ स्वच्छ भारत मिशनचा भाग नाही तर तो महिलांच्या सन्मानाचाही भाग आहे. त्यामुळे जनतेनेही कौल देताना कोणताही आडपडदा ठेवला नाही. प्रधानमंत्री निवडण्यासाठीच त्यांनी मतदान केले आणि त्याचा परिणाम देशातील लोकशाही प्रबळ आणि समृद्ध होण्यात झाला आहे.


## सकारात्मकतेला प्राधान्य

लोकांनी नकारात्मकतेला कोणतेही स्थान ठेवले नाही. स्वच्छ भारत अभियान असो, प्रधानमंत्री आवास योजना, मुद्रा, उज्ज्वला, उजाला अशा कितीतरी योजनांतून जवळजवळ ३० कोटी लोक प्रत्यक्ष लाभान्वित झाले. प्रत्यक्ष लाभ दिल्याने थेट खात्यात पैसे, त्यामुळे मध्यस्थाची यंत्रणा पूर्णत: संपली आणि हेच परिवर्तन स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतर प्रथमच या देशातील जनता अनुभवत होती. सार्वत्रिक निवडणुकीतील निकाल हा त्याचा परिपाक आहे. परिवर्तन घडून येऊ शकते, हे श्री. मोदी यांनी सिद्ध केले. हा जनादेश या सिद्धतेची सिद्धी आहे.

## मनस्वी समाधान

महाराष्ट्रातील जनादेशही याच राष्ट्रभावनेच्या आविष्कारात अग्रेसर राहिल्याचे एक मनस्वी समाधान आहे. केंद्र सरकारने दाखवलेल्या जनविकासाच्या मार्गावरच राज्य सरकारही कार्यरत आहे. मतदारांनी जो भक्कम विश्वास दाखवला, त्याला सार्थ ठरवण्याचे काम येणाऱ्या काळात सुद्धा केंद्रातील आणि राज्यातील सरकार करेल, हा विश्वास यानिमित्ताने देतो. लोकशाहीच्या मंदिरात प्रवेश करणाऱ्या सर्व नवोदित खासदारांचे सुद्धा खूप खूप अभिनंदन. नवभारताच्या निर्मितीतील या प्रवासात प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. पक्ष कोणताही असो, आपले ध्येय एकच असले पाहिजे...

*परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रं, समर्था भवत्वाशिषा ते भृशम्...*



**सुधीर पाठक**

भारताचे प्रधानमंत्री म्हणून श्री नरेंद्र मोदी यांनी पुन्हा दुसऱ्या वेळी ३० मे २०१९ रोजी शपथ घेतली. दुसऱ्यांदा सत्तासोपनापर्यंतचा त्यांचा प्रवास अतिशय प्रभावी झाला आहे. जननायक म्हणून नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व आता खणखणितपणे सिद्ध झाले आहे. प्रधानमंत्रीपदाची एक टर्म संपली की दुसऱ्यांदा त्या पदावर येण्याची शक्यता खूप कमी असते. स्वातंत्र्य मिळाल्यावर ५२ ते ६२ या तीन निवडणुकांत जवाहरलाल नेहरू प्रधानमंत्री झाले होते. त्यानंतर १९६७ व १९७१ या दोन निवडणुकांनंतर इंदिराजी प्रधानमंत्री झाल्या होत्या. त्यानंतर हा सन्मान नरेंद्र मोदी यांना मिळाला आहे. नाही म्हणायला २००४ व २००९ या निवडणुकांनंतर डॉ. मनमोहनसिंग हे संपुआचे प्रधानमंत्री झाले होते. पण त्यांच्या करिष्म्यावर निवडणुका जिंकल्या गेल्या नव्हत्या. मात्र वरील तीन प्रधानमंत्र्यांनी स्वबळावर पक्षाला विजय मिळवून देत प्रधानमंत्रीपद भूषवले होते.

### नेतृत्व गुण

२०१४ व २०१९ या दोन्ही निवडणुका नरेंद्र मोदी यांना प्रधानमंत्रीपदी ठेवून झाल्या होत्या. तसा कौल जनतेने दिला होता. पं. जवाहरलाल नेहरू व इंदिराजी यांना एक कौटुंबिक पार्श्वभूमी होती. तसे मोदीजींबाबत नव्हते. तरी त्यांना हे कसे साधले याचे उत्तर मला स्वत:ला तरी वाटते की त्यांच्या संघप्रचारक, स्वयंसेवक असण्यात दडलेले आहे. संघाचा प्रचारक जेव्हा कामाला बाहेर पडतो तेव्हा त्याला उद्दिष्ट तेवढे सांगितले असते. ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणता मार्ग चोखाळायचा, कोणत्या मार्गाने कशी वाटचाल करायची हे सर्वस्वी त्याच्या प्रतिभेवर सोडलेले असते. तोच मार्ग शोधतो, साधनसामग्री जोडतो, माणसांना जोडतो, उद्दिष्टप्राप्ती करतो. त्याला नंतर नवीन जबाबदारी दिली जाते वा नवीन दायित्व दिले जाते तेव्हा तो त्या कामावर जातो. मूळ ठिकाणी जोडलेली त्याची जोडलेली म ाणसं, संपर्क कायम असतो. पण तो त्या भागातून, कामातून पूर्णत: अलिप्त झाला असतो. तसेच मोदीजींचे झाले. ते गुजरातमध्ये भाजपा

**सामान्यातील सामान्य व्यक्तीशी जोडले जाणे हेच अधिष्ठान असणारे मोदी आजच्या राजकारणात आगळेवेगळे आहेत. हे आगळेवेगळेपणच त्यांच्या यशाचे रहस्य आहे. त्यांनी दुसऱ्यांदा मिळवलेल्या प्रचंड यशाचे रहस्य या सामान्य माणसाशी जोडले जाण्यात दडलेले आहे. जोवर त्यांच्या चिंतनाचा हा आधार कायम राहील तोवर 'हर हर मोदी, घर घर मोदी' हा नारा, जयघोष गुंजत राहील यात तिळमात्रही शंका नाही.**

# जननायक



संघटन प्रमुख होते. नंतर हिमाचल प्रदेशात गेले. पुन्हा गुजरातेत आले. अचानक निवडणुकीच्या राजकारणात उतरण्याचा आदेश झाला तेव्हा आमदार झाले व लगोलग मुख्यमंत्री झाले. बघता बघता ४ टर्म ते गुजरातचे मुख्यमंत्री होते. नंतर केंद्राची जबाबदारी त्यांच्यावर आली. गुजरातमध्ये विनाकारण हस्तक्षेप केला नाही. केंद्रातील आपले दायित्व पार पाडत आहेत. आता दुसऱ्यांदा ते प्रचंड बहुमताने सत्तेत आले. हे यश फक्त मोदींच्या नेतृत्वगुणाला मिळाले होते.

पहिल्यांदा प्रधानमंत्री झाले तेव्हा परराष्ट्राचा त्यांचा अभ्यास नव्हता. पण स्वत:च्या शपथविधीपासून जागतिक राजकारणावर त्यांनी आपला प्रभाव पाडणे सुरू केले. आपल्या शपथविधीला सार्क देशांच्या नेत्यांना आमंत्रित केले. त्यात पाकचे तत्कालीन प्रधानमंत्री नवाज शरीफ यांचाही समावेश होता. एखाद्याशी अनौपचारिक संबंध कसे प्रस्थापित करायचे याचे मोदी आदर्श ठरलेत. नवाज शरीफ यांच्या मातोश्रींना शाल भेट देणे, नंतर त्यांच्या वाढदिवसाला थेट पाकिस्तानात जाणे, त्यांच्या विमानातून लाहोरला जाणे (सामान्यत: एका देशाचा प्रमुख हा दुसऱ्या प्रमुखाच्या विमानातून जात नाही), या सगळ्यातून त्यांनी संबंधांची नवीन गणितं प्रस्थापित केलीत.

गुजरातचे मुख्यमंत्री असताना ज्या मोदींना अमेरिकेने व्हिसा नाकारला होता, त्याच अमेरिकेत ते दिमाखाने गेले. संपूर्ण ५ वर्षात इतके परदेश दौरे केलेत की, माध्यमांनी त्यावर कार्टून्स तयार करणे सुरू केले. पण या प्रवासामुळेच त्यांनी भारताला जागतिक व्यासपीठावर सन्मान मिळवून दिला. मैत्रीचे नवीन मापदंड प्रस्थापित करीत असतानाच वाद निर्माण झाले तेव्हा त्यालाही आपल्या शैलीत उत्तर दिले. चीनबरोबरचा डोकलामचा प्रश्न असो की म्यानमारमध्ये जाऊन कारवाई असो व सत्ता परिवर्तनानंतर पाकला धडा शिकवणे असो त्यातून मोदीपण अधोरेखित झाले. पाकने कुरापती वाढवल्या तेव्हा उरी येथे सर्जिकल स्ट्राईक केला. पुलवामा झाले त्यानंतर भारत पुन्हा सर्जिकल स्ट्राईक करेल अशी पाकची अपेक्षा होती. पाकने सीमेवर टँक वगैरे आणून ठेवले तर त्या वेळी भारताने एअर स्ट्राईक करून बालाकोटचे अतिरेकी अड्डे उद्ध्वस्त केले. पाकमधील एकाही नागरिकाला धक्का न लावता हे अतिरेकी तळ उद्ध्वस्त झाले. विंग कमांडर अभिनंदन याला पाकने युद्धकैदी केले तेव्हा मोदींनी इतका जागतिक दबाव वाढवला की, एक दिवसातच पाकने अभिनंदन यांची मुक्तता केली. मोदींचा मैत्रभावही पाकने अनुभवला आणि संतापही अनुभवला. २०१९ ला शपथ घेताना त्यांनी पाकला साधे निमंत्रण धाडले नाही.

## स्वच्छ चारित्र्य

अत्यंत स्वच्छ चारित्र्य, निरलस सेवावृत्ती, सदैव कार्यरत असणे, भ्रष्टाचाराला, जवळपासही फिरू न देणे ही मोदींची वैशिष्ट्ये राहिली. त्यांनी आपल्या कुटुंबातील भाऊ, आई यांची भेट घेतली. पण त्यांना प्रधानमंत्री निवासात कधीही आमंत्रित केले नाही. त्यामुळे ते भाई-भतिजावाद करतात असा आरोप कुणालाही करता येत नाही. राफेल विमान खरेदी प्रकरणात मोदींचा हात आहे, त्यांनी गैरव्यवहार केला असे आरोप निवडणूक काळात झालेत. पण मोदी इतके स्वच्छ होते की जनतेने त्यावर विश्वास ठेवला नाही. सर्वोच्च न्यायालयानेही मोदींना क्लीन चिट दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचा चुकीचा अन्वयार्थ लावल्यामुळे काही जणांना माफीनामा सादर करावा लागला.

## खंबीर व्यक्तिमत्त्व

मोदी यांचे वैशिष्ट्य आहे की, त्यांच्यावर जे टीकेचे दगड फेकले जात, तेच वेचून त्या आधारावर ते खंबीर उभे राहतात व संकटाचे पहाड लीलया पार करून जातात. गेल्या ७० वर्षात भारतात काही संस्था-घटनात्मक संस्था म्हणून विकसित व प्रस्थापित झाल्या आहेत. त्यातील एक सर्वोच्च न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालयातील ४ ज्येष्ठ न्यायाधीशांनी पत्रपरिषद घेऊन मुख्य न्यायाधीशांवर आरोप केले. सर्वांना वाटत होते की, मोदी आता त्या न्यायाधीशांना त्यांची जागा दाखवतील. पण मोदींनी त्या विषयात लक्ष घातले नाही. वेळ आली त्या वेळी त्या पत्रपरिषद घेणाऱ्या एका न्यायाधीशांची सरन्यायाधीश म्हणून पदोन्नती केली. अशीच दुसरी संस्था रिझर्व्ह बँक. रिझर्व्ह बँकेची स्वायत्तता मोडीत निघाली अशी टीका मोदींनी सहन केली. पण कुठेही ढवळाढवळ केली नाही. गव्हर्नर रघुराम राजन यांचा राजीनामा मंजूर केला. त्यानंतर ऊर्जित पटेल यांना राजीनामा द्यायचा होता. तो मंजूर केला. निवडणूक आयोगावरही विरोधकांनी टीका केली. त्यांच्या हेतूबाबत तसेच ईव्हीएमबाबत शंका घेतली. वास्तविक ईव्हीएम हे काही मोदी काळात आले नव्हते. पण विरोधकांच्या टीकेने त्यांच्या पायाला तिळमात्रही कंप सुटला नाही. संरक्षण दलाबाबत विरोधकांनी शंका घेतली त्या वेळी मोदी सैन्यदलाबाबत ठाम राहिलेत. एकेक स्वायत्त संस्था उद्ध्वस्त करण्याचे विरोधकांचे आरोप त्यांनी झेलले. प्रत्यक्षात त्यांची स्वायत्तता कायम राखली. सीबीआय प्रमुख प्रकरणीही त्यांनी आरोप झेललेत. पण जरूर तेव्हा हस्तक्षेप केला. त्यामुळे त्यांची प्रतिमा विरोधकांच्या टीकेला फारशी किंमत न देणारे व्यक्तिमत्त्व अशी झाली आहे.

## सामान्य माणसाला प्राधान्य

सामान्य माणूस हे त्यांच्या जीवनाचे मूळ अधिष्ठान राहिले आहे. त्यामुळेच ते उज्ज्वला गॅस योजना घराघरांत पोहोचवू शकले. स्वच्छ भारत अभियानात त्यांचा सहभाग लक्षणीय राहिला. घराघरांतून शौचालय बांधणी झाली. आरक्षणाच्या प्रश्नावरही मोदी त्यामुळेच ठाम राहिले. त्यांनीच सामान्य जनतेला सबसिडी त्याग करण्याचे आवाहन केले. त्यामुळे अनेकांनी गॅस सबसिडी सोडली. अनेक ज्येष्ठ नागरिक रेल्वे प्रवासातही सवलत घेत नाहीत. व्यवस्थेत सामान्य माणसाच्या हिताचे बदल केलेत. पूर्वी राजपत्रित अधिकाऱ्याची सही सत्यप्रतीवर मिळविणे हे दिव्य होते. मोदींनी स्वयंप्रमाणीकरण स्वीकृत केले. पूर्वी बँकेत खाते काढणे हे कठीण काम राहावयाचे. मोदींनी शून्य ठेवीत खाती उघडली. आज सरकारी कार्यालयातून धनादेश मिळत नाही. सरळ खात्यात पैसे जमा होतात. त्यामुळे कुणाचे हात गरम करावे, ओले करावे लागत नाहीत.

**लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.**



**नवभारताच्या उभारणीचे भव्य स्वप्न प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केवळ देशापुढे ठेवलेच नाही तर त्या अनुषंगाने सूत्रबद्धरीत्या भारतीय जनमानसाला त्या मनोभूमिकेत नेले. देशाला पारंपरिक स्थितिशील मानसिकेतून त्यांनी बाहेर काढले. प्रगतीची उंच शिखरे गाठण्याची क्षमता प्रत्येक भारतीयांमध्ये असून, भारत जगातील प्रमुख सामर्थ्यशाली देश बनू शकतो, हा आत्मविश्वास प्रत्येक भारतीयामध्ये आणि विशेषत: तरुणांमध्ये निर्माण करण्यात श्री. मोदी यशस्वी झाले. तरुणांसोबतची ही अशी थेट कनेक्टिव्हिटी विस्मयकारक आहे.**

# नवभारताची निर्मिती

**सुरेश वांदिले**

'परमेश्वराने माझा मेंदूच असा बनवलाय की, मला भव्य आणि मोठ्या गोष्टींचाच अधिक विचार करायला आवडतो', असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नुकतेच एका मुलाखतीत सांगितले. महान नेते असा भव्य विचार करतात आणि त्या विचारांना मूर्त स्वरूप देण्यासाठी अथक आणि अखंड परिश्रम करतात. आपल्या सोबतच्या यंत्रणेला आणि सामूहिक शक्तीलाही कार्यप्रवण करतात. श्री. मोदी यांची ही अपार क्षमता भारताने गेल्या पाच वर्षात अनुभवली आहे.

नवभारताच्या उभारणीचे भव्य स्वप्न त्यांनी केवळ देशापुढे ठेवलेच नाही तर त्या अनुषंगाने सूत्रबद्धरीत्या भारतीय जनमानसाला त्या मनोभूमिकेत नेले. देशाच्या पारंपरिक स्थितिशील मानसिकेतून त्यांनी

बाहेर काढले. प्रगतीची उंच शिखरे गाठण्याची क्षमता प्रत्येक भारतीयांमध्ये असून, भारत जगातील प्रमुख सामर्थ्यशाली देश बनू शकतो, हा आत्मविश्वास प्रत्येक भारतीयामध्ये आणि विशेषत: तरुणांमध्ये निर्माण करण्यात श्री. मोदी यशस्वी झाले आहेत. तरुणांसोबतची ही अशी थेट कनेक्टिव्हिटी विस्मयकारक आहे.

आपला नेता थेट आपल्या मनातले बोलतो, जे बोलतो ते करण्यासाठी मार्ग दाखवतो, या मार्गावरून चालण्यास सक्षम करण्यासाठी बळ देतो, हे आजच्या तरुणाईच्या पक्के मनात ठसले आहे. त्यामुळेच यंदा पाच-साडेपाच कोटीच्या आसपास असणाऱ्या बहुसंख्य नव्या म्हणजेच पहिल्यांदा मतदानाचा अधिकार बजावणाऱ्या तरुणांनी श्री. मोदींमध्ये आपल्या आशा-आकांक्षा-इच्छा यांचे प्रतिबिंब बघितले. दुसऱ्यांदा मतदानाचा अधिकार बजावणाऱ्यांना तरुणांना, 'मोदी नही तो और कौन?' हा प्रश्न पडला होता, अशी महत्त्वाची नोंद ज्येष्ठ पत्रकार बरखा दत्त यांनी करून ठेवली आहे.

## यशाचा मूलमंत्र

आजच्या काळात 'थिंक डिफरंटली' हा यशाचा मूलमंत्र ठरत आहे. प्रधानमंत्रीपदाच्या पहिल्या पर्वात श्री. मोदी यांनी, स्वच्छतेच्या मोहिमेला मनामनात पोहोचवले. स्वच्छतेच्या पारंपरिक आणि मलूल झालेल्या कार्यान्वयन पद्धतीपलीकडे जाऊन त्यांनी आपल्या वेगळ्या शैलीने, स्वच्छतेला 'राष्ट्रीय महाअभियान', करून त्याला प्रचंड ऊर्जा आणि गती दिली. प्रचंड लोकसहभाग मिळवला. स्वातंत्र्योत्तर काळात पहिलांदाच इतका, व्यापक-विस्तृत विचार स्वच्छतेबाबत केला गेला. स्वच्छतेसोबत त्यांनी शौचालये बांधण्याचा, देशातील महिलांसाठी अत्यंत आवश्यक असणारा, जिव्हाळ्याचा व त्यांच्या आत्मसन्मानाचा उपक्रम जोडून स्वच्छता अभियानाद्वारे नवभारताच्या निर्मितीचे पहिले जोमदार पाऊल टाकले.

## मुद्राचे यश

तरुणांसाठी मुद्रा योजनेच्या रूपाने स्वयंरोजगाराची गंगोत्री श्री. मोदी यांनी आणली. या गंगोत्रीचे पात्र दिवसेंदिवस वाढतेच आहे. देशातील अनेक प्रातांतील 'मुद्रा' च्या यशकथा प्रेरणादायी आहेत. अधिकाधिक तरुणी, महिला यांना स्वत:चे आर्थिकदृष्ट्या सक्षम करून घेण्याचा मार्ग मुद्रामुळे उपलब्ध झाला. स्टार्टअप योजनेमुळे महत्त्वाकांक्षी तरुण-तरुणींना उद्योग - व्यवसायाची मोठी स्वप्ने बघून, ही स्वप्ने वास्तवात आणण्याची दिशा मिळाली.

## प्रतिमा उंचावली

आजच्या तरुणाईला आपल्या देशाला सामर्थ्यशाली नेता हवा आहे. जागतिक पातळीवर श्री. मोदी यांनी भारताच्या सामर्थ्याला खणखणीतपणे पोहोचवले व सामर्थ्यशाली राष्ट्राच्या पंक्तीत नेऊन बसवले. बहुतांश आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताला मानाचे आणि महत्त्वाचे स्थान मिळू लागले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची उजळलेली 'स्मार्ट' प्रतिमा ही श्री. मोदींच्या अविरत कष्टाची आणि त्यांच्या नावीन्यपूर्ण कार्यशैलीचे फलित ठरले आहे.

'आंतरराष्ट्रीय योग दिवस' जागतिक स्तरावर सुरू करण्यात त्यांनी मिळवलेले यश हे त्यांच्या दूरदृष्टीचे परिपाक समजायचे. जागतिक पातळीवरील अनेक महत्त्वाच्या सभा-परिषदा-संमेलने यात श्री. मोदी यांनी मांडलेले विचार मूलभूत स्वरूपाचे ठरले. त्याची नोंद जागतिक संस्थांनी घेऊन त्याबद्दल श्री. मोदी यांना गौरवण्यात आले. आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध सन्मान एकापाठोपाठ श्री. मोदी यांना मिळाले. भारताची प्रतिष्ठा आणि प्रतिमा आंतरराष्ट्रीय पातळीवर किती मोठ्या प्रमाणावर उजळली आहे, याचा हा स्वयंसिद्ध पुरावाच होय.

भारताच्या जनमानसाला सामर्थ्यशाली अशा कर्णधाराची आस होती, ती आस श्री. मोदी यांनी पूर्ण करून, प्रत्येक भारतीयाला आत्मविश्वासाने भारून टाकले आहे.

## सुशासन

योजनांची आखणी व योजनांची अंमलबजावणी आणि नागरिकांना प्रत्यक्ष लाभ पोहोचवणे यामध्ये श्री. मोदी यांच्या शैलीतील सुशासनास मिळालेले यश अभूतपूर्व आहे. उज्ज्वला योजना, सौभाग्य योजना, प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना, आयुष्यमान योजना, जनधन योजना, यांचा ठळकपणे येथे उल्लेख करता येईल.

आयुष्यमान योजनेमध्ये २०५ दशलक्ष नागरिकांना लाभ मिळाला. यात महिलांची संख्या लक्षणीय स्वरूपाची आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' ही योजना जनमानसात रुजवण्यात यश आल्याने, मुलींचे शिक्षण आणि अर्भक मृत्युदरात घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

डिजिटल यंत्रणेचा प्रभावी वापर करून, डायरेक्ट बेनिफिशिअरी ट्रान्सफर (डीबीटी) योजनेवर भर दिल्याने विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मिळणाऱ्या अर्थसाहाय्यातील गळती जवळपास थांबली असल्याचे निरीक्षण अर्थतज्ज्ञ श्री. सुरजित भल्ला यांनी नोंदवले आहे. ॲप्स आणि जिओटॅगिंगद्वारे अनेक योजनांचे थेट संनियंत्रण करण्यात येत असल्याने, या योजनांची कामे पारदर्शक व प्रभावीरीत्या होऊ शकली.

## प्रखर राष्ट्रवाद

भारताचा सन्मान, प्रतिष्ठा, सुरक्षा यास सर्वोच्च प्राधान्य देणारा नेता म्हणून श्री. मोदी यांनी मागील पाच वर्षात आपले नेतृत्व सिद्ध केले. कणखरता आणि प्रखर राष्ट्रवादाने प्रत्येक भारतीय रोमांचित झाला आहे. भारताच्या आंतरिक सामर्थ्याची ही ओळख जुन्या पिढीसोबतच नव्या पिढीला करून देण्याचे महत्त्वाचे कार्य श्री. मोदी यांनी केले आहे.

आजच्या डिजिटल युगाची बरोबर नस त्यांनी ओळखली आहे. या युगाशी सर्व साधने देशाच्या प्रगती-विकास-समृद्धीसाठी प्रभावीरीत्या वापरणारा, ही साधने तरुणांना उत्कर्षासाठी उपलब्ध करून देणारा, सदैव नव्या विचारांना प्राधान्य देणारा, सर्व घटकांच्या विकासावर भर देऊन त्यांचा विश्वास संपादन करणारा नेता म्हणून श्री. मोदी यांनी आपली मुद्रा भारतीय जनमानसावर खणखणीतपणे उमटवली आहे.

ही मुद्रा, नव्या भारताच्या निर्मितीचा आविष्कार ठरणारी आहे. नवाभारत हा जागतिक पातळीवरील 'सुपर पॉवर' एकीकडे असेल आणि दुसरीकडे जनसामान्यांना आपल्या जीवनाचा दर्जा-गुणवत्ता वाढवून देणारा आणि सर्वसमावेशकेतेतून सामर्थ्य-प्रगतीच्या नव्या व्याख्या अधोरेखित करणारा ठरेल.

**दयानंद कांबळे / रितेश भुयार**

केंद्र शासनाच्या जनकल्याण योजना व त्यांची गेल्या पाच वर्षात राज्यात झालेली प्रभावी अंमलबजावणी यामुळे विविध क्षेत्रात आघाडीचे राज्य ही महाराष्ट्राची ओळख अधोरेखित झाली आहे. उद्योजकांना प्रोत्साहन देणाऱ्या मुद्रा योजनेंतर्गत राज्यातील उद्योजकांनी घेतलेला लाभ उल्लेखनीय आहे. रस्ते विकास, रेल्वे मार्ग विकास आणि पायाभूत सुविधांमध्ये केंद्र शासनाने राज्याला दिलेला भरभरून निधी व त्याच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राने घेतलेली आघाडी महत्त्वाची ठरते.

उच्च शिक्षण घेणाऱ्यांमध्ये राज्याची देशात असलेली आघाडी, 'स्वच्छ भारत मिशन'अंतर्गत ग्रामीण भागात स्वच्छतागृह उभारणी व 'भारतनेट' योजनेंतर्गत इंटरनेट जोडणीच्या कामातील उल्लेखनीय घौडदौड तसेच, थेट हस्तांतरणाच्या केंद्राच्या योजनेमध्ये राज्याची वाटचाल मोलाची आहे. आधार कार्ड नोंदणीतील आघाडी, जनधन योजनेंतर्गत उघडण्यात आलेली बँक खाती, उज्ज्वला योजनेंतर्गत गॅस जोडणी, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजूर झालेली घरे, आदिवासी कल्याण योजनेत मंजूर निधी यांसह पर्यटन व सिंचन व्यवस्थापनातही आघाडी घेतली आहे.

### दुष्काळनिवारणासाठी ४ हजार ७१४ कोटींची मदत

मागील वर्षी महाराष्ट्रात आलेल्या गंभीर दुष्काळाच्या परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी राज्याने केंद्र शासनाकडे मदतीचा प्रस्ताव पाठवला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व प्रधानमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव यांची भेट घेऊन राज्यातील दुष्काळी परिस्थिती निवारणासाठी राज्याने सादर केलेला मदतनिधी प्रस्ताव लवकर मंजूर करण्याची मागणी केली होती. या पाठपुराव्याला यश आले व या वर्षी जानेवारी महिन्यात केंद्र शासनाकडून राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून दुष्काळ निवारणाच्या कामांसाठी राज्याला ४ हजार ७१४ कोटी २८ लाख रुपयांची मदत दिली.

### बळीराजा जलसंजीवनी योजनेसाठी मदत

महाराष्ट्र शासनाच्या 'बळीराजा जलसंजीवनी' योजनेंतर्गत राज्यातील दुष्काळग्रस्त व शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील जलसिंचन प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून १३ हजार ६५१ कोटींचा निधी मंजूर झाला. विदर्भातील ६, मराठवाड्यातील ५ तर उर्वरित ३ अशा राज्यातील एकूण १४ जिल्ह्यांमधील ९१ जलसिंचन प्रकल्पांचा समावेश असलेल्या या योजनेसाठी मंजूर निधीपैकी केंद्र शासनाकडून ३ हजार ८३१ कोटी

# पहिले पर्व, अप्रतिम प्रगती...



रूपये तर उर्वरित ९ हजार ८२० कोटी नाबार्डकडून कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आला.

### शहरी गरिबांसाठी ७ लाखांहून अधिक घरे मंजूर

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत ही योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत महाराष्ट्राला ७ लाख ३० हजार २२० घरे मंजूर झाली आहेत. केंद्रीय गृह निर्माण व नगर विकास मंत्रालयाच्या केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीच्या फेब्रुवारी महिन्यात झालेल्या बैठकीत महाराष्ट्रातील शहरी गरिबांसाठी १ लाख १ हजार २२० घरे मंजूर करण्यात आली. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने आतापर्यंत देशभरात विविध राज्यांकरिता ७९ लाख ४ हजार ६७४ घरांना मंजुरी दिली आहे.

### २ कोटी ३० लाख ग्राहकांना गॅस अनुदानाचा थेट लाभ

केंद्र शासनाच्या 'पहल' योजनेंतर्गत गेल्या दोन वर्षात महाराष्ट्रातील २ कोटी ३० लाख ९० हजार ७८५ ग्राहकांना लाभ हस्तांतरणाद्वारे (डीबीटी) स्वयंपाकाच्या गॅस अनुदानाचा थेट लाभ झाला असून देशात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो. २०१६ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. डिसेंबर २०१८ अखेर देशातील ३६ राज्य व केंद्रशासित प्रदेशात २५.१७ कोटींपैकी २३.२४ कोटी ग्राहकांच्या आधार कार्डासोबत संलग्न करण्यात आलेल्या नोंदणीकृत बँक खात्यात डिबीटीद्वारे अनुदान हस्तांतरित करण्यात आले आहे.

### प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना

या योजनेंतर्गत महाराष्ट्रात ३९१ प्रधानमंत्री कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रे तर ४३ प्रधानमंत्री कौशल्य केंद्रे उभारण्यात आली आहेत.

केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयांतर्गत कार्यरत राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्यावतीने ही योजना राबवण्यात येत आहे. देशातील प्रत्येक जिल्ह्यात या योजनेच्या माध्यमातून 'आकांक्षी' कौशल्य केंद्र चालवण्यात येतात जी प्रधानमंत्री कौशल्य केंद्र या नावाने ओळखली जातात. देशातील १ कोटी तरुणांना अल्प कालावधीचे प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने या योजनेची अंमलबजावणी सुरू आहे.

या योजनेंतर्गत देशातील २९ राज्य व ७ केंद्रशासित प्रदेशांमध्ये १० हजार ३५५ प्रधानमंत्री कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रे तर ७३८ प्रधानमंत्री कौशल्य केंद्रे उभारण्यात आली आहेत.

### पायाभूत सुविधा प्रकल्प

केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार अहवालानुसार पायाभूत सुविधा निर्माण करण्यात महाराष्ट्र राज्य देशात अव्वल ठरले आहे. राज्यात २८४ पेक्षा अधिक पायाभूत प्रकल्प मंजूर झाले असून, या प्रकल्पांची किंमत १ लाख ४३ हजार ७३६ कोटींच्या पुढे आहे.

या प्रकल्पांमध्ये शासकीय प्रकल्प, सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्प, सार्वजनिक खासगी भागीदारी प्रकल्पांचा समावेश आहे. ५ ते ५० कोटींहून अधिक किंमतीच्या पायाभूत प्रकल्पांचा यात अंतर्भाव आहे. महाराष्ट्रात २०१४-१५ या वर्षात २१ हजार ५७९ कोटी ९१ लाख किमतीचे ९८ प्रकल्प हाती घेण्यात आले. २०१५-१६ या वर्षात ३२ हजार ९७६ कोटी ७३ लाख रुपयांचे ८२ प्रकल्प. २०१६-१७ या वर्षात ६० हजार २७० कोटी ७१ लाख किमतीचे ८२ प्रकल्प तर २०१७-१८ या वर्षात २८ हजार ९०९ कोटी रुपयांचे ४१ पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेण्यात आले.

वर्ष २०१८ च्या पहिल्या तिमाही पर्यंत देशात १५ लाख ८२ हजार कोटी किमतीचे ३४७० पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली, यामध्ये इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक १ लाख ४३ हजार ७३६ कोटी किमतीचे २८४ प्रकल्प हे महाराष्ट्रातील आहेत. गेल्या २८ वर्षात सरासरी वर्षाला ४० पायाभूत सुविधा प्रकल्प राज्यात हाती घेण्यात येत होते, या तुलनेत २०१४ ते २०१८ पर्यंत प्रतिवर्षी ७१ पायाभूत सुविधा प्रकल्प महाराष्ट्रात राबवण्यात आले.

### राष्ट्रीय महामार्गाच्या कामांची घोडदौड

देशात झालेल्या राष्ट्रीय महामार्गांच्या कामांपैकी सर्वात जास्त म्हणजे २६ हजार ८४१ कोटींपेक्षा जास्त व १०७ पेक्षा अधिक कामे महाराष्ट्रात सुरू आहेत. देशातील राज्य व केंद्रशासित प्रदेशांमध्ये राष्ट्रीय महामार्गांची एकूण १ हजार ४७० हून अधिक प्रकल्पांची कामे झाली. या अंतर्गत एकूण ४ लाख ३२ हजार ५३८ कोटी खर्चातून ४४ हजार १०८ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे झाली. सर्वात जास्त १०७ हून अधिक प्रकल्प हे महाराष्ट्रातील आहेत. राज्यात २६ हजार ८४१ कोटी खर्चातून ३ हजार ३२० कि.मी.च्या राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम झाले व यात वाढ होऊन कामे सुरू झाली आहेत.

### नवीकरणीय ऊर्जा

नवीकरणीय ऊर्जेच्या विविध स्रोतांद्वारे डिसेंबर २०१८ पर्यंत देशभरात ७४.७९ गीगा वॅट वीज निर्मिती क्षमता स्थापित करण्यात आली असून महाराष्ट्रात ९ हजार ३००. १८ मेगा वॅट वीज निर्मिती क्षमता स्थापित करण्यात आली आहे.

नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने २०१८-१९ (५ फेब्रुवारी २०१९) पर्यंत राज्यांना नवीकरणीय ऊर्जा स्रोतांद्वारे वीज निर्मिती स्थापित करण्यासाठी केंद्रीय सहायता निधीतून ३ हजार ५८४ कोटी ८ लाखांचा निधी प्रदान केला. देशात डिसेंबर २०१८ पर्यंत सौर ऊर्जेच्या माध्यमातून २५.२१ गीगा वॅट, पवन ऊर्जेच्या माध्यमातून ३५.१४ गीगा वॅट, जैविक ऊर्जेद्वारे ९.९२ गीगा वॅट आणि लघुजल ऊर्जेद्वारे ४.५२ गीगा वॅट अशा एकूण ७४.७९ गीगा वॅट वीज निर्मिती क्षमता स्थापित



करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात डिसेंबर २०१८ पर्यंत सौर ऊर्जेच्या माध्यमातून १६०७.७९ मेगा वॅट , पवन ऊर्जेच्या माध्यमातून ४७८८.१३ मेगा वॅट, जैविक ऊर्जे द्वारे २५२८.६९ मेगा वॅट आणि लघुजल ऊर्जेद्वारे ३७५.५७० मेगा वॅट अशी एकूण ९ हजार ३००.१८ मेगा वॅट वीज निर्मिती क्षमता स्थापित झाली आहे.

## पुणे मेट्रो

पुणे मेट्रो प्रकल्पासाठी एएफडी फ्रांस बँक आणि केंद्र सरकार यांच्यात या वर्षी जानेवारी महिन्यात २ हजार कोटींचा करार झाला. या करारामुळे पुणे मेट्रोकरिता २ हजार कोटींचा निधी कर्जरूपाने उपलब्ध झाला आहे. सध्या मेट्रोचे २७ टक्के काम पूर्ण झाले असून या निधीमुळे कामाला गती येणार आहे. २०१९ या वर्षाअखेर मेट्रोच्या व्यावसायिक परिचलनास सुरुवात तसेच २०२० मध्ये पुणे मेट्रोची १६ कि.मी.ची पहिली लाईन पूर्ण करणे व २०२१ पर्यंत मेट्रोची दुसरी लाईन पूर्ण करण्याचे उद्दिष्टही आता गाठता येईल.

## मुंबई शहर वाहतूक

मुंबई शहर वाहतूक प्रकल्प (एम.यु.टी.पी) टप्पा ३ व टप्पा ३अ साठी एकूण ६५ हजार ७२४ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डिसेंबर २०१६ साली एम.यु.टी.पी. अंतर्गत १०,९४७ कोटी रुपयांच्या कामाचा शुभारंभ केला. यामध्ये पनवेल–कर्जत नवीन उपनगरीय मार्गाच्या कामाचा समावेश आहे,यासाठी २७८२ कोटी रुपये तर ४७६ कोटी रुपयांच्या ऐरोली– कळवा उन्नत मार्गासाठी आहेत. विरार – डहाणू या मार्गाच्या चौपदरीकरण कामासाठी ३५७८ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेल हा जलद उन्नत कॉरिडॉर, विरार–वसई–पनवेल नवीन उपनगरीय कॉरिडॉर, हार्बर मार्गाचा गोरेगाव– बोरिवली असा विस्तार, कल्याण – आसनगाव या मार्गावर चौपदरीकरण तसेच विविध रेल्वे स्टेशनची सुधारणा यासाठी मुंबई शहर वाहतूक प्रकल्पांतर्गत ५४ हजार ७७७ कोटी रुपयांची कामे प्रगतिपथावर आहेत.

## विदर्भातील ५ हजार २३७ घरांना वीज जोडणी

सौभाग्य योजना सुरू झाल्यापासून राज्यातील एकूण २३ जिल्ह्यांतील १९२ खेड्यांना या योजनेंतर्गत वीजजोडणी देण्यात आली. यानुसार विदर्भातील सर्वच ११ जिल्ह्यांतील १४० खेड्यांतील ५ हजार २३७ घरांना वीजजोडणी देण्यात आली आहे. मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातील ४२ खेड्यांतील २ हजार ९३८ घरांना, पश्चिम महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यातील ९ खेड्यांतील ५४२ घरांना वीजजोडणी देण्यात आली आणि खानदेशातील १०३ घरांना वीजजोडणी देण्यात आली.

## ग्रामीण भागात ४५ हजार ११५ विमाधारक

देशातील गरीब जनतेला अत्यल्प दरात अपघात विमा देणाऱ्या 'प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेंतर्गत' आतापर्यंत देशातील उद्दिष्टित १६ हजार ८५० खेड्यांमध्ये २६ लाख ११ हजार ७८७ विमाधारकांची नोंद झाली आहे. तर महाराष्ट्रातील उद्दिष्टित १९२ खेड्यांमध्ये ४५ हजार ११५ विमाधारकांची नोंद झाली आहे.

केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या वतीने 'प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना' १ जून २०१५ पासून सुरू करण्यात आली. योजनेनुसार वार्षिक १२ रुपये इतका प्रीमिअम असून अपघाती मृत्यू झाल्यास विमाधारकाच्या कुटुंबीयांस २ लाख रुपये किंवा अपघातात दुखापत झाल्यास उपचारासाठी १ लाख रुपये देण्यात येतात. बँक खाते असणारी १८ ते ७० वयोगटातील व्यक्ती या योजनेस पात्र ठरते. केंद्रीय पंचायती राज मंत्रालयाच्या ग्रामस्वराज विभागाच्या वतीने या योजनेची अंमलबजाणी सुरू असून, मागास खेड्यांची यासाठी निवड करण्यात आली आहे. आजपर्यंत देशभरातील २७ राज्य व केंद्रशासित प्रदेशातील १६ हजार ८५० खेड्यांमध्ये या योजनेच्या माध्यमातून २६ लाख ११ हजार ७८७ लोकांचा विमा उतरवण्यात आला आहे.

## विदर्भात सर्वात जास्त ३२ हजार ६६८ विमाधारक

प्रधानमंत्री सुरक्षा विमाही योजना राबवण्यासाठी राज्यातील एकूण २३ जिल्ह्यांतील १९२ खेड्यांची निवड करण्यात आली. यानुसार विदर्भातील सर्वच ११ जिल्ह्यांतील १४० खेड्यांतील ३२ हजार ६६८ लोकांचा विमा उतरवण्यात आला. मराठवाड्यातील ७ जिल्ह्यातील ३९ खेड्यांतील ६ हजार ९९२, पश्चिम महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यातील ९ खेड्यांतील २०९७ लोकांना आणि खानदेशातील दोन जिल्ह्यातील ३ हजार ३५८ जणांना विमा सुरक्षा देण्यात आली.

## 'सौभाग्य' योजनेंतर्गत वीज जोडणी



देशातील गोरगरीब जनतेच्या घरात वीज पोहोचवण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या 'प्रधानमंत्री सहज बिजली हर घर–सौभाग्य' योजनेंतर्गत आतापर्यंत १६ हजार ८५० खेड्यांना मोफत वीज जोडण्या देण्यात आल्या. महाराष्ट्रातील १९२ खेड्यांचा यात समावेश असून ८ हजार ८२० घरांना वीज जोडणी देण्यात आली आहे.

केंद्रीय पंचायती राज मंत्रालयाच्या ग्राम स्वराज विभागाच्यावतीने व केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या मदतीने देशातील वीज जोडणीपासून वंचित असलेल्या गोरगरीब जनतेला वीजजोडणी देण्यासाठी ही योजना सप्टेंबर २०१७ मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेनुसार देशातील प्रत्येक खेड्याला वीजजोडणी देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून गेल्या ७ महिन्यांपासून आजपर्यंत देशभरातील २७ राज्य व केंद्रशासित प्रदेशातील १६ हजार ८५० खेड्यांना वीज जोडणी देण्यात आली आहे, ज्याद्वारे ५ लाख १९ हजार ३५८ घरांना जोडणीचा लाभ मिळाला आहे.

## मौलाना आझाद शिष्यवृत्ती

अल्पसंख्याक समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या 'मौलाना आझाद शिष्यवृत्ती' अंतर्गत गेल्या पाच वर्षात

महाराष्ट्रातील २४९ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे.

केंद्रीय अल्पसंख्याक मंत्रालयाच्यावतीने अल्पसंख्याक समाजाच्या गुणवंत मुलामुलींसाठी 'एम.फील व पीएच.डी' या संशोधनात्मक अभ्यासक्रमासाठी २०१४-१५ ते २०१७-१८ या चार वर्षात ३ हजार २४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे.

### 'पढो परदेश'

अल्पसंख्याक समाजातील गुणवान विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक कर्जावर सूट देणाऱ्या केंद्र शासनाच्या 'पढो परदेश' योजनेंतर्गत २०१४ ते २०१७ या कालावधीत महाराष्ट्रातील २३४ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना परदेशात पदव्युत्तर शिक्षण, एम.फील व पीएच.डी हे संशोधनात्मक अभ्यास पूर्ण करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय अल्पसंख्याक मंत्रालयाच्यावतीने योजना सुरू करण्यात आली. या योजनेंतर्गत २०१४-१५ ते २०१६-१७ या कालावधीत देशभरातील ३६ राज्य व केंद्रशासित प्रदेशातील एकूण ३ हजार ६८७ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे.

### १०० गावांमध्ये कृषी कल्याण अभियान

कृषी क्षेत्रातील उत्तमोत्तम प्रयोग व तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून त्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या उद्देशाने १ जून ते ३१ जुलै २०१८ दरम्यान कृषी कल्याण योजना राबवण्यात येत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करण्याचे केंद्र शासनाचे ध्येय असून याचाच एक भाग म्हणून, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्यावतीने देशातील १११ महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये ही योजना राबवण्यात येत आहे. देशातील प्रत्येक महत्त्वाकांक्षी जिल्ह्यातील २५ गावांमध्ये ही योजना राबवण्यात येत असून उस्मानाबाद, नंदूरबार, वाशिम आणि गडचिरोली या जिल्ह्यांमधील प्रत्येकी २५ अशा एकूण १०० गावांमध्ये ही योजना राबवण्यात येत आहे.

### कृषी कल्याण अभियान

या कार्यक्रमासाठी निवड झालेल्या गावांमध्ये कृषी कल्याण अभियानाच्या माध्यमातून शेतीच्या विकासासाठी विविध तंत्रज्ञान, अवजारे, उत्तमोत्तम शेती पद्धती आदींच्या प्रभावी वापराबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हे अभियान राबवण्यासाठी कृषी मंत्रालयाच्या कृषी, सहकार आणि शेतकरी कल्याण, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य विकास, कृषी संशोधन व शिक्षण विभागांनी कृती आराखडा तयार केला आहे. यासाठी स्थानिक कृषी विज्ञान केंद्र समन्वय करीत आहेत. या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी निरीक्षण कक्ष स्थापित करण्यात आला आहे. यासाठी शेती क्षेत्रातील तज्ज्ञांची निवड करण्यात आली आहे.

### प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व

या अभियानांतर्गत असलेल्या संकेतस्थळावर खासगी तसेच सरकारी डॉक्टर यांची नावे नोंदवावी लागतात. या संकेतस्थळावर देशभरातील जवळपास ५००० डॉक्टरांनी नावे नोंदवली आहेत. त्यापैकी महाराष्ट्रातून सर्वाधिक ६०० डॉक्टरांचा समावेश आहे. दर महिन्याच्या ९ तारखेला मातृत्व अभियानांतर्गत डॉक्टर आपल्या सेवा देतात. त्यासाठी महाराष्ट्राला पुरस्कृत करण्यात आले.

महाराष्ट्रात हे अभियान केंद्र शासनाने सुरू करण्याच्या पूर्वी पासून लागू केलेले होते. या अंतर्गत गर्भवती महिलांची सोनोग्राफी करण्यात येते. यासह ॲनिमिया ग्रस्त गर्भवती महिलांना आयर्न इंजेक्शन दिले जाते. याचा सकारात्मक परिणाम महिलांच्या प्रसूती दरम्यान दिसून आला आहे.

### तीन वर्षात ६० लाख शौचालयांची उभारणी

केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालयाच्यावतीने ग्रामीण भागात 'स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)' हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत देशात गेल्या तीन वर्षात ५ कोटींहून अधिक घरगुती

### मुद्रा : मोठ्या प्रमाणात कर्ज वितरण

देशातील असंघटित लघुउद्योगांच्या विकासाकरिता वित्तीय गरजा पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने एप्रिल २०१५ रोजी 'मुद्रा योजना' सुरू केली. या योजनेत महाराष्ट्राची कामगिरी उल्लेखनीय ठरली आहे. गेल्या चार वर्षात राज्यात ४२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज वितरित करण्यात आले. या योजनेंतर्गत ४० हजार कोटींहून अधिक कर्ज वितरित करणाऱ्या देशातील पहिल्या तीन राज्यात महाराष्ट्राचा समावेश होता. महाराष्ट्र, कर्नाटक व तामिळनाडू ही राज्ये मुद्रा योजनेच्या अंमलबजावणीमध्ये पहिल्या तीनमध्ये समाविष्ट आहे.

या योजनेत शिशू, किशोर व तरुण कर्ज अशा तीन टप्प्यात बँकांमार्फत ५० हजार ते १० लाख रुपयांपर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येतो. या योजनेंतर्गत




महाराष्ट्रात गेल्या चार वर्षात ९१ लाख ५३ हजार ६१९ पेक्षा अधिक कर्ज प्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून, ४४ हजार ४९ कोटी १७ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज मंजूर करण्यात आले. ४२ हजार ८६० कोटी ४३ लाखांच्यावर रुपये कर्ज लघुउद्योजकांना वितरित करण्यात आले. २०१५-१६ या वर्षात १३ हजार ३७२ कोटी ४२ लाख रुपयांचे कर्ज प्रत्यक्षात वितरित करण्यात आले. २०१६- १७ या वर्षात १६ हजार कोटी ९७६ लाख ७६ हजार तर २०१७-१८ यावर्षात १२ हजार ५११ कोटी २५ लाख इतके कर्ज प्रत्यक्षात लघुउद्योजकांना वितरित करण्यात आले. देशात मुद्रा योजनेंतर्गत पहिल्या तीन वर्षात १० कोटींहून अधिक कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आली असून लघु उद्योगांना ४ लाख ४३ हजार ४९६ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले.

### रेल्वे विकासाची कामे

रेल्वे विकासाच्या प्रकल्पांसाठी १ लाख ३५ हजार ५७ कोटी रुपयांपेक्षा अधिक कामे गेल्या पाच वर्षात हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये ६५ हजार ७२४ कोटी रुपयांहून अधिक कामे ही मुंबई शहर वाहतूक प्रकल्पाची (एम.यू.टी.पी.) आहेत. या वर्षाच्या सुरुवातीला मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प टप्पा ३-अ, ला मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पासाठी एकूण ३० हजार ८४९ कोटींचा खर्च अपेक्षित असून येत्या पाच वर्षात हा प्रकल्प पूर्ण होणार आहे. त्यामुळे उपनगरीय वाहतुकीवरील ताण कमी होऊन प्रवाशांची सुरक्षाही होणार आहे. नवीन रेल्वे मार्ग, दुपदरीकरण, रेल्वे मार्गांचे विद्युतीकरण याबरोबरच मुंबई उपनगरीय रेल्वे वाहतूक दुपदरीकरण व मुंबई शहर वाहतूक प्रकल्पांतर्गत (एम.यु. टी.पी) रेल्वे वाहतूक विस्तार आदी महत्त्वपूर्ण विकासकामे हाती घेण्यात आली.

### अर्थसंकल्पात वाढीव तरतूद

रेल्वे प्रकल्पांसाठी गेल्या पाच वर्षांपासून वाढीव तरतूद करण्यात येत आहे. २०१४ ते २०१८ या काळात प्रतिवर्ष सरासरी ४३४५ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली. यापूर्वी ही तरतूद प्रतिवर्ष ११७१ कोटी इतकी होती. २०१८-१९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात राज्यातील रेल्वे विकासकामांसाठी ६ हजार ६५८ कोटींची तरतूद करण्यात आली जी आतापर्यंत करण्यात आलेली सर्वात मोठी आर्थिक तरतूद ठरली.

### रेल्वेच्या कामांना गती

नवीन रेल्वे मार्ग, दुपदरीकरण, चौपदरीकरण व रेल्वे मार्गांचे विद्युतीकरण, गेजपरिवर्तन या कामांसाठी ६९ हजार ९३३ कोटी रुपयांपेक्षा अधिक कामे हाती घेण्यात आली. यामध्ये राज्यातील १८१६ कि.मी. हून अधिक लांबीच्या नवीन १४ मार्गांसाठी



३१ हजार ४४८ कोटी ७८ लाख रुपयांच्या कामांना गती मिळाली. यातील ७७१ कोटी रुपयांची कामे सार्वजनिक खासगी भागीदारीतून करण्यात आली असून अपूर्ण कामे पूर्ण करण्यात येत आहेत.

### रेल्वे मार्ग विद्युतीकरणाची भरीव कामे

२०१४ पासून २०१८ च्या पहिल्या तिमाहीपर्यंत राज्यातील ७३० की.मी. लांबीच्या मार्गाचे विद्युतीकरण पूर्ण झाले. १७ मार्गावरील २२०९ की.मी. लांबीच्या विद्युतीकरणाच्या कामाला गती मिळाली. या प्रकल्पासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली. २१ पेक्षा जास्त नवीन रेल्वे मार्गासाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे.

शौचालये बांधण्यात आली आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात ६० लाखांहून अधिक शौचालयांची उभारणी करण्यात आली आहे, तर राज्यातील ३४ जिल्हे, ३५१ पंचायत समित्या व २७,६६७ गावे हागणदारीमुक्त झाली आहेत.

२०१४- १५ या वर्षात राज्यात ४ लाख ८८ हजार ४०२ शौचालये बांधण्यात आली. २०१५-१६ या वर्षांत ८ लाख ८२ हजार ५३, २०१६-१७ या वर्षात १९ लाख १७ हजार १९१ तर २०१७-१८ या वर्षात २२ लाख ५२ हजार ८७६ तर २०१८-१९ मध्ये आतापर्यंत ८० हजारांहून अधिक शौचालये बांधण्यात आली आहेत.

### भारतनेटच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्र देशात उत्कृष्ट

'भारतनेट' या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात ग्रामपंचायतींना हायस्पीड ब्रॉडबँडद्वारे जोडण्याच्या कामात महाराष्ट्र उत्कृष्ट राज्य ठरले आहे. राज्यातील १२ हजार ३७८ ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट सेवा उपलब्ध झाली आहे. १४ हजार ८७८ ग्रामपंचायतींमध्ये 'भारतनेट' च्या कामास सुरुवात झाली आहे.

३१ डिसेंबर २०१७ अखेर २ लाख ५४ हजार ८९५ किलोमीटर ऑप्टिकल फायबरचे जाळे निर्माण केले गेले.

### उज्वला योजनेंतर्गत १७ लाख गॅस कनेक्शन

या योजनेंतर्गत देशात ३ कोटींहून अधिक गॅस जोडणी देण्यात आली आहे. जानेवारी २०१८ पर्यंत महाराष्ट्रात १७ लाखांहून अधिक गॅस कनेक्शन देण्यात आली. देशातील ५ कोटी दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना एलपीजी गॅस जोडणी देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.




महाराष्ट्रात या योजनेचा शुभारंभ ऑक्टोबर २०१६ मध्ये झाला. गेल्या १५ महिन्यांच्या कालावधीत राज्यात १७ लाख १२ हजार ४२५ गॅस कनेक्शन देण्यात आली आहेत. मार्च २०१७ अखेर महाराष्ट्रात ८ लाख ५८ हजार ८०८ कनेक्शन देण्यात आली. गेल्या १० महिन्यात सुमारे ९ लाख गॅस कनेक्शन देण्यात आली.


**महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली**

# केंद्रीय मंत्रिमंडळ आणि महाराष्ट्र

● **नरेंद्र मोदी** (प्रधानमंत्री तसेच कर्मचारी, जन तक्रार आणि निवृत्ती वेतन, अणु ऊर्जा, अवकाश, सर्व महत्त्वाचे धोरणात्मक मुद्दे, या खात्यांसह ज्या खात्यांवर कुठल्याही मंत्र्यांची नेमणूक करण्यात आली नाही, ती सर्व खाती प्रधानमंत्र्यांकडे असतील.)

## कॅबिनेट मंत्री

● **राजनाथ सिंग** (संरक्षण) ● **अमित शहा** (गृह) ● **नितीन गडकरी** (रस्ते वाहतूक आणि महामार्ग तसेच सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग) ● **डी.व्ही. सदानंद गौडा** (रसायने आणि खते) ● **निर्मला सीतारामन** (अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार) ● **रामविलास पासवान** (ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण) ● **नरेंद्र सिंग तोमर** (कृषी आणि शेतकरी कल्याण, ग्राम विकास तसेच पंचायत राज) ● **रविशंकर प्रसाद** (विधी आणि न्याय, दूरसंवाद तसेच इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान) ● **हरसिमरत कौर बादल** (अन्नप्रक्रिया उद्योग) ● **थावरचंद गहलोत** (सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण) ● **डॉ. सुब्रमण्यम जयशंकर** (परराष्ट्र व्यवहार) ● **रमेश पोखरियाल निशंक** (मनुष्यबळ विकास)● **अर्जुन मुंडा** (आदिवासी विकास) ● **स्मृति झुबीन इराणी** (महिला आणि बाल विकास तसेच वस्त्रोद्योग) ● **डॉ. हर्षवर्धन** (आरोग्य आणि कुटुंब कल्याण, विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच पृथ्वी विज्ञान) ● **प्रकाश जावडेकर** (पर्यावरण, वन आणि हवामान बदल आणि माहिती आणि प्रसारण) ● **पियुष गोयल** (रेल्वे तसेच उद्योग आणि वाणिज्य) ● **धर्मेंद्र प्रधान** (पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू आणि पोलाद) ● **मुख्तार अब्बास नक्वी** (अल्पसंख्याक व्यवहार) ● **प्रल्हाद जोशी** (संसदीय व्यवहार, कोळसा तसेच खाण) ● **डॉ. महेंद्र नाथ पांडे** (कौशल्य विकास आणि स्वयं उद्योजकता) ● **अरविंद सावंत** (अवजड उद्योग आणि सार्वजनिक कंपनी) ● **गिरीराज सिंग** (पशुपालन, दुग्ध व्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय) ● **गजेंद्र सिंग शेखावत** (जलशक्ती)



नितीन गडकरी

## राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

● **संतोष कुमार गंगवार** (श्रम आणि रोजगार) ● **राव इंद्रजित सिंग** (सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी तसेच नियोजन विभाग) ● **श्रीपाद येसो नाईक** (आयुष विभाग तसेच संरक्षण विभाग) ● **डॉ. जितेंद्र सिंग** (ईशान्य भारत विकास तसेच प्रधानमंत्री कार्यालय, कर्मचारी, जन तक्रार आणि निवृत्ती वेतन, अणु ऊर्जा, अवकाश विभाग) ● **किरेन रिजीजू** (युवक व्यवहार, क्रीडा आणि अल्पसंख्याक व्यवहार) ● **प्रल्हाद सिंह पटेल** (सांस्कृतिक आणि पर्यटन विभाग) ● **राजकुमार सिंग** (ऊर्जा, नवी आणि अक्षय ऊर्जा, कौशल्य विकास आणि स्वयं उद्योजकता विभाग) ● **हरदीप सिंग पूरी** (गृहनिर्माण आणि नगर विकास, नागरी हवाई उड्डाण विभाग आणि वाणिज्य, उद्योग मंत्रालय) ● **मनसुख एल मांडविया** (जहाज बांधणी विभाग, रसायन आणि खते विभाग)

## राज्यमंत्री

●**फग्गन सिंग कुलस्ते** (पोलाद) ● **अश्विनी कुमार चौबे** (आरोग्य आणि कुटुंब कल्याण) ● **अर्जुन राम मेघवाल** (संसदीय व्यवहार तसेच अवजड उद्योग आणि सार्वजनिक वितरण विभाग) ● **जनरल (निवृत्त) व्ही. के. सिंग** (रस्ते वाहतूक आणि महामार्ग) ● **कृष्ण पाल** (सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण) ● **रावसाहेब दानवे** (ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण) ● **जी. किशन रेड्डी** (गृह) ● **पुरुषोत्तम रुपाला** (कृषी आणि शेतकरी कल्याण) ● **रामदास आठवले** (सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण) ● **साध्वी निरंजन ज्योति** (ग्राम विकास) ● **बाबुल सुप्रियो** (पर्यावरण, वने आणि हवामान बदल) ● **संजीव कुमार बलियान** (पशुपालन, दुग्ध व्यवहार आणि मत्स्य व्यवसाय) ● **संजय शामराव धोत्रे** (मनुष्यबळ विकास, दूरसंवाद तसेच इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान) ● **अनुराग सिंग ठाकूर** (अर्थ राज्यमंत्री तसेच कंपनी व्यवहार) ● **सुरेश अंगडी** (रेल्वे) ● **नित्यानंद राय** (गृह) ● **रतनलाल कटारिया** (जलशक्ती तसेच सामाजिक न्याय सक्षमीकरण) ● **व्ही. मुरलीधरन** (परराष्ट्र आणि संसदीय व्यवहार) ● **रेणुका सिंग सरुता** (आदिवासी विकास) ● **सोम प्रकाश** (वाणिज्य आणि उद्योग) ● **रामेश्वर तेली** (अन्न प्रक्रिया उद्योग) ● **प्रताप चंद्र सारंगी** (सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग तसेच पशुपालन, दुग्ध व्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय) ● **कैलाश चौधरी** (कृषी आणि शेतकरी कल्याण)● **देबश्री चौधरी** (महिला आणि बालविकास)



प्रकाश जावडेकर



पियुष गोयल



अरविंद सावंत



रामदास आठवले



रावसाहेब दानवे



संजय धोत्रे

# सामना दुष्काळाशी

**१५१ पूर्ण तालुक्यांतील १७ हजार ९८५ गावे, २६८ महसुली मंडळांतील ५०९० गावे, तसेच ५० पेक्षा कमी पैसेवारी असलेली ५४४९ गावे अशा एकूण २८ हजार ५२४ गावांमध्ये दुष्काळ जाहीर**

### उपाययोजना

- जमीन महसुलातून सूट
- सहकारी कर्जाचे पुनर्गठन
- शेती निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती
- कृषी पंपाच्या चालू देयकामध्ये ३३.५ टक्के सूट
- शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी
- रोहयोंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता
- आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर
- शेती पंपाची वीजजोडणी खंडित न करणे.



**संवाद सेतूच्या माध्यमातून आलेल्या ४ हजार ४५१ तक्रारींपैकी दुष्काळाशी प्रत्यक्ष संबंधित २ हजार ३५९ तक्रारींचे निराकरण करण्यात येत आहे. या प्रत्येक तक्रारीचे निवारण करण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धती अवलंबण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक स्वतंत्र एक्सल शीट तयार करण्यात आली आहे. त्यात प्राप्त झालेली तक्रार, दिलेले निर्देश, स्थानिक प्रशासनाने केलेली कार्यवाही असा प्रत्येक जिल्ह्यातील दुष्काळी उपाययोजनांबाबतचा अहवाल हा थेट मुख्यमंत्री कार्यालयाला सादर करण्यात येत आहे. मुख्यमंत्री कार्यालयात या प्रत्येक तक्रारीच्या निवारणासाठी पाठपुरावा करण्याची यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.**

# संवाद साधणारा सेतू

**देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

एप्रिल-मे महिन्याच्या रणरणत्या उन्हाबरोबरच राज्यात दुष्काळाची तीव्रता जाणवू लागली आहे. गेल्या वर्षी झालेल्या अपुऱ्या पावसाने दुष्काळाचे सावट अधिक गडद केले असले तरी गेली काही वर्षे राज्यातील काही भाग कायम दुष्काळाच्या छायेत असल्याचेच अनुभवास येते. दुष्काळ ही तात्कालिक परिस्थिती नसते, तर ते एक दुष्टचक्र असते. ज्याचा परिणाम परिसराच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, पर्यावरण इत्यादी घटकांवर होतो. याशिवाय त्याचे दीर्घ परिणाम लहान मुलांवर दिसतात. दुष्काळामध्ये सर्वाधिक कुणी होरपळले जात असेल तर ते म्हणजे गावातील स्त्रिया. कारण कुटुंबांना पाणी पुरवणे ही फक्त स्त्रियांची जबाबदारी असल्याचा अलिखित नियम असल्याचे आपल्याकडे दिसते. त्यामुळे लहान मुलींपासून वृद्ध स्त्रियांपर्यंत सर्व वयोगटातील महिलांची पाण्यासाठी अखंड वणवण होताना दिसते.

### तलावांचे व्यवस्थापन

दरवर्षी पाऊस येतो, नदी नाले ओसंडून वाहतात. हे पाणी समुद्राला जाऊन मिळते. यापैकी फारच थोडे पाणी जमिनीत मुरते. हे जमिनीत मुरलेले पाणीच खरे आपले असते. ते वर्षभर टिकवण्यासाठी जलसाठे निर्माण करावे लागतात तसे ते आपल्या पूर्वजांनी केलेही आहेत. जल, जंगल आणि जमीन राखणारी आपली संस्कृती आहे. गावागावातील जलस्रोतांचे नियमन पूर्वीपासून लोकसहभागातून करण्यात आले आहे. लोकसहभागातून आणि दातृत्वातून हजारो तलाव भारतात शेकडो वर्षांपूर्वी बांधले गेले. तलाव निर्मिती, त्यांच्या दुरुस्तीचे कार्य हे पवित्र समजले जात असे. या तलावांचे व्यवस्थापन आणि पाण्याचे वाटप न्यायपूर्ण पद्धतीने केले जात असे.

गाव-वस्त्यांच्या पातळीवर स्थानिक पाण्याच्या गरजा भागवण्याचे ते महत्त्वाचे स्रोत आहेत. गावोगावी असलेल्या परंपरागत जलव्यवस्था जसे विहिरी, आड, बारवा, तलाव, कुंड, बंधारे असे असंख्य स्रोत आहेत. त्यांच्यावर आधीच्या पिढ्यांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक पैशाची आहेच. त्याचबरोबर ती वेळ, सामूहिक शक्ती, शहाणपण, शिस्त यांचीसुद्धा आहे. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे या सर्वच व्यवस्था त्या त्या गावाच्या-भागाच्या गरजांनुसार, विविधतेनुसार उभारण्यात आल्या आहेत. या स्रोतांकडे झालेल्या दुर्लक्षामुळे बहुतेकांच्या आता कचराकुंड्या झाल्या आहेत किंवा ते नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांचे पुनरुज्जीवन केले तर त्या उपयोगात आणता येऊ शकतात. हाही उपलब्ध साधनांचा उत्तम वापर करण्याचा

## जलयुक्त शिवार

राज्यात उद्‌भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी राज्य शासन गेल्या चार वर्षांपासून तात्पुरत्या उपाययोजनांबरोबरच दीर्घकालीन उपाययोजनाही राबवत आहे. त्यामध्ये जलयुक्त शिवार योजनेचा महत्त्वाचा वाटा आहे. या योजनेतून २२ हजार ५९० गावांमध्ये जलसंधारणाची ५ लाख ७५ हजार कामे करण्यात आली असून त्यावर आजपर्यंत ८४५३ कोटी इतका खर्च झाला आहे. त्यातून २४ लाख ३५ हजार टीसीएम इतकी पाणीसाठा निर्माण झाला असून, ३४ लाख २३ हजार हेक्टर इतक्या क्षेत्रासाठी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. राज्यात १ लाख १७ हजार शेततळी पूर्ण झाली असून, चार हजार शेततळी प्रगतिपथावर आहेत. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ५१९ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

शासनाच्या विविध प्रोत्साहक उपाययोजनांचा परिणाम म्हणून कमी पाऊस होऊनही गेल्या चार वर्षातील राज्यातील सरासरी खाद्यान्न उत्पादन कायम राखणे शक्य झाले आहे. गेल्या दहा वर्षातील उच्चांकी उत्पादन २०१६-१७ मध्ये १७२ लाख मेट्रिक टन इतके झाले आहे. गाळप हंगाम २०१८-१९ मध्ये ११ लाख ६२ हजार हेक्टर क्षेत्रावर ऊस लागवड झाली आहे. दुष्काळ असूनही यावर्षी उसाचे क्षेत्र फारसे प्रभावित झाले नाही. हे सारे प्रयत्न जरी शासकीय पातळीवर करण्यात येत असले तरी जसे पैशामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचे उत्तर पैसाच असतो, त्याप्रमाणे पाण्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक केवळ उपलब्ध पाणीच करू शकते.



दुष्काळ निवारणासाठी पारंपरिकपणे विचार करता मुख्यमंत्री म्हणून सर्वाधिक दुष्काळग्रस्त असणाऱ्या तालुक्यांना मी भेट दिली असती, प्रशासनाला सूचना दिल्या असत्या, अधिकाऱ्यांनीही त्यांच्या स्तरावर होत असणाऱ्या प्रयत्नांची माहिती दिली असती पण तरीही हे सारे प्रयत्न एकतर्फीच असते. कारण यात दुष्काळाने होरपळणाऱ्या गावांच्या नेमक्या गरजा प्रशासनापर्यंत पोहोचल्या असत्या का, हा प्रश्नच आहे. शिवाय १५१ तालुक्यांतील किती गावांशी प्रत्यक्ष भेटीतून संवाद होऊ शकला असता? त्यांच्या समस्यांचे तत्कालिक निराकरण कदाचित सरसकट टँकरने पाणीपुरवठा, फार तर चारा छावणी आणि अन्य उपाययोजनांतून झाले असते पण ते सारे तत्कालिक उपाय झाले. मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे दुष्काळाचा मुद्दा हा अत्यंत गुंतागुंतीचा आणि प्रत्येक गावागणिक बदलणारा आहे.

एक मार्ग असू शकतो. या पाणीसाठ्याचे स्वामित्व पूर्वी गावांनी स्वत:कडे घेतले होते. आज या स्वामित्वाच्या भावनेची गरज जलस्रोतांच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक आहे.

## पाण्याचे योग्य नियोजन

पाण्याची कमतरता ही समस्या नसून उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन होणे महत्त्वाचे आहे. यात लोकसहभाग वाढला तर पाण्याचा अधिक सक्षमतेने वापर करणे शक्य होईल. आजही आपण पावसावरच अवलंबून आहोत. निसर्गाच्या बिघडलेल्या चक्रावर कदाचित पूर्ण मात करता येणार नाही; परंतु हाती असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करून आपण पाणी टंचाईची तीव्रता कमी करू शकतो. निसर्गाचे संवर्धन करणे, पुढील संकटाला सामोरे जाण्याची तयारी करणे, हे लाभाचे आहे. 'उदक चालवावे युक्ती'ने असे जे समर्थांनी सांगितले आहे ते यामुळेच आणि ज्ञानेश्वर माउलीही 'मुल-सिंचन' या शब्दातून सिंचनाचे मर्म सांगतात. पाण्याच्या वितरणासाठी आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असले तरी यातून पाण्याची निर्मिती शक्य नाही. त्यामुळे उपलब्ध पाणीच आपल्याला डोळसपणे वापरले पाहिजे.

पावसाचा लहरीपणा आणि अवर्षण फक्त आपल्याकडेच होते असे नाही तर अमेरिकेसारख्या प्रगत देशातही २/३ भाग हा अवर्षणग्रस्त आहे. पण पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन करून त्यांनी या आव्हानांवर मात केली आहे. जागतिक स्तरावर भूजल पातळीत मोठ्या प्रमाणावर घट होत असून शेतजमिनी क्षारपड होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. जगातील २९ देशांतील ४५ कोटी लोकांना पाणीटंचाईला तोंड द्यावे लागते तर १०० कोटींहून अधिक लोकांना पुरेसे पिण्याचे पाणी मिळत नाही. २०३२ पर्यंत निम्या जगाला पाणीटंचाई भेडसावणार असल्याचे एक अनुमान काढण्यात आले आहे. या आकडेवारीवरून पाणी समस्येचे स्वरूप किती उग्र आहे हे लक्षात येईल.

उपलब्ध पाणी आणि लोकसंख्येची सांगड घालणे काळानुरूप कठीण होत आहे. राहणीमानात आलेला बदलही काही प्रमाणात यासाठी कारणीभूत आहे. परंतु हे नवे राहणीमान स्वीकारताना आपल्याला पाण्याचा हुशारीने वापर करणे शिकावे लागेल. पाण्याचा फेरवापर करण्यावर भर दिला गेला पाहिजे. पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन झाले तर पाणीटंचाई, दुष्काळ हे विषय उरणार नाहीत.

गेली पाचही वर्षे सरासरीपेक्षा अत्यंत

कमी पाऊस झाला असून ही सरासरी ७५ टक्के इतकी आहे. त्यात २०१५ मध्ये गेल्या दहा वर्षातील सर्वाधिक कमी म्हणजे केवळ ५९ टक्के इतका नीचांकी पाऊस झाला आहे. गेल्यावर्षी सरासरीपेक्षा कमी आणि खंडित स्वरूपाच्या पर्जन्यमानामुळे यावर्षी राज्यातील जलाशयांत केवळ १३ टक्केच पाणीसाठा शिल्लक असून, गेल्या वर्षी याच सुमारास २३ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. यावरून यंदाच्या दुष्काळाच्या दाहकतेची कल्पना येऊ शकेल.

## उपाययोजना

केंद्र सरकारच्या निकषांप्रमाणे राज्य सरकारकडून दुष्काळग्रस्त तालुक्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये राज्यातील १५१ पूर्ण तालुक्यांतील १७ हजार ९८५ गावे, २६८ महसुली मंडळांतील ५०९० गावे, तसेच ५० पेक्षा कमी पैसेवारी असलेली ५४४९ गावे अशा एकूण २८ हजार ५२४ गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या दुष्काळी भागामध्ये विविध प्रकारच्या आठ सवलती लागू करण्यात आल्या असून त्यांच्या गतिमान अंमलबजावणीबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. या उपाययोजनांमध्ये जमीन महसुलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेती निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू बिलामध्ये ३३.५ टक्के सूट, शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, रोहयोअंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता, पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी आवश्यक तेथे टँकरचा वापर आणि शेतकऱ्यांच्या शेती पंपाची वीजजोडणी खंडित न करणे आदींचा समावेश आहे.

## आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

राज्यातून दुष्काळाची दाहकता संपवायची असेल तर गावागावांतील या समस्येचे स्वरूप जाणून त्यावर उपाययोजना हीच कार्यपद्धती असली पाहिजे. दुष्काळाची दाहकता लक्षात घेऊन गावागावांतील सरपंचांशी थेट संवाद साधण्याचे ठरले आणि संवादसेतू या उपक्रमाची निर्मिती झाली. संवादसेतू हा अगदी शब्दश: प्रशासन आणि गावागावांमध्ये प्रत्यक्ष संवाद साधणारा सेतू ठरला. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर प्रशासन अधिक गतिमान करण्यासाठी कसा केला जाऊ शकतो याची प्रचिती या संवादसेतूने पुन्हा एकदा करून दिली. त्या दृष्टीने संवादसेतू हा उपक्रम सफल ठरला असे म्हणावे लागेल.

ऑडिओ ब्रिजच्या माध्यमातून ६ दिवसांत २२ जिल्ह्यांतील १३९ तालुक्यांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचता आले आणि ८८४ सरपंचांशी थेट संवाद साधता आला. या २२ जिल्ह्यांमध्ये औरंगाबाद, नांदेड, जालना, उस्मानाबाद, बीड, परभणी, अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगाव, बुलडाणा, सातारा, पुणे, सांगली, सोलापूर, चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ, हिंगोली, वर्धा, नागपूर, वाशिम यांचा समावेश आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्रपणे हा संवादसेतू उपक्रम आयोजित करण्यात आला. या आधुनिक तंत्रामुळे एकाच वेळी संपूर्ण जिल्ह्यातील संबंधित यंत्रणेशी संवाद साधणे शक्य होत असल्याने कमी कालावधीत इतक्या व्यापक प्रमाणावर संपर्क साधून गतीने दुष्काळ निवारणाच्या कामांचा आढावा घेणे शक्य झाले.



सरपंचांनाही आपले म्हणणे यामुळे प्रत्यक्ष मांडता आले. कित्येक गावांमध्ये पाणी असूनही पाणीपुरवठा योजनांची पूर्वी झालेली निकृष्ट कामे, वीजदेयके न भरल्यामुळे बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना किंवा अगदी शुल्लक कारणाने गावाचा पाणीपुरवठा खंडित होणे अशा एक ना अनेक बाबी समोर आल्या. ज्यांचे निराकरण करण्यासाठी प्रशासनाला सूचना देता आल्या. फक्त टँकर आणि चारा छावण्या यापलीकडे जाऊन सरपंचांनी गावाची पाणी समस्या चहुबाजूने विचारात घेतली होती आणि नदी तलावाचे खोलीकरण, नवे बंधारे बांधणे, जुन्या बंधाऱ्यांची दुरुस्ती, जुनी पाईपलाइन बदलून मिळणे अशा अनेक महत्त्वपूर्ण सूचना सरपंचांनी या संवादादरम्यान केल्या. 'गावामध्ये पाणी आहे, पण वाड्या वस्त्यांवर पाणी नाही', असा मुद्दा दौंड तालुक्यातील एका महिला सरपंचांनी मांडला. त्याची दखल घेऊन आवश्यकतेनुसार वाड्या वस्त्यांवरही लोकसंख्येप्रमाणे तातडीने टँकर सुरू करावा, अशा सूचना जिल्हा प्रशासनास दिल्या आहेत.

'ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील एका गावच्या सरपंचांनी रस्त्याच्या कामात पाण्याची टाकी येत असल्याने ती नव्याने बांधून मिळावी', अशी मागणी केली. त्याची दखल घेत नव्या जागी पाण्याची टाकी बांधून द्यावी, अशी सूचना जिल्हा प्रशासनास केल्या. याशिवाय एका सरपंचांनी वृक्षारोपण आणि त्यांचे संगोपन करणाऱ्यालाच शासकीय योजनांचा लाभ यापुढे देण्यात यावा, तसा कायदाच करा अशी सूचनाही केली. गावाच्या विकासाशी संबंधित प्रत्यक्ष कार्यान्वित करू शकणाऱ्या सूचना या माध्यमातून सरपंचांनी केल्या. मुख्य म्हणजे या संवादातून असेही लक्षात आले की, सरपंचांना पाण्याच्या समस्येचे मूळ कुठे आहे हे माहिती होते आणि त्यावरच्या उपाययोजनांचाही त्यांनी विचार केला होता. काही सूचना अगदी वेगळ्या धाटणीच्या आणि धोरणात्मक आणि तांत्रिक होत्या, अशा सूचनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासण्याचे निर्देश आता अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

टँकरने पाणीपुरवठा करताना २०१८ ची

लोकसंख्या विचारात घेऊन टँकरची संख्या निश्चित करण्यात यावी अशा सूचना यंत्रणेला देण्यात आल्या आहेत. अधिग्रहित विहिरींसाठी पूर्वी निश्चित केलेली रक्कम दिली जात होती. आता त्या विहिरींतून टँकरमध्ये किती पाणी भरले यावर निधी देण्याचा निर्णय घेतला असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. जनावरांनाही पाणी उपलब्ध व्हावे यासाठी गावातील जनावरांची संख्या लक्षात घेऊन त्याआधारे टँकरच्या पाण्यात वाढ करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांच्यासह संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या.

दुष्काळामध्ये सर्वात महत्त्वाचे असते ते 'हाताला काम आणि पिण्याला पाणी'. त्या दृष्टीने शासन प्रयत्नशील असले तरीही मला सर्व सरपंचांना असे सुचवावेसे वाटते की, सर्व दुष्काळग्रस्त गावातील सरपंचांनी त्यांच्या गावात जलसंधारणाची अधिकाधिक कामे घ्यावीत, त्यासाठी शासनाकडे निधी उपलब्ध आहे. नरेगाअंतर्गत २८ प्रकारची कामे कन्व्हर्जन करून राबवता येणार आहेत. त्यातूनही ग्रामसेवक-सरपंचांनी गावात जास्तीत जास्त कामे करावीत, त्यातून रोजगार निर्माण होताना मत्ताही उभी राहील.

या संवादाच्या वेळी संबंधित सरपंचांनी मांडलेली तक्रार एकाच वेळी माझ्यासह, मुख्य सचिव, पालक सचिव आणि स्थानिक प्रशासनाचे अधिकारी ऐकू शकत होते. या तक्रारींवर मी तत्काळ दिलेले निर्देशही त्याच वेळी प्रत्यक्ष सरपंचांपर्यंतही पोहोचत होते.

ज्या सरपंचांशी प्रत्यक्ष संवाद होऊ शकला नाही त्यांना १७ व्हॉट्सअप क्रमांक देण्यात आले. याशिवाय जे प्रश्न धोरणात्मक बाबींशी निगडित आहेत, त्यावरही निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने 'एकमेकांना देऊ साथ-दुष्काळाशी करू दोन हात' हा उद्देश यातून साध्य करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत आहे.

**शब्दांकन : कीर्ती पांडे**
मुख्यमंत्र्यांच्या जनसंपर्क अधिकारी

**संवाद सेतूच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळग्रस्त गावांच्या अडचणी समजून घेतल्या. या माध्यमातून प्रत्यक्ष गावच्या संरपंचांशी बोलून संबंधित गावच्या समस्या त्यांनी जाणून घेतल्या. या संवादसेतूमधील राज्याचे प्रमुख ते सरपंच यांच्यामधल्या संवादाचा काही भाग...**

# दखल आणि दिलासा

*नमस्कार, हॅलो. बोला मला तुमचा आवाज ऐकू येत आहे, बोला...*

*मी देवेंद्र फडणवीस बोलत आहे, बोला*

***सरपंच:*** *सर नमस्कार, मी सोयगाव तालुक्यातून बोलतोय.. आमच्याकडं आम्ही लोकवर्गणीतून पाण्याचे नियोजन केलं आहे मुख्यमंत्री पेयजल योजनेचा प्रस्ताव पाठवालाय गावानं, तो मंजूर केल्यास बरं होईल*

***मुख्यमंत्री:*** *अभिनंदन! तुमची मागणी मी नोंदवून घेतली आहे तुमचा प्रस्ताव लवकरच मंजूर करील. सचिवांनी याची नोंद घ्यायचीय.*

***सरपंच:*** *साहेब जायकवाडी धरणाजवळ गाव आहे, पण गावात पाण्याची लई टंचाई हाय बघा*

***मुख्यमंत्री:*** *गावची लोकसंख्या किती आणि गावात किती टँकर येतात?*

***सरपंच:*** *साहेब २०११ च्या लोकसंख्येप्रमाणे गावात टँकर येतो, पण आता लोकसंख्येत वाढ झालीय पाणी जास्त लागतय*

***मुख्यमंत्री:*** *जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार, यांनी याची तत्काळ दखल घ्यायचीय. सर्व दुष्काळग्रस्त गावात २०१८ ची लोकसंख्या विचारात घेऊन पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरची संख्या निश्चित करायची आहे. तसेच जनावरच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सोडवायचा आहे.*

***सरपंच:*** *साहेब गावात जवळपास कुठच चारा छावण्या नाहीत, गुरांचे खूप हाल होताहेत.*

***मुख्यमंत्री:*** *जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: या गोष्टीची तत्काळ नोंद घ्यायचीय.. जिथे चारा छावण्यांची मागणी आहे तिथे चारा छावणी सुरू करण्यासंदर्भात पडताळणी करून तत्काळ कार्यवाही करायचीय.*

***सरपंच:*** *साहेब हाताला काम नाही,*

***मुख्यमंत्री:*** *सीईओंनी याची नोंद घ्यावी सर्व दुष्काळग्रस्त जिल्ह्यांसाठी ही सूचना आहे...*

*रोजगार हमी योजनेच्या कामांना तीन दिवसात मंजुरी देऊन लोकांच्या हाताला काम द्यायचं आहे. रोजगार हमी योजनेतून २८ प्रकारची कामं आपण कन्व्हर्जनाद्वारे करू शकतो, यामुळे दुष्काळात लोकांच्या हाताला काम मिळेल आणि त्यातून मत्ता उभी राहील.*

एका मागून एक येणाऱ्या फोनवर गावातील सरपंच, ग्रामसेवक आपल्या गावातील दुष्काळाची स्थिती, अडचणी सांगत होते आणि मुख्यमंत्री त्याची नोंद घेत, संवादात सहभागी झालेल्या प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना अतिशय संवेदनशीलपणे आणि वेगाने उपाययोजना करण्याचे निर्देश देत होते.

संवादाचं स्थळ होतं वर्षा, मुख्यमंत्र्यांचं शासकीय निवासस्थान. मुख्यमंत्र्यांनी सर्वांना संवादाच्या एका सूत्रात बांधलं ते 'ऑडिओ ब्रीज'च्या माध्यमातून. दुष्काळग्रस्त जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, सरपंच आणि ग्रामसेवक सर्वच संवादाच्या या यात्रेत एकाच वेळी सहभागी झाले.

गावपातळीवरील लोकप्रतिनिधी-कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधणारे, प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना या समस्यांचे निराकरण करण्याच्या सूचना देणारे मुख्यमंत्री आणि आपल्या अडचणी थेट राज्याच्या प्रमुखासमोर मांडता

आल्याचा सरपंच-ग्रामसेवकांना वाटणारा आनंद, त्या सुटतील असा शब्दातून डोकावणारा विश्वास असं चित्र एकाच वेळी पाहायला मिळत होतं.

फोनवर सांगितलेल्या प्रत्येक अडचणीची, तक्रारीची आणि मागणीची मुख्यमंत्री स्वत: नोंद घेत होते गावात टँकर येतो का, किती फेऱ्या येतात, मुख्यमंत्री स्वत: सरपंचांना विचारत होते. मंजूर संख्येप्रमाणे टँकर येत नसल्यास तक्रार करण्याचे आवाहन करत होते. एवढच कशाला गावात पाणी घेऊन येणारा टँकर भरलेला असतो की अर्धा असतो, हेही पाहा, अर्धा येत असेल तर त्याचे फोटो, मी दिलेल्या व्हॉटसॅप नंबरवर पाठवा, असंदेखील सांगत होते. दुष्काळ आहेच, पण आपण सर्व मिळून काम करू, या दुष्काळावर मात करू हे मुख्यमंत्र्यांचे शब्द गावांसाठी प्रेरणादायी ठरत होते

रोजगार हमी योजनेचे काम असेल, गावात टँकरची मागणी असेल, चारा छावण्या, गुरांना पाणी अशा ज्या मागण्या या संवादातून व्यक्त होत होत्या, त्याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करू नये, कोणतीही अडचण सांगू नये, वस्तुस्थितीची पाहणी करून जिथे आवश्यक आहे तिथे या सर्व उपाययोजना तत्काळ सुरू कराव्यात असे आदेश मुख्यमंत्री देत होते.

*त्यांनी सरपंचांना विचारलं की, दुष्काळाचे मदतीचे पैसे तुमच्या गावात मिळाले का? ही मदत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करत आहोत, काही अडचणी असतील तर निकष तपासून या कामाला वेग देऊ.*

*साहेब पीक विम्याचे पैसे अजून गावात मिळाले नाहीत, असं जेव्हा एका सरपंचांनी सांगितले, तेव्हा ते लवकरच मिळतील, बँकांनी यातून शेतकऱ्यांच्या कर्जाची रक्कम परस्पर कापू नयेत अशा सूचना देण्यात आल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.*

*सर, टँकर येतो पण तो कधी काळच्या लोकसंख्येप्रमाणे येतो.. आता गावातील लोकसंख्या वाढलीय साहेब.*

*हो, आपण ही बाब विचारात घेतलीय त्यामुळेच २०१८ ची लोकसंख्या विचारात घेऊन आपण त्याप्रमाणे टँकरची संख्या निश्चित करण्याच्या सूचना दिल्या आहेत, मला आणखी एक गोष्ट येथे तुम्हा सर्व सरपंच, ग्रामसेवकांना सांगायची आहे, ती म्हणजे पावसाळ्यापूर्वी प्रत्येक गावानं मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामं हाती घ्यावीत.*

*तहसीलदार, गट विकास अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी यांनी दुष्काळग्रस्त गावांच्या अडचणी ज्या आता ते फोनवर सांगत आहेत त्या आणि ज्या व्हॉट्सअपवर येणार आहेत त्याची तत्काळ नोंद घ्यावी, चारा छावण्या, अतिरिक्त टँकरच्या मागण्या, जनावरांच्या पिण्यासाठी पाणी, पाणी पुरवठा योजना आहे, पण वीज नसल्याने योजना बंद आहे, पाणी आहे, पण पाणीपुरवठा योजना नादुरुस्त आहे अशा सगळ्या बाबी नोंदवून घ्याव्यात व त्यावर प्रभावीपणे काम करावं. तातडीने करावयाच्या उपाययोजनांबाबत ४८ तासात कार्यवाही केली जावी, असे स्पष्ट आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.*




काही सरपंचांनी नदीचे खोलीकरण, छोटे पाझर तलाव घेणे, तलाव, विहिरीचे खोलीकरण करावे अशी मागणी मांडली. काहींनी गावाचा जलयुक्त शिवार योजनेत समावेश करण्याची मागणी केली. एक सरपंच म्हणाले, आमच्या गावात राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत काम व्हावे, कुणी म्हणाले, पाण्याची टाकी फुटलीय साहेब, नवीन टाकी बांधून द्या, कुणी म्हणालं टँकर मंजूर आहे सर, पण तो गावात येतच नाही.

या सगळ्या अडचणी आणि मागण्यांची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी यंत्रणेला वेगाने आणि प्रभावीपणे त्यावर उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या, एवढे करून ते थांबले नाहीत, त्यांनी प्रत्येक जिल्ह्याला त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी, मागण्या नोंदवण्यासाठी व्हॉट्सअप नंबर दिले. ज्यांना या संवादातून थेट आपल्याशी बोलता आले नाही आणि ज्यांना या संवादात सहभाग घेता आला नाही त्या सर्वांनी त्यांच्या मागण्या, तक्रारी आणि अडचणी या क्रमांकावर पाठवाव्यात, त्यावर माझं स्वत: थेट लक्ष राहणार आहे असा विश्वासही दिला.

मुख्यमंत्र्यांनी साधलेला हा संवाद सर्वांनी मिळून काम करण्यासाठी आणि दुष्काळावर मात करण्यासाठी नक्कीच प्रेरणादायी होता. जेव्हा राज्याचा प्रमुखच इतका पुढाकार घेऊन, सर्वांना सोबत घेऊन दुष्काळ निवारणाचे काम करत असेल तेव्हा दुष्काळावर मात करणे खरंच अवघड आहे का?

**– डॉ. सुरेखा मधुकर मुळे**
वरिष्ठ साहाय्यक संचालक (माहिती)



# साहेब, आम्ही आभारी आहोत...

**संवादसेतूद्वारे मुख्यमंत्र्यांनी सरपंचांसोबत संवाद साधला. प्रत्यक्ष याच वेळी आणि १७ व्हॉट्सअप क्रमांकांवर विचारण्यात आलेल्या दुष्काळ व टंचाईच्या प्रश्नांना मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल सरपंचांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.**

### मेरा देश बदल रहा है

'आमची पाणीपुरवठ्याची अडचण तत्काळ म्हणजे अवघ्या अडीच तासातच दूर झाली, आपल्याकडे अडचण मांडल्यानंतर लगेच आंचळगाव (जि. जळगाव) ग्रुप ग्रामपंचायतीला चार टँकर सुरू करण्याचे जळगाव जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश प्राप्त झाले आणि टँकर पाणीसुद्धा घेऊन आले. 'मेरा देश बदल रहा है' या शब्दांत भडगाव पंचायत समितीचे माजी उपसभापती संभाजी पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे आणि शासनाचे आभार मानले आहेत.



### यंत्रणा अधिक गतिमान

यवतमाळ जिल्ह्यातील वरधपोड (घुबडहेटी) येथील श्रीमती कांचन मेश्राम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संवाद साधताना 'विहीर आहे, पण पाणी नाही, रोजगार हमी योजनेमध्ये ठेकेदाराचे बिल निघत नाही, असे सांगून तीन हँडपंपची दुरुस्ती करण्याची मागणी केली. त्यानंतर यंत्रणा अधिक गतिमान झाली. घुबडहेटी येथे हातपंपांमध्ये पंपिंग मशीन बसवण्याचे काम प्रगतिपथावर असल्याचे श्रीमती मेश्राम यांनी मुख्यमंत्री सचिवालयाला कळवून मुख्यमंत्र्यांना धन्यवाद दिले आहेत.

### फास्ट ॲक्शन

चोपडा तालुक्यातील पंचक येथे पाणीटंचाईची भीषणता मांडतानाच गावासाठी नवीन कुपनलिका देण्याची मागणी सरपंच विजया पाटील यांनी केली. त्यानंतर प्रशासनाने तातडीने सौ. पाटील यांच्याशी संपर्क साधून बंधारा दुरुस्ती आणि कूपनलिकेचा प्रस्ताव पाठवण्यास सांगितले आहे. या 'फास्ट ॲक्शन'मुळे सौ. पाटील आणि ग्रामस्थ मंडळी शासनावर खूष झाले असून मागणी केल्यावर लगेचच कार्यवाही सुरू केल्याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

### समाधान

उस्मानाबाद जिल्ह्यातील उदतपूरचे सरपंच माधवराव पाटील यांनी मुख्यमंत्र्यांशी उदतपूरला स्मशानभूमीसाठी जागा तसेच गावतलाव, शेततळे देण्याची मागणी केली. प्रशासनाने लगेच स्मशानभूमी जागेचा प्रस्ताव ग्रामपंचायतीकडून मागवण्याची कार्यवाही सुरू केली. पाझर तलाव दुरुस्तीचे अंदाजपत्रक बनवण्याचे काम सुरू आहे. डीपीसीमधून निधी मिळवण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. मंजुरी मिळताच काम पूर्ण होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. या तातडीने झालेल्या कार्यवाहीवर सरपंच श्री. पाटील यांनी समाधान व्यक्त केले.

### वेळेची बचत

'संवादसेतू' उपक्रम अतिउत्तम, परिपूर्ण आणि वेळेची बचत करणारा तसेच गावपातळीवरील दुष्काळाशी संबंधित अडचणी जाणणारा असून हा उपक्रम राबवल्याबद्दल सोलापूरचे वाय. एस. गोटे यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत. वाड्या-वस्त्यांवर टँकरने पाणीपुरवठा करण्यात रस्त्यांअभावी अडचणी निर्माण होत असल्याने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ते तयार करण्याची मागणी श्री. गोटे यांनी केली. प्रशासनाने तत्काळ ग्रामपंचायतीला सूचना देऊन रस्त्याच्या कामाचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

**– वर्षा फडके-आंधळे**
विभागीय संपर्क अधिकारी

**अजय जाधव / वर्षा फडके-आंधळे**

महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांशी 'ऑडिओ ब्रिज'द्वारे संवाद साधला. सांगली जिल्ह्यातील सरपंचांशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधून दुष्काळाच्या अनुषंगाने अडचणी जाणून घेतल्या. मुख्यमंत्र्यांच्या या पुढाकाराबाबत सरपंचांना काय वाटते, हे जाणून घ्यायचा प्रयत्न सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना केला. पिण्यासाठी, वापरासाठी आणि शेतीसाठी पाण्याचा योग्य वापर करून पाण्याची बचत करणे ही काळाची गरज आहे. त्यामुळेच मुख्यमंत्र्यांनी गावातील सरपंचांशी संवाद साधल्यानंतर सरपंचांनी गावात पाण्याची कमतरता भासू नये म्हणून केलेले प्रयत्न जाणून घेता आले. या भागातील सरपंचांशी संवाद साधल्यानंतर मुख्यमंत्र्यांचा 'संवादसेतू' दुष्काळग्रस्तांसाठी दिलासा देणारा ठरल्याची भावना अनुभवयास मिळाली.

### नागज

साधारणत: ६ हजार वस्ती असलेले नागज, कवठेमहांकाळ तालुक्यातील (जि. सांगली) व्यापारी गाव म्हणून ओळखले जाते. १० ते १२ गावांना जोडणाऱ्या या गावातील लोक शेततळ्यामध्ये साठवून ठेवलेल्या पाण्यावर द्राक्षाची शेती करतात. गावात २५० हून अधिक शेततळी आहेत. ज्यावर शेती होते. पण पिण्याच्या पाण्यासाठी आणि दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या पाण्यासाठी टेंभू योजनेंतर्गत येणारे पाणी त्यांना मिळते. एरव्हीसुद्धा या गावात सात दिवसांनी पाणी येते, अशी सवय गावकऱ्यांना असली तरी या वेळी जवळपास आठ ते दहा दिवसांनी पाणी येत आहे.

नागज गावाच्या सरपंच नंदिनी देसाई या, पूर्वी ग्रामपंचायत सदस्या होत्या. दोन वर्षांपासून सरपंच आहेत. मुख्यमंत्र्यांशी ऑडिओ ब्रिजमुळे त्यांना १३ मे रोजी संवाद साधण्याची संधी मिळाली. या संवादामध्ये त्यांनी गावातील परिस्थिती नेमक्या शब्दात व्यक्त केली. गावातील लोकवस्ती, जनावरांची संख्या आणि आताची परिस्थिती याबाबतची माहिती दिली. पाऊस लांबला तर पाण्याची टंचाई अधिक होऊ शकेल मात्र सध्या टँकरची फेरी वाढवण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. टँकरच्या किमान दोन फेऱ्या कराव्यात, चारा डेपो, चारा छावण्या सुरू करण्यात याव्यात अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. त्यांनी सांगितलेल्या सर्व बाबींची खातरजमा मुख्यमंत्र्यांनी तहसीलदार आणि अन्य अधिकाऱ्यांकडून केली. *गावात टँकर्स येणे सुरू झाले आहे. माझ्या गावातल्या समस्या मी राज्याच्या प्रमुखाकडे मांडल्या, राज्य प्रमुखाने त्या ऐकून घेऊन त्याचे निवारण केले हे पहिल्यांदाच महाराष्ट्रात होत असल्याचे श्रीमती देसाई यांनी सांगितले.*

**दुष्काळनिवारणासाठी शासनाने विविध उपाययोजना युद्धपातळीवर सुरू केल्या आहेत. गावागावांतील अडचणी सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑडिओ ब्रिजच्या माध्यमातून 'संवादसेतू' उपक्रमांद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांशी साधलेला संवाद अतिशय प्रभावी आणि परिणामकारक ठरला. प्रशासनाला स्पष्ट कार्यवाहीचे आदेश देतानाच प्रत्येक तक्रारीचे निवारण करण्याचीही व्यवस्था करण्यात आली.**

# टँकर सुरू झाले...



## टँकरद्वारे पाणीपुरवठा

**दुष्काळी** गावातील सरपंचांशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संवाद साधला, त्यानंतर लगेचच आमच्या थबडेवाडी गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला, 'संवादसेतू' उपक्रमाद्वारे संवाद साधून प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेतली त्यातून आमच्यासारख्या अनेक गावांना आधार मिळाल्याचे सांगली जिल्ह्यातील थबडेवाडी (ता. कवठेमहांकाळ) च्या सरपंच पवित्रा बजरंग खोत यांनी सांगितले.

'लोकराज्य' टीमने श्रीमती खोत यांची भेट घेतली तेव्हा त्यांनी 'संवादसेतू' उपक्रमाचे कौतुक करून मुख्यमंत्र्यांशी साधलेल्या संवादाचा अनुभव सांगितला.

'तो सोमवारचा दिवस होता, सकाळीच मला मंडल अधिकाऱ्यांनी संपर्क साधून मुख्यमंत्री सांगली जिल्ह्यातील दुष्काळी गावांच्या सरपंचांशी संवाद साधणार आहेत, या वेळी आपण पंचायत समितीमध्ये उपस्थित राहण्याची विनंती केली. मी ठरल्या वेळेनुसार पंचायत समितीत पोहोचले. तहसीलदार, मंडळ अधिकारी ग्रामसेवक यांचेसह संबंधित विभागाचे अधिकारीदेखील उपस्थित होते. थोड्याच वेळात 'ऑडिओ ब्रिज' च्या माध्यमातून मुख्यमंत्री यांचा संवाद सुरू झाला 'नमस्कार, मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलतोय, पवित्राताई, तुम्ही तुमच्या गावातील दुष्काळाबाबतच्या अडचणी सांगा', थेट नाव घेऊन मुख्यमंत्र्यांनी सुरू केलेला हा संवाद मी कधीच विसरू शकत नाही दोन मिनिटांच्या या संभाषणात, मी गावातील दुष्काळी परिस्थिती सांगितली. गावातील लोकसंख्या २३००च्या घरात आहे. १२० मोठी जनावरे तर ३७५ लहान जनावरे, अशी जवळपास ४९५ जनावरे आहेत. दोन कूपनलिका अधिग्रहण केल्याने गावाला पाणी येते. पण हे पाणी कमी पडत असून टँकरची गरज असल्याचे सांगितल्यावर मुख्यमंत्र्यांनी 'ताई अजून काही अडचण आहे का?' असे संवेदनशीलपणे विचारले, मी टँकर लवकर सुरू करण्याची आवश्यकता पुन्हा बोलून दाखवल्यावर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीच्या सूचना दिल्या आणि गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला.



सरपंच पवित्रा खोत

माझ्याशी झालेल्या संवादानंतर जिल्ह्यातील इतर पाच दुष्काळी गावातील सरपंचांशीदेखील मुख्यमंत्री बोलले. सुरुवातीला, माझ्यासारख्या प्रथमच सरपंच झालेल्या महिला अडखळल्या. पण पलीकडून मुख्यमंत्र्यांनी स्वत: धीर दिल्याने माझ्यासह इतर महिला सरपंचानी धीटपणे गावच्या समस्या मांडल्या, मुख्यमंत्र्यांनी एक व्हॉटसअप क्रमांक दिला. या क्रमांकावर तक्रार करण्यास सांगितले. त्यानंतर आमच्या अडचणींवर उपाययोजना करण्यात येत असल्याचे आम्हाला कळवण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या या संवादामुळे प्रशासन अधिक गतिमान झाले आणि आमच्या समस्या निवारणाचे काम सुरू झाले आहे.

दुष्काळी परिस्थितीशी गाव सामना करत असताना राज्याचा प्रमुख आपल्याबरोबर असल्याचे सांगतो तेव्हा खूप अप्रूप आणि आश्वस्त वाटते. मुख्यमंत्र्यांचा हा 'संवादसेतू' दुष्काळी गावांना आधार देणारा ठरला आहे.

## तिसंगी

सांगलीपासून सुमारे २० ते २५ कि.मी. अंतरावर तासगाव तालुका आहे. तालुक्यापासून साधारणत: २५ कि.मी.अंतरावर तिसंगी गाव आहे. गावाच्या चारही बाजूला खडकाळ भाग आहे. अवर्षणाची छाया स्पष्टपणे या भागात दिसून येते. चहूकडे माळरानावर पवनचक्क्या बसवल्या आहेत. हा भाग अवर्षणग्रस्त असला तरी येथील द्राक्षांनी देशविदेशातील बाजारपेठेत मानाचे स्थान मिळवले आहे.

तिसंगी गावात प्रवेश करताच डाव्या हाताला ग्रामपंचायत कार्यालय आहे. सरपंच वामन कदम गावात झालेल्या जलयुक्त शिवारच्या कामाबद्दल भरभरून सांगत होते. मात्र, काम झाल्यापासून गावात पाऊस पडला नाही. त्यामुळे या वर्षी चातकासारखे पावसाची वाट पाहत असल्याचे त्यांनी सांगितले. या गावात द्राक्षांचे उत्पादन घेतले जाते. टँकरच्या पाण्यावर द्राक्ष बागा जगवल्या जातात.

सरपंच श्री. कदम यांनी थेट मुख्यमंत्र्यांशी बोलण्याचा अनुभव कथन केला. पहिल्यांदाच सीएम साहेबांशी बोलताना थोडा दबाव आला. मात्र, या भागातील दुष्काळी उपाययोजनासंदर्भात प्रश्न मांडताना हा दबाव जाणवला नाही. सीएम साहेबांनीदेखील माझे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. मुख्यमंत्री यांना गावचे प्रश्न सांगितले. गावात चारा छावणी सुरू करावी अशी मागणी केल्यानंतर तहसीलदारांनी विविध स्वयंसेवी संस्थेबरोबर बैठका घेऊन चारा छावणी सुरू करण्याबाबतची तपासणी केली. पण इथे स्वयंसेवी संस्था पुढे येण्यास तयार नाही. मात्र, आता याबाबत शासनाने लक्ष घालणे आवश्यक आहे. गावची लोकसंख्या साधारण तीन हजार असून गावकरी साठवून ठेवलेल्या पाण्यावर द्राक्षाची शेती करतात. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा असून जनावरांना देण्यात येणारा चारा शेतकरी विकत घेतात. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी कायमस्वरूपी तोडगा निघावा अशी मागणी त्यांनी केली.

राज्याच्या प्रमुखांनी तळागाळातल्या सरपंचांशी थेट संवाद साधण्याची ही पहिलीच वेळ असल्याने त्याचा प्रभाव आणि परिणाम प्रशासनावर जाणवला. श्री. कदम पुढे म्हणाले, सीएम साहेबांच्या फोननंतर प्रशासनाच्या माध्यमातून फॉलोअप सुरू झाले. अधिकारी आमच्या गावात आले. त्यांनी वस्तुस्थिती जाणून घेतली. आपल्या मागण्यांवर निराकरण करण्याचे काम सुरू असल्याचा संदेश व्हॉट्सअपवर आला. वासुंदे गावच्या सरपंच छाया थोरात, शिरगावच्या स्मिता कळसे, मांजर्डेचे प्रशांत रणथांबे, भैरववाडीचे शशिकांत सदाशिव या सरपंचांनी मुख्यमंत्र्यांशी झालेल्या संवादामुळे दुष्काळाशी निगडित काही प्रश्न निकाली निघाल्याचे सांगतानाच दीर्घकालीन उपाययोजना करण्याची मागणी केली.

सांगली जिल्ह्यातील सरपंच ते अधिकारी यांच्याशी जवळपास तासभर मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. प्रथमच राज्याच्या प्रमुखाने सरपंच, ग्रामसेवक, तहसीलदार यांच्या माध्यमातून गावात दुष्काळाची नेमकी काय परिस्थिती आहे, काय करता येईल जेणेकरून गावात पिण्यासाठी पाणी देता येईल हे जाणून घ्यायचा प्रयत्न केला. याद्वारे दुष्काळ निवारण करताना एकदिलाने संकटांशी सामना करू या असा धीर मुख्यमंत्र्यांनी दिला तो महत्त्वाचा आहे.

**वरिष्ठ सहायक संचालक**

**गेल्या वर्षी राज्यात सरासरीच्या ७७ टक्के पाऊस पडल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. ऑक्टोबर–नोव्हेंबरपासूनच दुष्काळाची चाहूल लागण्यास सुरू झाली. हवामानातील बदल, अनियमित पर्जन्यमान यामुळे ग्रामीण भागात पाणी टंचाई जाणवू लागली. संभाव्य दुष्काळ निवारणासाठी व त्यावर मात करण्यासाठी शासनाने वेळीच उपाययोजना सुरू केल्या. नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यावर उपाय योजण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध गावांतील सरपंचांशी मोबाइलच्या माध्यमातून (ऑडिओ ब्रिजद्वारे) थेट संपर्क साधला.**

# यंत्रणा सज्ज आणि सक्रिय

**नंदकुमार वाघमारे**

गेल्या काही वर्षापासून राज्यात पावसाचे प्रमाण कमी होत आहे. भूजल साठा वाढवण्याच्या उपाययोजना अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे शासनाने गेल्या चार वर्षांपासून जलयुक्त शिवार अभियान राबवण्यास सुरुवात केली. त्यातून काही प्रमाणात शेतकऱ्यांना दिलासा मिळू लागला. मात्र, गेल्या वर्षी पावसाचे प्रमाण हे सरासरीपेक्षा कमी झाले. त्यामुळे यंदाच्या उन्हाळ्यात पाणी टंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये दुष्काळाची चाहूल लागल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल, मदत व पुनर्वसन मंत्री चंद्रकांत पाटील यांनी तातडीने प्रशासनास राज्यातील पीक परिस्थितीची पाहणी करण्याचे निर्देश दिले. राज्याच्या अहवालानंतर केंद्र शासनाच्या पथकाने राज्यातील स्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर १५१ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित करण्यात आला. या तालुक्यांमध्ये विविध आठ सवलती घोषित करण्यात आल्या. त्यानंतरही शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन व टंचाई परिस्थिती पाहून शासनाने स्वतः च्या आपत्ती व्यवस्थापन निधीतून शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला. पहिल्यांदा २६८ मंडळांमध्ये त्यानंतर सुमारे ५० पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या ५४४९ गावांमध्ये दुष्काळी सवलती लागू केल्या. या गावांमध्ये आठ सवलती देण्यास सुरुवात केली.

एकीकडे राज्यातील दुष्काळ

## चारा छावण्या



ग्रामीण भागात जनावरांच्या चाऱ्याची टंचाई जाणवू लागल्यामुळे पशुसंवर्धन विभागमार्फत चारा छावण्या व पशुधन साहाय्यता शिबिरे सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला. पशुधनांची योग्य काळजी घेतली जावी, योग्य प्रमाणात खाद्य, पाणी मिळावे, यासाठी विशेष लक्ष देण्यात आले. किमान ३०० व कमाल ३ हजार लहान–मोठी जनावरे असलेल्या छावणीस मंजुरी देण्यात आली. जनावरांची मर्यादा ओलांडल्यानंतर दुसऱ्या छावणीस मंजुरी देण्यात येत आहे. १५ मे पर्यंत १,४१७ छावण्या सुरू करण्यात आल्या होत्या. यामध्ये लहान मोठी मिळून ९ लाख ३९ हजार ३७२ जनावरे दाखल झाली होती. या छावण्यांसाठी औरंगाबाद विभागासाठी १११ कोटी, पुणे विभागासाठी ४ कोटी व नाशिक विभागात ४७ कोटींचे अनुदान वितरित करण्यात आले.

छावणीतील पशुधनासाठी केंद्र शासनाच्या निकषांप्रमाणे पहिल्यांदा मोठ्या जनावरांसाठी ७० रुपये व लहान जनावरांसाठी ३५ रुपये प्रतिदिन अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, हे अनुदान अपुरे पडत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यामध्ये वाढ करून मोठ्या जनावरांसाठी ९० रुपये व लहान जनावरांसाठी ४० रुपये असे अनुदान देण्यात आले. छावणीतील प्रत्येक मोठ्या जनावरास १८ किलो हिरवा चारा/उसाचे वाडे/ऊस व १ किलो पशुखाद्य आणि लहान जनावरांना ९ किलो हिरवा चारा/ऊसाचे वाडे/ऊस व १ किलो पशुखाद्य देण्याच्या सूचना छावणी चालकांना देण्यात आल्या. पाणी व चारा लांबून आणण्यात येत असल्यामुळे अनुदानात वाढ करण्याची मागणी आली. त्यानंतर मोठ्या जनावरासाठी १०० रुपये व लहान जनावरांसाठी ५० रुपये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

निवारणासाठी उपाययोजनांची अंमलबजावणी करत असतानाच केंद्र शासनाकडून मदत मिळवण्यासाठी मुख्यमंत्री केंद्राकडे पाठपुरावा करत होते. केंद्राची मदत येण्यापूर्वीच राज्यातील १५१ तालुक्यांमधील पीक नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आकस्मिक निधीतून दोन हजार कोटी रुपये देण्यात आले. त्यानंतर केंद्र शासनाने मार्चच्या पहिल्या आठवड्यात ४५६२.८८ कोटी रुपयांची मदत जाहीर केली. त्यातून १० मेपर्यंत ४ हजार ४१२ कोटी रुपयांचा निधी राज्यातील ६७ लाख ३० हजार ८६५ शेतकऱ्यांच्या थेट खात्यात देण्यात आला आहे. उर्वरित शेतकऱ्यांना निधी देण्याचे काम वेगाने सुरू आहे.

## पाणी टंचाईवरील उपाययोजना

पाऊस नसल्यामुळे अनेक गावांमध्ये पाणी टंचाई जाणवू लागली होती. याची दखल घेऊन शासनाने तयारी सुरू केली. अनेक गावांमध्ये जुन्या पाणीपुरवठा योजना या दुरुस्तीअभावी अथवा वीज देयकाअभावी बंद पडल्या होत्या. त्यामुळे गावांमध्ये पाणी मिळत नव्हते. त्यासाठी जुन्या पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तीवर विशेष लक्ष पुरवण्यात आले. नादुरुस्त असलेल्या पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेऊन त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याचे आदेश देण्यात आले. मेपर्यंत १२९ गावे व ४ वाड्यांमधील १४३ योजनांची दुरुस्ती पूर्ण करण्यात आली.

## नळ पाणीपुरवठ्यांना प्राधान्य

वीज देयक न भरल्यामुळे बंद पडलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांसाठीही शासनाने मोठा निर्णय घेतला. अशा योजनांच्या थकीत वीज देयकाची रक्कम राज्य शासनामार्फत भरण्यात आली. अशा ३,३२० योजनांचा विद्युत पुरवठा सुरू करण्यात आला. नोव्हेंबर २०१८ ते जून २०१९ या कालावधीतील विद्युत देयके भरण्यासाठी शासनामार्फत १३८.७८ कोटी निधी देण्यात आला. तात्पुरत्या नळ पाणीपुरवठा योजना सुरू करणे, विंधन विहिरी/कूपनलिका घेणे, विंधन विहिरींची दुरुस्ती, खासगी विहीर अधिग्रहण, प्रगतिपथावरील नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण करणे, विहीर खोलीकरण/गाळ काढणे अशी कामे करण्याचे निर्देश देण्यात आले. मे महिन्यापर्यंत ५,९४४ गावे व २,६१० वाड्यांमधील ९,५४६ कामे पूर्ण झाली आहेत.


नळ पाणीपुरवठा योजना सुरू करणे, राष्ट्रीय पेयजल व मुख्यमंत्री पेयजल योजनेत गावांचा समावेश करणे आदी दीर्घकालीन उपाययोजनांबरोबर तातडीच्या उपाययोजना सुरू करण्यासही प्रशासनास सूचना देण्यात आल्या. त्यानुसार ग्रामस्थांनी मागणी केल्यास तातडीने टँकर पुरवण्याच्या सूचना मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांनी दिल्या. टँकर सुरू करण्यात अडचणी येऊ नयेत, यासाठी टँकर मंजुरीचे अधिकार तहसीलदारांकडे देण्यात आले. १५ मे पर्यंत राज्यातील ४,३३१ गावे व ९,४७० वाड्यांमध्ये ५,४९३ टँकर सुरू करण्यात आले. पूर्वी २०११ च्या लोकसंख्येनुसार गावांना टँकर पुरवण्यात येत होते. मात्र, मुख्यमंत्र्यांनी विशेष निर्णय घेत २०१८ च्या लोकसंख्येनुसार टँकर पुरवण्याचे आदेश दिले. अनेक गावांमध्ये ग्रामस्थांसाठी पाणी मिळत असले तरी जनावरांसाठी पाणी देण्याची मागणी होती. त्यामुळे जनावरांची संख्या लक्षात घेऊन पाणी पुरवण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार टँकरचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## वैरण उत्पादन

१५१ दुष्काळी तालुके व २६८ महसुली मंडळामध्ये १५ जून २०१९ पर्यंत १४४.४२ मे.टन वाळलेल्या चाऱ्याची आवश्यकता आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत वैरण उपलब्धता वाढवण्यासाठी ५८ हजार ८२१ हेक्टर क्षेत्रावर वैरण उत्पादन घेण्यात येत असून त्यातून २९.४ लाख मे.टन हिरव्या वैरणीचे उत्पादन होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना ३५ कोटींचा निधी देण्यात आला आहे. यंदा प्रथमच १७ हजार ४६५ हेक्टर गाळपेर क्षेत्रावर वैरण उत्पादन घेण्यात येत आहे.

## मजुरांच्या हाताला काम

दुष्काळी भागातील नागरिकांच्या हाताला काम मिळावे, यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून अनेक कामांना मंजुरी देण्यात आली. त्यातून मे महिन्याच्या मध्यापर्यंत ३६ हजार ६६० कामे सुरू करण्यात आली. ३ लाख ४० हजार



९५२ मजुरांना कामे देण्यात आली. ज्या ठिकाणी कामांची मागणी आहे, तेथे काम देण्याच्या सूचना प्रशासनास देण्यात आल्या. ५ लाख ७४ हजार ४३० कामे शेल्फवर ठेवण्यात आली आहेत. रोहयोवरील मजुरांना वेळेत मजुरी मिळावी, यासाठी विशेष यंत्रणा सुरू करण्यात आली. २८ प्रकारची कामे नरेगाअंतर्गत कन्व्हर्जनच्या माध्यमातून करता येतात. दुष्काळग्रस्त गावातील ग्रामपंचायतींनी त्यातून अधिकाधिक कामे घ्यावीत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

## 'संवाद सेतू'

दुष्काळी भागातील नागरिकांच्या अडचणी जाऊन घेण्यासाठी, दुष्काळ निवारणासाठी येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्यावर उपाय योजण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी गावातील सरपंचांशी मोबाइलच्या माध्यमातून (ऑडिओ ब्रिज)थेट संपर्क साधला. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून प्रशासन गतिमान करण्याचा आगळावेगळा प्रयोग मुख्यमंत्र्यांनी या वेळी केला. त्यांनी दुष्काळग्रस्त तालुक्यांतील लोकप्रतिनिधी–



अधिकाऱ्यांशी संवाद साधून अडचणी जाणून घेतल्या. प्रशासनाला कार्यवाहीचे निर्देश देतानाच प्रत्येक तक्रारीचे निवारण करण्याची व्यवस्था उभारली. या उपक्रमातून ८८४ सरपंच थेट मुख्यमंत्र्यांशी बोलले. ज्यांना संवादात सहभागी होता आले नाही, त्यांच्यासाठी एकूण १७ व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले. या व्हॉट्सॲपच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयात निवारणासाठी पाठपुरावा करण्याची यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे.

दुष्काळ निवारण उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी महसूलमंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीची दर मंगळवारी बैठक होत असते. यामध्ये झालेल्या कामांचा आढावा घेऊन दिलेल्या निर्देशांवर कार्यवाही करण्यासाठी विभागीय व जिल्हा प्रशासनास सूचना देण्यात येतात. मुख्य सचिव, विविध विभागांचे सचिवही या परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहेत.

पावसाळा सुरू होईपर्यंत पाणी टंचाई जाणवू नये, यासाठी प्रशासनाने उपाय योजण्यास सुरुवात केली आहे. जुलै २०१९ अखेरपर्यंत पाण्याची कमतरता भासणार नाही याबाबत नियोजन करण्याच्या तसेच आवश्यकतेनुसार व उपलब्धतेनुसार आवर्तन सोडण्याबाबत संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्या आहेत. सध्याच्या दुष्काळ निवारणासाठी उपाय योजनांबरोबरच तो कायमस्वरूपी दूर करण्याचे ध्येय मुख्यमंत्र्यांनी ठेवले आहे. त्यासाठी जलसंधारणाच्या कामांबरोबर विविध पाणीपुरवठा योजनांच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

## आमदार निधी

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी आमदार स्थानिक विकास निधीचा उपयोग करण्यास मान्यता देण्याचा शासन निर्णय शासनाने जारी केला आहे. यामध्ये चारा छावण्यांसाठी विविध सोयी उपलब्ध करून देण्याची महत्त्वाची तरतूद करण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षातील विधिमंडळ सदस्यांना अनुज्ञेय असलेल्या २५ लाख रुपये इतक्या निधीतून दुष्काळ निवारणासाठी विविध १३ प्रकारची कामे करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## शेळ्या–मेंढ्यांसाठी चारा छावणी

दुष्काळी भागात सुरू असलेल्या चारा छावण्यांमधील जनावरांसाठी टँकरद्वारे पाणी देण्याचा तसेच राज्यात प्रथमच शेळ्या–मेंढ्यांसाठी छावणी सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## कृत्रिम पाऊस

राज्यात उद्‌भवलेल्या तीव्र दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी पाण्याच्या उपलब्धतेसाठी आवश्यक त्या सर्व तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून पर्जन्यवाढीसाठी एरिअल क्लाऊड सीडिंगची उपाययोजना करून कृत्रिमरीत्या पाऊस पाडण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. राज्यात कमी पाऊस पडल्याने यंदा दुष्काळी परिस्थिती असून, बहुतांशी भागांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली आहे. अशा वेळी पर्जन्यमानात वाढ होणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाच्या पातळीवर विविध उपायांचा अवलंब करण्याबाबत विचारविनिमय सुरू आहे. कृत्रिम पर्जन्यमान हा त्यातलाच एक भाग आहे. सुयोग्य ढगांची उपलब्धता बघून राबवण्यात येणाऱ्या या उपाययोजनेबाबत अगोदरच निर्णय घेऊन पूर्वनियोजन करणे आवश्यक असल्याने एरिअल क्लाऊड सीडिंग करून पर्जन्यवाढ करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यासाठी ३० कोटी रुपयांच्या खर्चाच्या प्रस्तावासही मंजुरी देण्यात आली आहे.

परदेशात एरिअल क्लाऊड सीडिंगच्या प्रयोगातून २८ ते ४३ टक्क्यांपर्यंत पर्जन्यमान वाढल्याचे आढळून आले आहे. राज्यातील मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षणग्रस्त भागात क्लाऊड सीडिंगच्या माध्यमातून पाऊस पाडला जाणार आहे. त्यासाठी औरंगाबाद येथे सी बॅन्ड डॉपलर रडार आणि विमान सज्ज ठेवण्यात येणार आहे. सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता असल्यास अशा वेळी कृत्रिम पावसाचा प्रयोग केल्यास पर्जन्यमान वाढण्यास मदत होऊ शकते. त्याचा जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून झालेल्या कामांनाही लाभ होईल. तसेच भूगर्भातील पाणीसाठ्यातही वाढ होण्यास मदत होईल.

**सहायक संचालक (माहिती)**



**अल्प पाऊस, त्यामुळे उपलब्ध पाण्याची कमतरता आणि प्रखर उन्हामुळे राज्यात टंचाई परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष भेडसावत आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाच्या वतीने विविध उपाययोजना प्रभावीरीत्या राबवण्यात येत आहेत.**

# जनावरांना चारा आणि पिण्याचे पाणी

**डॉ. दीपक म्हैसेकर,** विभागीय आयुक्त, पुणे

पुणे विभागातील एकूण ५८ तालुक्यांपैकी २६ तालुक्यांमध्ये पूर्णत: तर २१ तालुक्यांत अंशत: दुष्काळ जाहीर केलेला आहे. विभागातील एकूण ६ हजार ७३५ महसुली गावांपैकी ३ हजार ८६३ गावे दुष्काळाने बाधित आहेत. पुणे, सातारा, सांगली आणि सोलापूर या जिल्ह्यांमधील गावांमध्ये व त्यामधील वाड्या-वस्त्यांमध्ये टंचाई परिस्थिती जाणवत आहे. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, मंगळवेढा, करमाळा, बार्शीसह अन्य तालुके, सातारा जिल्ह्यातील माण, खटाव, कोरगाव, फलटणसह काही भाग, सांगली जिल्ह्यातील जत, आटपाडी, तासगांव, कवठेमहांकाळ, खानापूर, पुणे जिल्ह्यातील इंदापूर, बारामती, शिरुर, पुरंदर या तालुक्यांत टंचाई अधिक प्रमाणात आहे.

## प्रशासनाला सूचना

विभागातील सातारा, सांगली व सोलापूर या जिल्ह्यांमध्ये टंचाई परिस्थिती आहे. या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आणि विविध उपाय योजना राबवण्यासाठी दुष्काळी भागात दौरे केले आहेत. या ठिकाणी शेड, विद्युत व्यवस्था व अग्निशमन यंत्रणा असल्याची पाहणी केली. चारा छावणीत दाखल झालेल्या सर्व पशुधनाचे लसीकरण करून पशुखाद्याच्या गुणवत्तेची तपासणी करावी, पशुपालक समितीची नियमित बैठक घेण्यात यावी, आजारी जनावरांची स्वतंत्र व्यवस्था ठेवावी, चारा छावण्यांचे संचालन काटेकोरपणे करावे, अशा सूचना दिल्या आहेत.

टँकर मागणी नोंदवही ठेवावी, टँकर मागणीचा प्रस्ताव आल्यानंतर त्यावर तत्काळ कार्यवाही करावी. टँकरवर संनियंत्रण ठेवण्यासाठी टँकरवर जी.पी.एस.यंत्रणा बसवलेली आहे तिचे भ्रमणध्वनीवरून संनियंत्रण करावे. याबाबतच्या नोंदवह्या अद्ययावत ठेवाव्यात. टँकर भरण्याच्या ठिकाणी पाण्याच्या निर्जंतुकीकरणासाठी चांगल्या दर्जाचे विरंजक चुर्ण (ब्लिचिंग पावडर) पुरेशा प्रमाणात ठेवावे. प्रत्येक खेपेच्या वेळी पाणी पुर्णपणे निर्जंतुक झाले असल्याची चाचणी घ्यावी. यासाठी वैद्यकीय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली पथक नेमावे, अशा सूचना दिल्या आहेत.

## चारा छावण्या सुरु

टंचाई परिस्थितीमुळे गावांमध्ये अपुरा पाणीपुरवठा, भीषण चाराटंचाई निर्माण झाली



आहे. त्यामुळे जनावरांना पाणी आणि चारा पुरवण्याची समस्या पशुपालकांना भेडसावत आहे. जनावरांच्या सोयीसाठी शासनामार्फत चारा छावण्या सुरू करण्यात आल्या आहेत. विभागात आतापर्यंत २८६ चारा छावण्या सुरू करण्यात आल्या आहेत.

चारा छावण्यांमधील जनावरांना सकस आहार देण्यात येत आहे. जनावरांचे उन्हापासून संरक्षण होण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. छावणीतील जनावरांचे लसीकरण, लहान जनावरांचे निर्जंतुकीकरण करण्यात येत आहे. त्यांच्यासाठी पेंड, मूरघास, वाळलेले गवत, चारा-पिके, उसाचे वाडे यापासून उपलब्ध झालेला चारा जनावरांना पुरवण्यात येत आहे. पुरेसा चारा, पाणी आणि औषधे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. चारा छावणीमध्ये दाखल झालेल्या मोठ्या जनावरास प्रतिदिन १८ किलो ग्रॅम हिरवा चारा, ऊसाचे वाडे, ऊस व १ दिवस आड १ किलो ग्रॅम पशुखाद्य दिले जाते. तर लहान जनावरास प्रतिदिन ९ किलोग्रॅम हिरवा चारा, ऊसाचे वाडे, ऊस व आठवड्यातून ३ दिवस १ दिवस आड अर्धा किलोग्रॅम पशुखाद्य दिले जाते.

## टँकर्सनी पाणीपुरवठा

विभागात टँकर भरून घेण्यासाठीचे स्त्रोत निश्चित करण्यात आले आहेत. विभागात गावे आणि वाड्या-वस्त्यांतील बाधित लोकांपर्यंत (मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत) ९७६ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. यात ४४ शासकीय तर ९३२ हे खासगी टँकर्स आहेत. सर्वात जास्त सोलापूर जिल्ह्यात २९० टँकर्सने तर सातारा जिल्ह्यात २५४, पुणे जिल्ह्यात २४४ व सांगली जिल्ह्यात १८८ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

पाणीटंचाई असणाऱ्या गावांतून मागणी आल्यास अशा गावांना उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी भेट देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आवश्यक असल्यास तत्काळ टँकरद्वारे पाणी पुरवण्यात येत आहे.

पुणे विभागात १ ऑक्टोबर ते ३० जून २०१८ या कालावधीसाठी ८२ कोटी ६४ लाख रुपयांचा टंचाई कृति आराखडा तयार करण्यात आला. या आराखड्यांतर्गत नवीन विंधन विहिरी घेणे तसेच दुरुस्ती करणे, नळ पाणीपुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती, नवीन नळ पाणीपुरवठा योजना करणे, टँकरने पाणीपुरवठा करणे, विहिरींचे अधिग्रहण करून गाळ काढणे अशी कामे करण्यात येत आहेत.

## धरणातील पाणीसाठा

उन्हाच्या तीव्रतेमुळे विभागातील धरणांमधील पाणीपातळी खालावली आहे. सद्य:स्थितीत पुणे विभागात एकूण १ हजार ८५ मोठे, मध्यम, लघु व कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यात एकूण ११.५५ टक्के म्हणजेच १ हजार ६२२.९ द.ल.घ.मी. इतका उपयुक्त पाणीसाठा आहे. यापैकी पुणे जिल्ह्यात ४०३.३ द.ल.घ.मी.(९टक्के), सोलापूर जिल्ह्यात १८.७ द.ल.घ.मी.(१ टक्के), सातारा जिल्ह्यात ७०१.९ (१५ टक्के), सांगली जिल्ह्यात १७९ द.ल.घ.मी. (१७ टक्के) इतका उपयुक्त पाणीसाठा आहे. सातारा जिल्ह्यातील कोयना धरणात उपयुक्त पाणीसाठी १६.२१ टक्के (१६.२३ टीएमसी) पुणे जिल्ह्यातील खडकवासला धरणात उपयुक्त पाणीसाठा २९.६७ टक्के (०.५९ टीएमसी) भाटघर धरणात उपयुक्त पाणीसाठा ६.१६ टक्के (१.४५.टीएमसी) आहे. उजनी धरणातील उपयुक्त पाणीसाठा संपला आहे.

## रोजगार हमी योजना

पुणे विभागात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सध्या ग्रामपंचायती मार्फत १ हजार ८६२ कामे सुरू असून त्यावर २१ हजार ५९ मजूर काम करत आहेत. तसेच विविध शासकीय यंत्रणेमार्फत ६३२ कामे सुरू असून त्यावर १२ हजार ९८ मजूर, अशी एकूण २ हजार ४९४ कामे सुरू असून त्यावर ३३ हजार १७५ मजूर काम करत आहेत. जलसंधारणासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

जलयुक्त शिवार अभियानात २०१८-२०१९ मध्ये ६०२ गावे सहभागी झाली आहेत. यात ११ हजार ६९ कामे प्रस्तावित आहेत. यापैकी ८ हजार ४४६ कामे पूर्ण झाली असून १ हजार ८२५ कामे प्रगतिपथावर आहेत. मागेल त्याला शेततळे योजनेंतर्गत देखील बहुतांशी कामे पूर्ण झाली आहेत. रोजगार हमी योजनेंतर्गत सार्वजनिक कामांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास जिल्हा प्रशासनामार्फत तात्काळ मंजुरी देण्यात येत आहे.

## दुष्काळ निवारण समन्वय कक्ष

प्रत्येक जिल्ह्यात निवासी उपजिल्हाधिकारी यांना दुष्काळ नियंत्रण समन्वय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. नियंत्रण कक्ष दूरध्वनी क्रमांक : पुणे ०२०-२६१२२११४, सोलापूर ०२१७४-२७३१००२, सातारा ०२१६२-२३६१३३, सांगली ०२३३-२६०००५९ व कोल्हापूर ०२३१-२६५४८१२.

**शब्दांकन : वृषाली पाटील**
साहाय्यक संचालक(माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, पुणे

# सातारा

युवराज पाटील

सातारा जिल्ह्यातील माण, खटावमध्ये दुष्काळाला कायमचे संपवण्यासाठी जलसंधारणाची अनेक कामे झाली, मात्र अपुऱ्या पावसामुळे त्या प्रयत्नांचे यश पावसावर अवलंबून आहे. माण तालुक्यात गेल्या दोन-तीन वर्षांपासून अत्यल्प पाऊस झाला. यावर्षीतर टंचाईची मोठी तीव्रता आहे. पशुधन वाचवण्याचे पशुपालकांसमोर मोठे संकट उभे होते, चारा छावण्या सुरू झाल्याने या छावण्या संकटमोचक ठरल्या असल्याच्या भावना चारा छावणीतील पशुपालकांनी व्यक्त केल्या.

जिल्ह्यातील माण, खटाव, कोरेगाव, खंडाळा, फलटण, वाई, पाटण, जावळी, महाबळेश्वर, कराड व सातारा या तालुक्यांतील गावांना टँकरने पाणीपुरवठा केला जातो. टंचाईवर मात करण्यासाठी जिल्ह्यातील एकूण १३० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. माण तालुक्यात ७ टँकर फीडिंग पॉइंट, खटाव तालुक्यात ३, फलटण, कोरेगाव ७, खंडाळा तालुक्यात १ असे टँकर फीडिंग पॉइंट आहेत.





## अतिदुर्गम भागात टँकर पोहोचला

रेंगडी हे गाव जावली तालुक्यात सह्याद्रीच्या डोंगर कपाऱ्यात अतिदुर्गम भागात आहे. येथे प्रचंड चढाव असल्यामुळे जड वाहन जाणे अशक्य असते. या गावाची सरासरी लोकसंख्या ३०० आहे. गावात भरपूर पाऊस पडतो परंतु उन्हाळ्यात गावातील नागरिकांना पिण्यासाठी पाणी नसते. या गावात भीषण टंचाई असल्यामुळे गावाला प्रशासनाकडून टँकर सुरू करण्यात आला. या गावात सार्वजनिक बांधकाम विभागाचा १० हजार लीटरचा टँकर पहिल्यांदाच गावात पोहोचला.

या गावात पाण्याचा टँकर पोहोचवणे म्हणजे मोठे जोखमीचे काम होते. या जोखमीवर मात करून टँकर चालक राजेंद्र ढाणे यांनी पहिल्यांदाच या गावात पाण्याचा टँकर पोहोचवला. गावकऱ्यांनी टँकरची पूजा करून स्वागत केले. टँकर चालक श्री. ढाणे यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला. श्री. ढाणे यांनी सैन्यामध्ये रणगाडा चालक म्हणून १८ वर्ष सेवा केलेली आहे. या टँकरचा फीडिंग पॉइंट माळेवाडी ता. जावळी येथे आहे. रेंगडी ते माळेवाडी ५० किलोमीटर अंतर आहे. गावातील नागरिकांची व पशुधनाची तहान भागवण्यासाठी श्री. ढाणे रोज एक टँकरची खेप करतात.

भरपूर पाऊस पडूनही यंदाच्या वर्षी भीषण टंचाईचा सामना गावाला करावा लागत आहे. पाण्याचे झरे, विहिरी आटल्या आहेत. पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला. प्रशासनाने टँकर सुरू केल्याने जनावरांच्या व आमच्यासाठी पाणी मिळू लागले, अशा भावना रेंगडीतील ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

चारा छावण्यांमध्ये शासनाच्या निकषानुसार जनावरांना चारा, पेंड व पाणी देण्यात येते. चारा छावणीत येणाऱ्या प्रत्येक जनावराच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. जनावरांचा सांभाळ करणे ही बांधलकी समजून सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याचे छावणी चालक धर्मराज जगदाळे यांनी सांगितले.

**अनिता बरकडे पिंगळी बु (ता.माण) :** गेल्या दोन-तीन वर्षांपासून अत्यल्प पाऊस झाला आहे. प्यायला पाणी नाही, जनावरांना चारा नाही अशा परिस्थितीत मी माझी जनावरे घेऊन चारा छावणीत आले. छावणीत सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या असून रोज जनावरांना चारा, पेंड, पाणी तसेच जनावरांच्या आरोग्यासाठी रोज पशुवैद्यकीय अधिकारी छावणीतील जनावरांची तपासणी करतात.

**जिल्हा माहिती अधिकारी, सातारा**

# औरंगाबाद

श्याम टरके

दुष्काळात राबवावयाच्या सर्व उपाययोजना काटेकोरपणे राबवण्याला प्रशासनाने प्राधान्य दिले आहे.

## पाणी पातळीत घट व उपाययोजना

औरंगाबादची लोकसंख्या जवळपास ३७ लक्ष. जिल्ह्यात एकूण नऊ तालुके. नऊ तालुक्यातील १३५५ गावांमध्येही दुष्काळ आहे. यंदा पर्जन्यमान कमी असल्याने भूजल पातळी घटली. औरंगाबाद तालुक्यात -१.०३, पैठण-२.५१, फुलंब्री -१.६६, वैजापूर -१.६१, गंगापूर-१.६५, खुलताबाद-.०७४, सिल्लोड-२.०३, कन्नड-१.४९, सोयगाव -१.६९ मीटरने भूजल पातळीत घट झाली. त्यामुळे पाण्याची निकड पाहता जिल्हा प्रशासनाने टंचाई निवारणार्थ ऑक्टोबर २०१८ ते जून २०१९ आराखडा तयार केला. त्या दृष्टीने अंमलबजावणी सुरू आहे. नवीन विंधन विहिरी घेणे, सार्वजनिक विहिरी खोल करणे, तात्पुरती पूरक पाणीपुरवठा योजना, खासगी विहिरींचे अधिग्रहण करणे, टँकर सुरू करणे आदी बाबींचा यात समावेश आहे.

## पाण्याचे टँकर

पाणी टंचाई निवारण्यासाठी टँकरद्वारे जिल्ह्यात पाणीपुरवठा करण्यात येतो आहे. जिल्ह्यातील ७३८ गावांमध्ये, २७० वाड्यांवर ११३५ टँकरद्वारे जवळपास दोन हजार खेपा मारल्या जाताहेत. ५५४ खासगी विहिरीतून गावांना पाणीपुरवठा करण्यात येतो आहे. सर्वाधिक २०२ टँकर औरंगाबाद तालुक्यात आहेत.

## हाताला काम

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून १४ हजार ७०८ मजूर विविध ११२१ ठिकाणी काम करत आहेत. २०१९-२० साठी २७ लक्ष ८७ हजार ३३ रुपयांच्या अर्थसंकल्पाची मजुरांसाठी तरतूद आहे. सध्या ६४,७६७ कामे तयार तयार आहेत. मजूर मागणी आल्यास मजुरांना ही कामे देण्यात येतील.

सध्या चालू कामांमध्ये वैयक्तिक आणि सार्वजनिक लाभाची विविध विभागांमार्फत १०४६ कामे सुरू आहेत. तर सार्वजनिक कामे वन विभागाच्यावतीने होत आहेत. वैयक्तिक लाभ योजनेत फळबाग लागवड, वैयक्तिक सिंचन विहीर, आणि सार्वजनिक योजनेमध्ये सार्वजनिक विहीर, घरकूल आदी कामे करण्यात येत आहेत.

## चारा छावणी

अपुऱ्या पावसाने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, पाण्याचा प्रश्न पशुपालकांना सतावतो. मात्र, प्रशासनाने जिल्ह्यात ५६ चारा छावण्यांना मंजुरी दिली आहे. २१,१०७ जनावरे छावणीत आली आहेत. त्यांना मुबलक चारा, पाणी व पशुखाद्य देण्यात येते.

फुलंब्री तालुक्यातील पाल येथे सिद्धेश्वर कृषी व ग्रामीण विकास संस्थेच्यावतीने शासकीय अनुदानित चारा छावणी उभारण्यात आली. या जनावरांना नियमाप्रमाणे खाद्यान्न वेळेवर देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. जवळची रक्कम गुंतवून ही खासगी छावणी सुरू करण्यात आली आहे. पाल गावच्या परिसरातील जवळपास सहा गावातील जनावरे या ठिकाणी दाखल झाली आहेत, असे संस्थेचे सचिव रामदास जाधव यांनी सांगितले. माझ्याकडील चार जनावरे या ठिकाणी मी दावणीला बांधून ठेवली आहेत. त्यामुळे त्यांच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्न मिटल्याचे पशुपालक संतोष शिंदे यांनी सांगितले.

खुलताबाद तालुक्याच्या बाजारसावंगी येथे शासनाच्यावतीने विद्यानंद सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या सहकार्याने चारा छावणी उभारण्यात आली आहे. विद्यानंद सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थेची छावणी पंडित मानाजी काटकर यांच्या शेतात उभारण्यात आली आहे. या ठिकाणी पशुपालकांच्या जनावरांना पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी सिमेंटचे हौद बांधले आहेत. त्यात पाण्याचा मुबलक साठा जनावरांसाठी असतो. आजूबाजूच्या परिसरातील शेतकरी या ठिकाणी जनावरे आणून ठेवत आहेत. या ठिकाणी योग्य प्रकारे पशुंची निगा राखली जात असल्याचे श्री. काटकर सांगतात. जनार्दन साहेबराव जाधव म्हणतात, माझी एकूण सहा एकर शेती आहे. परंतु जनावरांना आवश्यक असणारा चारा शेतात अपुऱ्या पावसामुळे पिकला नाही. त्यामुळे या छावणीत जनावरे दाखल करावी लागली. शासनाच्या या छावणीत जनावरांना मुबलक प्रमाणात आणि वेळेवर चारा व पाणी मिळत आहे.



**माहिती सहायक, औरंगाबाद**

# जालना

अमोल शिवकांत महाजन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्ह्यातील संरपंचांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा ऐकून घेत दुष्काळ निवारणाची कामे त्वरेने मार्गी लावण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले. यामुळे घनसावंगी तालुक्याच्या पारडगाव येथील ग्रामस्थांना अधिकच्या टँकरद्वारे पाणी पुरवठ्याची सोय उपलब्ध झाली. जिल्ह्यात टंचाई निवारणाची कामे वेगाने सुरू आहेत. ४२ चारा छावण्यांना मंजुरी देण्यात आली. त्यापैकी २४ चारा छावण्या सुरू आहेत.



## तात्पुरत्या पूरक पाणीपुरवठा योजना

ज्या गावातून तात्पुरत्या पूरक पाणीपुरवठा योजना व नळ पाणीपुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत. त्यांना तातडीने मंजुरी देऊन कामांना सुरुवात करण्यात येत आहे. जिल्ह्यात आजपर्यंत अशा ३५३ योजनांना मंजुरी देण्यात आली आहे.

## १६ हजार १७१ मजुरांना रोजगार

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात मागेल त्याला काम उपलब्ध करून देण्यात येत आहे. सद्य:स्थितीमध्ये रोहयोची ५८४ कामे सुरू असून या कामांवर १६ हजार १७१ मजुरांची उपस्थिती आहे.

## ६१४ टँकरद्वारे पाणीपुरवठा

४९६ गावे व ११२ वाड्यांना १९ शासकीय व ५९५ खासगी अशा एकूण ६१४ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

## दुष्काळ निधी

दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतपिकाचे नुकसान होऊन बाधित झालेल्या शेतकऱ्यांना ३३० कोटी रुपयांचे अनुदान वाटप करण्यासाठी संबंधित तहसीलदारांना देण्यात आले आहे. दुष्काळ निधीचे वाटप शेतकऱ्यांच्या खात्यावर करण्यात येत आहे. जे पात्र शेतकरी या अनुदानापासून वंचित आहेत अशा शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने हे अनुदान पाठवण्यात येत आहे.

## सरपंचांसोबतचा संवाद

सध्या दुष्काळावरील उपाययोजना दिलासा देणाऱ्या ठरत आहेत. जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्याच्या पारडगाव येथील ग्रामस्थांना अधिकच्या टँकरद्वारे पाणी पुरवठ्याची सोय उपलब्ध झाली.

घनसावंगी तालुक्यातील पारडगावची लोकसंख्या जवळपास ७ हजार एवढी असून पावसाच्या अत्यल्प प्रमाणामुळे गावाला २४ हजार लीटर क्षमतेच्या टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. परंतू हे पाणी अपुरे पडत असल्याने अतिरिक्त टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा अशी मागणी ग्रामस्थ कुरेशी शेख ईस्माईल यांनी केली. मुख्यमंत्र्यांनी पारडगावला तातडीने अधिकच्या टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. त्यानुसार पारडगावला २४ हजार लीटर क्षमतेच्या टँकरबरोबरच अधिकचे टँकर मंजूर केल्याने गावाला पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. रमजानच्या महिन्यात पारडगावला मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा करून गावकऱ्यांची तहान भागवल्याबद्दल ग्रामस्थांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस व जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहेत.

जाफ्राबाद तालुक्यातील कुंभारझरी या गावासाठी नळ पाणीपुरवठा विशेष दुरुस्ती योजना करणे आवश्यक असल्याचे गावचे सरपंच संजय चव्हाण यांनी मुख्यमंत्र्यांना ऑडिओ ब्रिजच्या माध्यमातून सांगितले. मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनास निर्देश देत गावासाठी तातडीने नळ पाणीपुरवठा विशेष दुरुस्ती योजना मंजूर करण्याचे निर्देश दिले. कुंभारझरी गावाच्या प्रस्तावास मान्यता देऊन कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

**माहिती सहायक,**
**जिल्हा माहिती कार्यालय, जालना.**

**नागपूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त काटोल तालुक्यातील कळंभा, मसली, झिलपा, डोरली आदी छोटेखानी गावातील विहिरी कोरड्या पडल्याने या गावांमध्ये दुष्काळाची दाहकता अधिक गडद झाली आहे. पाणीटंचाईमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. येथील दुष्काळ आणि टंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने सर्वच आघाड्यांवर प्रयत्न केले. तीन टप्प्यांमध्ये आराखडे तयार करून त्याची योग्य अंमलबजावणी केल्यामुळे दुष्काळग्रस्त काटोलमध्ये विहिरींना खळाळून पाणी लागले असून येथील गावे पाणीदार झाली आहेत.**

# उन्हाळ्यातही पाणी...



**अपर्णा डांगोरे – यावलकर**

काटोल तालुक्यातील मौजा कळंभा येथील लोकसंख्या १२३८ एवढी. या गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीने तळ गाठला होता. परिणामी गावाला उन्हाळ्यात पाणी टंचाई सहन करावी लागत होती. अशा वेळी शासनाच्यावतीने पाणी टंचाई उपाययोजनेंतर्गत विहिरीच्या तळाशी आडवे बोअर खोदले. यामुळे भूगर्भातील सुप्त झरे उघडे होऊन विहिरीत पाणी खळाळू लागले. या विहिरीतील पाणी पाईप लाईनद्वारे पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीत सोडण्यात आले. आता पाण्याच्या टाकीतून शुद्ध पाणी नळाद्वारे गावकऱ्यांना मिळते. मागणीप्रमाणे गावकऱ्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची सोयदेखील करण्यात आली आहे.

मौजा कळंभा येथे नळयोजना दुरुस्ती तसेच विहिरींचा गाळ काढणे, विहीर खोलीकरण, विहीर दुरुस्ती, विहिरीत आडवे बोअर खोदणे, पाईपलाइन दुरुस्ती करणे अशी टंचाई निवारण कामे गावकऱ्यांच्या सहकार्याने राबवण्यात आली. पाणीटंचाई निवारण योजनेतील तीनही आराखड्यांमध्ये या कामांना मूर्त स्वरूप मिळाले.

## पाण्यासाठीची पायपीट बंद

पाणीटंचाई नियोजनांतर्गत मौजा मसली येथे नळ योजना दुरुस्ती करण्यात आली. येथील विहिरींचे खोलीकरणसुद्धा करण्यात आले. यामुळे उन्हाळ्यातदेखील गावकऱ्यांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत नाही. खोलीकरणांतर्गत येथील विहिरीतील गाळ बाहेर काढण्यात आला आहे, असे सरपंच अनूप पाटील यांनी सांगितले.

## पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा

दुष्काळी भागातील मौजा डोरली (भांडवलकर), लोकसंख्या १७००. येथे देखील नळ योजना दुरुस्ती करून कोरड्या पडलेल्या विहिरींमध्ये आडवे बोअर खोदण्यात आले. यामुळे विहिरीच्या तळाशी तीन इंच पाण्याचा प्रवाह सुरू झाला. ऐन उन्हाळ्यात मुबलक पाणी आले. नळ योजनेद्वारे या विहिरीतील पाणी पाण्याच्या टाकीत टाकण्यात येते. तेथून पाईपलाइनद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

## पाण्याची श्रीमंती

काटोल पंचायत समिती अंतर्गत मेटपांजरा, वाजबोडी आदी गावात पाईपलाइन दुरुस्ती आणि विहीर खोलीकरणामुळे २४ तास पाण्याची उपलब्धता राहत असल्यामुळे गाव पाण्याची श्रीमंती अनुभवत असल्याचे सरपंच प्रणिता झोडे यांनी सांगितले.

## कुणीही यावे.... पाणी घेऊन जावे

कोरडवाहू शेतकऱ्यांची सर्व भिस्त पावसाच्या पाण्यावर राहते. अशा वेळी पावसाने दगा दिल्यास शेतकरी हतबल होतो. परंतु टंचाई निवारण्यासाठी काटोल पंचायत समितीच्यावतीने विहीर खोलीकरणांतर्गत झिलपा येथील सार्वजनिक विहिरीत आडवे बोअर खोदण्यात आले. यामुळे विहीर पाण्याने तुडुंब भरली. घरोघरी

असणाऱ्या नळांना व हातपंपांना नियमित पाणी येऊ लागले. गावालगतची शेती हिरवीगार झाली. ग्रामस्थ आणि प्रशासनाच्या पुढाकाराने पाणी टंचाईवर मात करता आली. दुष्काळी भागातील झिलपा गाव पाणीदार गाव म्हणून इतरांसाठी प्रेरणादायी बनले असल्याचे सरपंच कैलाश कुरवेकर समाधानाने म्हणाले.

### नियमित पाणीपुरवठा

दुष्काळी उपाययोजनेंतर्गत काटोल तालुक्यात ६० विहिरी अधिग्रहित केल्या आहेत. या विहिरींमार्फत नियमित पाणीपुरवठा सुरू आहे. विहीर अधिग्रहणांमध्ये एखाद्या व्यक्तीच्या खासगी विहिरीला पाणी मुबलक असल्यास त्या विहिरीचे पाणी सार्वजनिक पाणीसाठ्यात पाईपद्वारे सोडण्यात येते. त्यानंतर नळावाटे घरोघरी पोहोचवण्यात येते. ज्याच्या मालकीची विहीर असेल त्याला मोबदला अदा केला जातो.

टंचाई व दुष्काळ निवारण्यासाठी नवीन विंधन विहीर घेणे, विंधन विहीर दुरुस्ती, सार्वजनिक विहीर खोलीकरण, विहीर अधिग्रहण, नळयोजना दुरुस्ती आदी कामांमुळे दुष्काळग्रस्त काटोल तालुक्यातील गावांना नियमित पाणी पुरवठा होत आहे.

**–सुनील साने,**
गटविकास अधिकारी, पंचायत समिती काटोल

### स्वयंपूर्ण आणि निर्भय

नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील मौजा धातुरवाडा, करंजोली, आरंभी, महेंद्री, वडविहरा या गावातदेखील शासन आणि ग्रामस्थांच्या एकजुटीने दुष्काळावर यशस्वी मात करता आली. विहिरीतील गाळ काढणे आणि विहिरीत आडवे बोअर खोदण्यामुळे गावे पाण्यासाठी स्वयंपूर्ण आणि निर्भय झाली असल्याचे सरपंच नरेश गोरे यांनी सांगितले.

माहिती व जनसंपर्क कार्यालय, नागपूर

**पावसाचे कमी झालेले प्रमाण पाहता पाण्याची बचत, रेन वॉटर हार्वेस्टिंग, जलसंवर्धन, पाण्याचा पुनर्वापर यावरच सगळ्यांचा मुख्य भर असायला हवा. यात शासनाबरोबर सामान्यांनीही पुढाकार घेणे गरजेचे आहे. पाण्याचा थेंबही वाया जाऊ देणार नाही, अशी जीवनशैली अंगीकारावी लागणे ही काळाची गरज आहे. यासाठी जल आणि जलसंधारण साक्षरता आवश्यक असून लोकसहभागाशिवाय ही चळवळ यशस्वी होऊ शकत नाही.**

# पाणी असे मिळेल...

**डॉ. सुरेखा मधुकर मुळे**

महाराष्ट्रात जलसंधारणाची अनेक कामे सुरू आहेत. कोणती कामे, कोणत्या जमिनीवर कशा पद्धतीने करता येतील, याची सचित्र आणि शास्त्रशुद्ध माहिती मृद् आणि जलसंधारण विभागाने साध्या-सोप्या शब्दात https://wcd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सुरुवातीलाच ही माहिती उपलब्ध करून दिली आहे. लोकसहभागातून गावात जलसंधारणाची कामे करणाऱ्या सर्व गावांसाठी आणि गावकऱ्यांसाठी ही माहिती मार्गदर्शक आहे.

### गॅबियन बंधारा

नाल्यामध्ये जाळीच्या वेष्टनात अनगड दगडाचा जो बांध घालतात त्यास गॅबियन बंधारा असे म्हणतात. ज्या ठिकाणी नाल्याचा उतार जास्त आहे. तसेच पर्जन्यमान जादा असल्यामुळे अनगड दगडाचे बांध टिकू शकत नाहीत अशा ठिकाणी मृद व जलसंधारणाच्या खात्रीच्या नियोजनासाठी गॅबियन बंधारे उपयुक्त ठरतात.

### मजगी

जमिनीच्या उतारास पायऱ्यांसारखा अर्धा भाग खोदून व अर्धा भाग भरून तयार केलेली शेती म्हणजे मजगी होय. ज्या ठिकाणी मातीची खोली पुरेशी आणि पाण्याची उपलब्धता आहे अशा उताराचे मजगीत रूपांतर केले जाते. महाराष्ट्रात अतिपावसाच्या प्रदेशात डोंगर उतारावर भात खाचरे तयार करून भातपिकाखाली



जमीन आणण्यात येते.

### मजगीचे प्रकार

भातशेतीसाठी सर्व ठिकाणी सारख्या प्रमाणात पाणी साठवणे आवश्यक असते. त्यासाठी जमिनीचा नैसर्गिक उतार बदलून त्याचे रूपांतर सपाट अशा क्षेत्रामध्ये करतात.

आतील बाजूस उतार असलेली मजगीशेतास नैसर्गिक उताराच्या विरुद्ध बाजूस उतार दिला जातो. त्यामुळे जादा पाणी निघून जाते. त्यामुळे बटाट्यासारखी पिके निचरा चांगला असलेल्या जमिनीत उत्तम प्रतिसाद देतात. हिमाचल प्रदेश व हिमालयाच्या उत्तर पूर्व रांगा या ठिकाणी या प्रकारची मजगी करतात.

**बाहेरील बाजूस उतार असलेली मजगी**

जमिनीचा नैसर्गिक अतिउतार कमी करून शेत तयार केली जाते. शेताचा उतार हा नैसर्गिक उताराच्या दिशेस म्हणजेच बाहेरील बाजूस असतो. कमी पावसाच्या प्रदेशात किंवा जेथे जमीन कमी खोलीची आहे अशा ठिकाणी या प्रकारची मजगी केली जाते

## माती नालाबांध

नाला पात्रामध्ये मातीचा बांध घालून पाणीसाठा करणे, पाणी अडवणे, जिरवणे व जादा झालेले पाणी सांडीवाटे सुरक्षितपणे काढून देणे अशा प्रकारच्या बांधास मातीचे नालाबांध म्हणतात.



माती नालाबांध हा पूर नियंत्रण तसेच घळ नियंत्रणासाठी उपयुक्त आहे. घळ व नाला तयार झाल्यानंतर त्यातून पावसाचे पाणी अतिवेगाने वाहते. त्यामुळे नाल्याच्या काठाची धूप होऊन त्याचे पात्र विस्तारित होत जाते व आजूबाजूची पिकाऊ जमीन कमी होत जाते. अशा वेळी नाल्यात योग्य ठिकाणी बांध घालून पाणी अडवले व अतिरिक्त पाणी नियंत्रित गतीने बाहेर काढून दिले तर दिवसेंदिवस होणाऱ्या नाल्याच्या विस्तारास आळा बसतो. दुष्काळी भागात अशा तऱ्हेने अडवलेले पाणी जमिनीत मुरते. त्यामुळे भूजलसाठा वाढण्यास मदत होते. बांधाच्या प्रभाव क्षेत्रातील विहिरींच्या पाण्याच्या पातळीत वाढ होते. नालाबांधाच्या ठिकाणी साठलेल्या पाण्याचा उपयोग अवर्षण काळात पावसाअभावी सुकणाऱ्या पिकांना जीवनदान देण्यासाठी करता येतो. यातून जनावरांना पिण्यासाठी हंगामी स्वरूपात पाणी उपलब्ध होते.

## सलग समतल चर

राज्यातील पडीक क्षेत्र उत्पादनक्षम व्हावे यासाठी पडीक/अवनत जमिनीचा विकास कार्यक्रम राबवला जातो. याचा एक भाग म्हणजे सलग समतल चर. यामध्ये अतिउताराच्या पडीक क्षेत्रावर समपातळी चर खोदून वृक्षलागवड केली जाते. यामुळे डोंगर माथ्यावरून वेगाने वाहत येणाऱ्या पावसाच्या पाण्याची गती कमी करणे, जमिनीची धूप कमी करणे, जमिनीमध्ये पाणी मुरण्यास मदत होते. पडीक जमीन उत्पादनक्षम बनवून काही प्रमाणात हे क्षेत्र लागवडीखाली आणले जाते.

## विहीर पुनर्भरण

कृषी सिंचनासाठी आस्तित्वात असलेल्या विहिरींचे पुनर्भरण करून भूजलाच्या स्थितीत वाढ करण्यासाठी जलसंधारणाचा हा उपाय प्रभावी आहे. यामुळे पाण्याची शुद्धता वाढते, दुष्काळग्रस्त भागामध्ये जास्तीत–जास्त पाणी साठा जतन करणे व लोकांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी याचा उपयोग होतो.

## शेततळे

शेतजमिनीच्या वरील बाजूस पावसाचे वाहून जाणारे पाणी आपत्कालीन वेळी पिकास उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खोदलेल्या तळ्यास शेततळे म्हणतात. हे तळे नाला ओघळीच्या काठावरील पडक्षेत्रात घेतले जाते. शेतात तळे करून त्यात भूपृष्ठावरून वाहून जाणारे पाणी साठवणे व त्याचा उपयोग संरक्षित जलसिंचनास करणे हा शेततळे घेण्यामागचा उद्देश आहे. जेव्हा पावसाअभावी पिकास ताण पडतो तेव्हा तळ्यात साठवलेल्या पाण्यामधून पिकास पाणी देता येते. जेथे सहजासहजी विहीर खोदणे शक्य नाही तेथे वाहून जाणारे पाणी साठवण्यासाठी शेततळे तयार केले जाते. यामुळे पाणलोट क्षेत्रात भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण होते. पूरक सिंचनामुळे पिकाच्या उत्पादनक्षमतेत वाढ होते. मत्स्यसंवर्धनासारखा रोजगार पर्यायही उपलब्ध होतो.


## काँक्रिट सिमेंट नाला बांध

जमिनीमध्ये पाणी जिरवणे– जमिनीची धूप थांबवण्यासाठी काँक्रिट सिमेंट नालाबांधाची कामे करण्यात येतात. त्यामुळे पावसाचे पाणी जागीच जमिनीत मुरण्यास मदत होते. नालाबांधामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा साठा वाढला असून त्यामुळे अनेक विहिरीतील पाण्याची आणि भूगर्भातील पाणी पातळी वाढली आहे.

## नाला खोलीकरण

पावसाचे पाणी अडवणे, भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण करणे, यासाठी जलसंधारणाचे हे काम हाती घेतले जाते. यामुळे गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे स्रोत बळकट होण्यास मदत होते. ग्रामीण भागात रोजगारांच्या संधी निर्माण होऊन लोकांच्या जीवनमानात बदल घडवून आणण्यासाठीही हे काम उपयुक्त ठरते.

वरिष्ठ साहाय्यक संचालक (माहिती)



# वेध हवामानाचा

**शेतकऱ्यांपासून व्यावसायिकांपर्यंत सर्वजण हवामान विभागाच्या अंदाजांवर अवलंबून असतात. विशेषत: पावसाळ्यात मुंबईकरांना घराबाहेर पडण्यापूर्वी हवामान कसे राहणार आहे हे माहिती असणे आवश्यक असते. परंतु, हा अंदाज चुकलाच तर हवामान विभागाला दोष दिला जातो. त्यासाठी काही गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे.**

**के. एस. होसालिकर**

यंदा हवामान विभागाकडून संपूर्ण देशात ९६ टक्के पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. देशाचा सरासरी पाऊस ८९ सेंमी आहे. ही १९५१ ते २००० या कालावधीची पावसाची वार्षिक सरासरी आहे. जेव्हा आपण पाऊस सामान्य राहील असे म्हणतो, तेव्हा पावसाचे प्रमाण ९६ ते १०४ टक्के असते. ११० टक्क्यांपेक्षा पेक्षा जास्त पाऊस झाल्यास त्याला सरासरी पेक्षा पुष्कळ जास्त म्हटले जाते. तर,९० ते ९६ टक्क्यांदरम्यान पाऊस झाल्यास त्याला सामान्य पर्जन्यमानापेक्षा कमी (below normal) संबोधले जाते. ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाल्यास त्याला कमी पाऊस (deficient) म्हटले जाते. महत्त्वाचे म्हणजे जे अंदाज हवामान विभागाकडून दिले जातात, त्यांच्याही वेगवेगळ्या शक्यता असतात. त्या शक्यतादेखील लोकांनी विचारात घेतल्या पाहिजेत, अन्यथा गैरसमज होतो. हवामान विभाग कधीही असे सांगत नाही की, ठरावीक भागात पाऊस पडेल, तर तशी शक्यता वर्तवतो. जी कधी २५,५०-७५ तर कधी ७५ टक्क्यांहून अधिक असू शकते. जेव्हा हवामान विभागाकडून कोणत्याही शक्यतेचा ७५ टक्के किंवा त्याहून अधिक अंदाज वर्तवला जातो त्या वेळी निश्चितच ती शक्यता खरी ठरते आणि अशा वेळी आपत्ती व्यवस्थापन विभागाने सतर्क राहणे आवश्यक ठरते.

## हवामानाच्या अंदाजाचे तंत्रज्ञान

हवामानाचा अभ्यास करण्यासाठी हवामान विभागाने महाराष्ट्राला चार भागांमध्ये विभागले आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ अशा प्रकारे. गोवा छोटे राज्य असल्याने त्याचा समावेश कोकणातच केला जातो. या चार विभागांनुसार हवामानाचा अंदाज दिला जातो. चांगल्या निकालासाठी या चार विभागांना उत्तर आणि दक्षिण अशा आणखी छोट्या भागात विभागले जाते. जसे, उत्तर कोकण-दक्षिण कोकण. शिवाय हे आणखी सोपे व्हावे यासाठी जिल्हानिहाय हवामानाचा अंदाज सांगितला जातो.


बंगालच्या उपसागरातून तसेच अरबी समुद्रातून येणाऱ्या अशा दोन मान्सूनच्या शाखा आहेत. बंगालच्या उपसागरातून येणाऱ्या वाऱ्यांमुळे पूर्व विदर्भात चांगला पाऊस होतो. तर, अरबी समुद्रातून येणाऱ्या वाऱ्यांचा कोकणाला फायदा होतो. ठरावीक विभागात पाऊस पडण्याची शक्यता आहे असे विभागाने सांगितले म्हणजे त्याची शक्यता किती आहे, हे लोकांनी पाहणे आवश्यक आहे. ही शक्यता जर ७५ टक्क्यांहून अधिक असेल तर आपत्ती व्यवस्थापन पथकाची तयारी असली पाहिजे.

महाराष्ट्रात कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा अशा चार विभागांनुसार हवामानाचा अंदाज वर्तवला जातो. आणखी स्पष्ट हवामानाच्या अंदाजासाठी उत्तर कोकण-दक्षिण कोकण, उत्तर मध्य महाराष्ट्र, दक्षिण मध्य महाराष्ट्र असे भाग केले आहेत. एकदा का मान्सून भारतात केरळमध्ये दाखल झाला की,

त्याच्या उत्तरेच्या प्रवासासाठी हवामान विभाग पुढच्या दोन–तीन दिवसांसाठी पूर्वानुमान देते. अशा प्रकारे मान्सूनचा प्रवास महाराष्ट्र आणि वर राजस्थानपर्यंत होतो. यादरम्यान अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरामध्ये निर्माण होणाऱ्या हवामानाच्या प्रणाली मान्सूनच्या स्थितीवर प्रभाव टाकतात. जसे कमी दाबाचे क्षेत्रे, पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यांचा जोर, हवेची आर्द्रता अशा अनेक गोष्टींवर पावसाचे प्रमाण अवलंबून असते. त्याचबरोबर हिंदी महासागरातील इंडियन ओशन डायपोल (आयओडी) हा जर धन (+) असेल तर त्याचा चांगला परिणाम भारताच्या मान्सूनवर दिसतो. समुद्राचे पाणी आणि जमिनीच्या तापमानातला फरक जेवढा जास्त असेल तेवढे वारे जोरदार वाहतात. तेवढी जास्त आर्द्रता वाढते, त्यामुळे जास्त प्रमाणात ढग तयार होतात आणि पाऊस चांगला होतो. हवामान विभाग वर्षभर हवामानाचे अंदाज सांगतो, त्याच्या मागे तंत्रज्ञान आहे. क्लायमेटोलॉजी, हवामानाचे गणित, पर्सिस्टन्स, सिनॉप्टिक अशा विविध तंत्रांचा वापर त्यासाठी केला जातो.

**क्लायमेटोलॉजी** : उदा. मुंबईच्या हवामानाचा गेल्या शंभर ते दीडशे वर्षांचा डेटा (सांख्यिकीय माहिती) विभागाकडे आहे. त्याच्या आधारावर पुढच्या पाच दिवसात वातावरण कसे असेल याचा अंदाज बांधता येतो. मागच्या दीडशे वर्षात जूनच्या पहिल्या आठवड्यात जसे वातावरण होते तसेच या वर्षी असेल असे नाही, परंतु त्यातून मार्गदर्शन मिळत असते.

**सिनॉप्टिक:** विभागाकडे वेदर चार्ट्स (हवामान आलेख) असतात, त्याच्यावर आम्ही सर्व वेदर डेटा ठेवतो. त्यातून निघालेल्या विश्लेषणातून हवामानाचा अंदाज बांधला जातो. या पद्धतीने येत्या २४ ते ४८ तासांच्या हवामानाचा अंदाज देता येतो. मात्र,लोकांना येत्या काही दिवसांच्या हवामानाचा अंदाज हवा असतो, अशा वेळी ही पद्धत कामी येत नाही. या वेळी न्यूमरिकल वेदर प्रेडिक्शन्स (सांख्यिकीय हवामान भाकिते) साहाय्याने अंदाज बांधता येतो.





**न्यूमरिकल वेदर प्रेडिक्शन्स (NWP):** या पद्धतीने पुढील अर्ध्या तासापासून ते काही दिवसांपर्यंतच्या हवामानाचा अंदाज बांधता येतो. प्रत्येकाची हवामानाच्या अंदाजाची गरज वेगळी असते. जसे, शेतकऱ्याला पुढील अर्ध्या तासात हवामान कसे असेल याचा अंदाज काही उपयोगाचा नाही. मात्र, वैमानिकाला पुढील अर्ध्या तासात हवामान कसे असेल याची माहिती हवी असते. अशा प्रकारे प्रत्येकाच्या गरजेनुसार हवामान विभाग अंदाज देत असतो.

## मुंबई वेदर लाईव्ह

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने येथे थोडा जरी जास्त पाऊस झाला तरी त्याचे पडसाद देशभर उमटतात. त्यामुळे मुंबईच्या बाबतीत हवामान विभाग जास्त सतर्क असतो, त्यासाठी मुंबईमध्ये एक डॉप्लर रडार आहे. येत्या काही दिवसांत मुंबई उपनगरामध्ये आणखी एक डॉप्लर रडार बसवले जातील. येत्या दोन–तीन वर्षात मुंबईत आणखी चार रडार बसवले जाणार आहेत. आता स्वयंचलित पर्जन्यमापन केंद्रांचे मोठे जाळे मुंबईत विणण्यात आले आहे. ज्याच्या माध्यमातून दर १५ मिनिटांनी माहिती मिळत असते. मुंबई, नवी मुंबई, ठाणे या भागात जवळपास

### जागतिक विश्वासार्हता

हवामानाचा अंदाज बांधण्यासाठी खूप निरीक्षण असणे आवश्यक आहे. त्यासाठीची आवश्यक यंत्रणा समुद्रामध्ये तसेच किनारपट्टीवर सज्ज असते. त्यासाठी विभागाकडे किनारपट्टीच्या भागात हाय विंड स्पीड रेकॉर्डर (High wind speed recorder) आहे. प्रत्येक सेकंदाला यामध्ये रेकॉर्डिंग केले जाते. ज्यामुळे चक्रीवादळाची क्षमता कळते. विभागाकडे असलेल्या जमिनीवरील हवामानाच्या निरीक्षण केंद्रांमधून (Surface weather observatories) दर तीन तासांनी निरीक्षण नोंदवले जाते. तर, स्वयंचलित पर्जन्य मापन केंद्रांमुळे (automatic rain gages)दर तासाला माहिती मिळते. ही यंत्रणा बसवणे सोपे असले तरी सांभाळणे फार कठीण आहे. ज्याप्रमाणे विभाग ग्लोबल डेटा वापरतो, तसेच केवळ १० मिनिटांतच हा डेटाही जागतिक पातळीवर जातो. त्यामुळे तो अचूक असणे अतिशय महत्त्वाचे आहे. तो त्या दर्जाचा नसेल तर तो स्वीकारला जाणार नाही. म्हणून, जागतिक पातळीवरील अत्याधुनिक यंत्रणा हवामानाच्या निरीक्षणासाठी आणि संकलनासाठी वापरली जावी यासाठी हवामान विभाग प्रयत्नशील आहे.




### हवामान मित्र व्हा...

बरेचदा हवामान विभागाकडून मिळणाऱ्या अंदाजांना समजून घेणे गरजेचे असते. मात्र, अनेकदा नागरिकांचा गैरसमज होतो, यासाठी जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी आम्ही विविध कार्यशाळा आयोजित करतो. कृषी विभाग, मच्छिमार, आपत्ती व्यवस्थापन विभाग, माध्यमे, नौदल, महानगरपालिका, एनडीआरएफ या सर्वांसाठी या कार्यशाळा उपयुक्त असतात. हवामान विभाग वेगवेगळ्या स्तरांतील लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी पूर्ण तयार आहे. आम्ही संबंधित शाळा, महाविद्यालयांमध्ये जाण्यासाठी तयार असतो. प्रत्येक नागरिकाने वेदर फ्रेंडली व्हायला हवेत. ज्या भागात ते राहतात तेथील हवामानाचा अंदाज त्यांना असला पाहिजे. यासाठी हवामान विभागाच्या संकेतस्थळांचा रोज वापर करावा. भारतीय हवामान विभागाची संकेतस्थळे पुढीलप्रमाणे आहेत. www.imdmumbai.gov.in, www.imd.gov.in

१५० स्वयंचलित पर्जन्यमापन केंद्रे बसवण्यात आले आहेत. यामध्ये काही महाविद्यालयांचाही समावेश आहे. 'मुंबई वेदर लाईव्ह' ॲपच्या माध्यमातून मुंबईकरांना क्षणाक्षणाचे अपडेट्स मिळू शकतात.

### आव्हाने

विषुवृत्तीय प्रदेश असल्याने भारतात कोणताही ऋतू सुरू असला तरी त्यामध्ये वैविध्य असते. उत्तरेच्या जम्मू-काश्मीर आणि दक्षिणेच्या राज्यांचे तापमान फार वेगळे आहे. पावसाळा म्हटला म्हणजे केवळ पाऊस पडेल असे नाही. पावसाळा सुरू असताना काही दिवस केवळ ऊनही पाहायला मिळतो. अशा वातावरणामुळे हवामान विभागापुढे अचूक अंदाज नोंदवणे हे आव्हानात्मक कार्य असते. राज्यात काही ठिकाणी जास्त तर काही ठिकाणी फार कमी पाऊस पडतो. यातच भर म्हणजे जागतिक हवामानातील बदलसुद्धा हवामान तज्ज्ञांपुढे मोठे आव्हान आहे.

### हवामान बदलाची कारणे

आपण विषुवृत्तीय प्रदेशात राहत असल्याने आपल्याकडे कोणत्याही ऋतूमध्ये अंतर्गत बदल होऊ शकतात. परंतु, याला प्रत्येकवेळी जागतिक तापमान वाढीशी जोडता येणार नाही. जागतिक तापमान वाढीच्या दुष्परिणामांना नक्कीच आपल्याला सामोरे जावे लागत आहे. मात्र, प्रत्येक वेळी हवामान बदलाला जागतिक तापमान वाढ कारणीभूत नसते. महाराष्ट्रातल्या अंतर्गत भागात होणारा तापमान बदल हा जागतिक तापमान वाढीमुळे आहे,असे नाही.

गेल्या १३० वर्षांमध्ये २०-२५ वेळा दुष्काळ पडला होता. काही वेळा २-३ वर्षे लागोपाठ दुष्काळ पडला होता. त्यामुळे दर चार वर्षांनी दुष्काळजन्य परिस्थिती पाहायला मिळते असे निरीक्षण आहे. त्यामुळे त्यानुसार आपली शासकीय यंत्रणा आर्थिकदृष्ट्या तयार असेल तर त्याचा या आपत्तीवर मात करण्यासाठी उपयोग होतो. मात्र,उष्णतेच्या लाटेचे प्रमाण,कालावधी व तीव्रता वाढत आहे,एवढे नक्की. संपूर्ण देशामध्ये जागतिक तापमान वाढीमुळे होणारे हवामानातील तीव्र बदल अनेकदा अनुभवाला येतात.

येत्या काळात भारतीय हवामान विभाग संपूर्ण देशात हवामान विषयक निरीक्षणाचे जाळे अजून विस्तृत करण्यासाठी प्रयत्नशील राहील. त्या दिशेने पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली अनेक योजना आखल्या गेल्या आहेत.

उपमहासंचालक,
भारतीय हवामान विभाग,मुंबई
**शब्दांकन - किशोरी महाबळे**

# शिक्षण सुविधा, निर्वाहभत्ता, शुल्क प्रतिपूर्ती, शिष्यवृत्ती

राज्य शासन आणि केंद्र
शासनामार्फत वेगवेगळ्या
संवर्गातील विद्यार्थी–विद्यार्थिनींना
शिक्षणाच्या सुविधा सुलभतेने
उपलब्ध व्हाव्यात, यासाठी
विविध योजना राबवण्यात येतात.
यामध्ये शिष्यवृत्ती, फेलोशीप,
निर्वाहभत्ता, परदेशातील
शिक्षणाच्या सुविधा, वसतिगृहे,
परीक्षा आणि शिक्षण शुल्क
प्रतिपूर्ती आदींचा समावेश आहे.
या योजनांचा लाभ घेऊन
विद्यार्थ्यांना प्रगतीची उंच शिखरे
गाठणे सहज शक्य आहे.

मीनल जोगळेकर

माहितीच्या सुलभ प्रचार-प्रसारामुळे निर्माण झालेली जागरूकता, केंद्र तसेच राज्य सरकारांकडून विविध घटकांना परदेशी उच्च शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती, खासगी विश्वस्त संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती, विविध परदेशी विद्यापीठांकडून शिक्षण शुल्कात मिळणाऱ्या सवलती व शिष्यवृत्ती, बँका तसेच विविध वित्त संस्थांकडून सुलभतेने मिळणारे कर्ज, या साऱ्यामुळे सामान्य आर्थिक परिस्थिती असणारे, पदवीपर्यंत सामान्य गुण मिळविलेले विद्यार्थीसुद्धा मोठ्या संख्येने उच्च शिक्षणासाठी परदेशी जाताना दिसत आहेत. परदेशात उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्यांमध्ये



परदेशात विद्यार्थ्यांना संवाद, कार्यानुभव, केस स्टडी आणि प्रत्यक्ष व्यावहारिक सहभाग अशा सक्रिय सहभागातून अर्थपूर्ण शिक्षण घेता येते, इंग्रजी भाषेविषयी न्यूनगंड असल्यास तो नष्ट होतो, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आल्यामुळे आत्मविश्वास वाढतो, इतर देशात शिकताना आपोआपच त्या-त्या देशाची भाषा शिकता येते, देशोदेशींचे बुद्धिमान विद्यार्थी तिथे शिक्षणासाठी येत असल्याने आपले ज्ञान व कौशल्य त्यांच्या तुलनेत कुठपर्यंत आहे याची आपोआपच चाचणी होते, नवीन संस्कृती, समाज जीवनाशी ओळख होते, दृष्टिकोन आणि विचारशैली व्यापक होते, त्याचा परिणाम व्यावसायिक जीवन व व्यक्तिमत्त्वावर तसेच जीवनाच्या संपूर्ण जडणघडणीवर होऊ शकतो, वेगवेगळ्या देशातील विद्यार्थ्यांशी शिकत

# परदेशातील शिक्षणासाठी संधी

आपल्याकडच्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक आहे. त्याखालोखाल वैद्यकशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थी परदेशातील उच्च शिक्षणासाठी अर्ज करतात. भारतीय विद्यार्थ्यांचा सर्वाधिक ओढा अमेरिकेकडे असल्याचे दिसून येते. त्याबरोबरच इंग्लंड आणि युरोपमधल्या इतर देशांमध्येही अनेक उत्तम पर्याय उपलब्ध आहेत.

### परदेशातील शिक्षणाचे फायदे

परदेशी विद्यापीठातून घेतलेल्या दर्जेदार शिक्षणामुळे त्या-त्या विषयातील समज, ज्ञान यात भर पडून पारंगतता येते, पायाभूत सुविधा, प्राध्यापक, शिक्षणकौशल्य आदी अनेक निकषात या संस्था उच्च क्रमांकावर असतात. परदेशातील शेकडो विद्यापीठांतून हजारो वेगवेगळ्या विषयांचे शिक्षण घेण्याची संधी उपलबध असल्याने आपल्या आवडी व गरजेनुसार शिक्षण घेता येते. परदेशातील काही अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना त्या-त्या विषयातील सर्वोत्कृष्ट मार्गदर्शकांना भेटण्याची, त्यांच्याकडून ज्ञान घेण्याची संधी मिळते, एका शाखेचे शिक्षण घेत असतानाच आवडत असलेल्या दुसऱ्या शाखेतील विषयाचे शिक्षण घेण्याची लवचिकता परदेशातील बहुतेक अभ्यासक्रमांमध्ये असल्याने अनेक शाखांचे शिक्षण घेता येते, असताना मैत्री होते जी अनेकदा आयुष्यभर साथ देऊ शकते परदेशात स्वतंत्र राहूनही स्वत: सगळे निर्णय घेणे, बऱ्यावाईट प्रसंगांना तोंड देणे यातून स्वत:ची स्वत:शी ओळख होते, आपल्या व्यक्तिमत्त्वातील व स्वभावातील गुणदोषांची जाणीव होते. परदेशी शिक्षण घेतल्याची स्वत:च्या बायोडेटात भर पडून त्याचा नोकरी शोधताना वेगळा प्रभाव पडू शकतो, परदेशी शिक्षण घेऊन आलेल्या उमेदवारांना नोकरीसाठी चांगली मागणी व उत्तम पगाराची संधी असल्याने त्यातून जीवनमान उंचावते.

**परदेशात उच्च शिक्षणासाठी जाणे ही आता फक्त धनिक आणि बुद्धिमान विद्यार्थ्यांचीच मक्तेदारी राहिली नसून सामान्य बुद्धी, शैक्षणिक कारकीर्द तसेच सामान्य आर्थिक परिस्थिती असलेले विद्यार्थीही मोठ्या संख्येने परदेशी जात आहेत. अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया या देशांमधील विद्यापीठांत उच्च शिक्षण घेणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांचा दुसरा क्रमांक लागतो.**

## अर्जप्रक्रिया

परदेशात उच्चशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व आणि शैक्षणिक पार्श्वभूमी उत्तम असणे गरजेचे आहे. तसेच जीआरई, टोफेल, जीमॅट किंवा आयईएलटीएस या परीक्षांमध्ये किमान गुण परदेशी विद्यापीठात फक्त प्रवेश मिळवून देऊ शकतात. मात्र जर चांगल्या विद्यापीठामध्ये प्रवेश हवा असेल तर विद्यार्थ्यांना संबंधित परीक्षेत उत्तम गुण मिळवणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांकडे जर कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र असेल किंवा त्याचे संशोधन प्रबंध प्रकाशित झाले असतील तर प्रवेशाच्या संधी वाढतात.

## प्रवेश परीक्षा

परदेशात शिक्षणासाठी प्रत्येक देशानुसार व अभ्यासक्रमानुसार वेगवेगळ्या प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. भारत इंग्रजी राष्ट्रभाषा नसलेला देश आहे, म्हणून इंग्रजीची टोफेल किंवा आयईएलटीएस या दोन परीक्षांपैकी एक परीक्षा आपल्या विद्यार्थ्यांना द्यावीच लागते.

- **सॅट (स्कॉलॅस्टिक ॲप्टिट्यूड टेस्ट)** : अमेरिकेत महाविद्यालयीन प्रवेशासाठी प्रमाण परीक्षा
- **टोफेल (टेस्ट ऑफ इंग्लिश ॲज ए फॉरेन लँग्वेज)** : अनेक देशांमध्ये ग्राह्य मानली जाणारी इंग्रजी भाषेच्या कौशल्याची परीक्षा
- **जिमॅट (ग्रॅज्युएट मॅनेजमेंट अप्टिट्यूड टेस्ट)** : प्रमाण इंग्रजी भाषेत लेखन, वाचन, संभाषण, विश्लेषण यांची परीक्षा
- **जीआरई (ग्रॅज्युएट रेकॉर्ड एक्झामिनेशन)** : परदेशी विद्यापीठांतील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सर्वमान्य परीक्षा
- **आयइएलटीएस (इंटरनॅशनल इंग्लिश लँग्वेज टेस्टिंग सिस्टिम)** : इंग्रजी भाषेतील प्रभुत्व जोखणारी, बहुतांश देशांमध्ये मान्य चाचणी परीक्षा
- **सीमॅट (कॉमनवेल्थ एक्झिक्युटिव्ह मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन टेस्ट)** : इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाद्वारे घेतली जाणारी प्रवेश परीक्षा.
- **एम कॅट (मेडिकल कॉलेज ॲडमिशन टेस्ट)** : विचार व निर्णय क्षमता इ. विषयक बहु-पर्यायी चाचणी
- **एलसॅट (लॉ स्कूल ॲडमिशन टेस्ट)** : विविध देशांमधील कायद्यांचे वाचन करण्यासाठी लागणारी भाषेची जाण तपासणारी चाचणी
- **ॲक्ट (अमेरिकन कॉलेज टेस्टिंग)** : अमेरिकेत उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन प्रवेशासाठीची प्रमाणित चाचणी



- **सीएईएल (कॅनेडियन ॲकॅडेमिक इंग्लिश लँग्वेज ॲसेसमेंट)** : कॅनडामध्ये शिक्षणासाठी द्यावी लागणारी इंग्रजी भाषेची चाचणी
- **सीएई (केम्ब्रिज इंग्लिश ॲडव्हान्स एक्झामिनेशन)** : केम्ब्रिज विद्यापीठासाठी इंग्रजीची चाचणी
- **सीपीइ (केम्ब्रिज इंग्लिश प्रोफेशिएन्सी टेस्ट)** : केम्ब्रिज विद्यापीठासाठी इंग्रजीत पारंगततेची चाचणी
- **इसीसीइ (एक्झामिनेशन फॉर द सर्टिफिकेट ऑफ कॉम्पिटन्सी इन इंग्लिश)** : सामान्य भाषा चाचणी.
- **एपी (ॲडव्हान्स्ड प्लेसमेंट एक्झामिनेशन)** : नावाजलेल्या विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी महाविद्यालयीन स्तरावरील परीक्षा.

'जीआरई'च्या गुणांची वैधता पाच वर्षांची असते, तर 'टोफेल'ची दोन वर्षांची. 'जीआरई'-'टोफेल'चे गुण थेट विद्यापीठाला न कळवता 'ईटीएस'मार्फत (एज्युकेशनल टेस्टिंग सर्व्हिस) कळवावे लागतात.

## प्रवेशाचे वेळापत्रक

परदेशात दोन वेगवेगळी शैक्षणिक सत्रे असतात- फॉल किंवा स्प्रिंग. साधारणत: ऑगस्टमध्ये सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्राला 'फॉल' म्हणतात तर जानेवारी किंवा फेब्रुवारीच्या आसपास सुरू होणाऱ्या सत्राला 'स्प्रिंग' असे म्हणतात. विद्यार्थ्यांना 'फॉल' किंवा 'स्प्रिंग' यांपकी एका सत्राला अर्ज करावा लागतो.

पुढील दोन वर्षांचा विचार करून नियोजन करण्याची गरज असते तरच चांगल्या विद्यापीठात प्रवेश मिळू शकतो. फॉल २०२० चा विचार केला तर जून २०१९मध्ये विद्यापीठांची निवड करावी लागेल. ऑक्टोबर १९ ते जानेवारी २० पर्यंत ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्रांची पूर्तता करावी. अर्जाचे शुल्क मात्र प्रत्येक देशातील विद्यापीठावर अवलंबून असते. अमेरिकन अर्जप्रक्रिया जास्त खर्चिक आहे. त्या त्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अर्ज कसा करावा याबद्दल माहिती दिलेली असते. ती तपासून अर्ज करावा.

अर्जप्रक्रिया ते प्रवेश -मार्च ते मेमध्ये विद्यापीठांकडून अर्ज स्वीकारल्याचा प्रतिसाद मिळून प्रवेशाची ऑफर तुमच्यापर्यंत पोहोचू शकते. त्यानंतर आय-२० फॉर्मची मागणी करून तुम्ही व्हिसासाठी अर्ज करू शकता. त्यानंतर प्रवेशपूर्व प्रक्रिया पूर्ण करणे, विमान तिकिटांचे बुकिंग आणि परदेशी चलन बदलण्याबरोबरच त्यांचे काही ऑनलाइन अभ्यासक्रमही पूर्ण करण्याची गरज असते.

## शिष्यवृत्ती

परदेशातील शिक्षणासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल्याला शिष्यवृत्ती किंवा एखादी पाठ्यवृत्ती तरी मिळावी अशी इच्छा असते. कारण त्यात शिक्षण शुल्क भरता येते व त्याबरोबरच तिथल्या वास्तव्याचा व खर्चाचा प्रश्न निकाली निघतो.

## राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती

अनुसूचित जातीच्या मुलामुलींना परदेशात शिक्षणासाठी महाराष्ट्र शासनाची शिष्यवृत्ती: अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांना गुणवत्ता असूनही

केवळ आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापिठामध्ये प्रवेश घेता येत नाही. या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पीएच.डी. अभ्यासक्रमाकरिता प्रवेश मिळाला आहे, अशा ५० (पी.एच.डी.-२४ व पदव्युत्तर -२६) विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते.



## योजनेच्या प्रमुख अटी

■ विद्यार्थी अनु.जाती/नवबौद्ध घटकातील असावा ■ महाराष्ट्राचा रहिवासी असावा ■ वय ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे ■ विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ६ लाखांपेक्षा जास्त नसावे ■ पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवीमध्ये किमान ५०% गुण व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी पदवीमध्ये किमान ५५% गुण मिळालेले असावे, तसेच प्रथम प्रयत्नामध्ये उत्तीर्ण असावा. ■ विद्यार्थ्यांने परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेला असावा. ■ परदेशातील विद्यापीठ हे मान्यताप्राप्त विद्यापीठ असावे व 'क्युएस वर्ल्ड रँकिंग'मध्ये ३०० च्या आत असावे.

## लाभाचे स्वरूप

■ विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या शिक्षण शुल्काची पूर्ण रक्कम व इतर खर्च मंजूर करण्यात येतो. ■ विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता अमेरिका व इतर राष्ट्रासांठी अमेरिकन डॉलर १४००० तर ग्रेट ब्रिटनसाठी पौंड ९००० इतका अदा करण्यात येतो. ■ विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी अमेरिका व इतर देशांसाठी अमेरिकन १३७५ वर ग्रेट ब्रिटनसाठी १००० पौंड इतके देण्यात येतात. पुस्तके, अभ्यासदौरा इत्यादी खर्चाचा यात समावेश आहे. ■ विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम झाल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च तिकीट सादर केल्यानंतर मंजूर करण्यात येतो.

**अर्ज करण्याची पद्धत:** जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीचा अर्ज समाज कल्याण आयुक्त, महाराष्ट्र शासन यांच्याकडे सादर करावा.

## केंद्रीय शिष्यवृत्ती

**अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय ओव्हरसीज शिष्यवृत्ती:** अभियांत्रिकी, व्यवस्थापन, आर्थिक / वित्त, विज्ञान, उपयोजित विज्ञान, कृषी, औषधे, मानव्य आणि सामाजिक विज्ञान या क्षेत्रातील पदव्युत्तर आणि पीएच.डी, पोस्ट-डॉक्टरल संशोधन अभ्यासक्रमांसाठी परदेशी विद्यापीठांमध्ये शिष्यवृत्ती देण्यात येतात. ३०% शिष्यवृत्ती महिला उमेदवारांसाठी राखीव आहेत.

■ पोस्ट डॉक्टरल साठी, ५५% गुण किंवा संबंधित मास्टर डिग्री आणि समकक्ष श्रेणी पदवी आणि पीएच.डी. ■ पीएच.डी. साठी: ५५% गुण किंवा संबंधित मास्टर डिग्री मध्ये समकक्ष श्रेणी ■ पदव्युत्तरसाठी: ५५% मार्क किंवा संबंधित मास्टर डिग्रीमधील समकक्ष श्रेणी ■ वयोमर्यादा: ३५ वर्षांपेक्षा कमी ■ अर्जदाराची / पालकांची कुटुंबाची वार्षिक कमाल उत्पन्न मर्यादा ६ लाख रूपये.

## राष्ट्रीय ओव्हरसीज शिष्यवृत्ती योजना

अनुसूचित जातीच्याविद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठांमध्ये विज्ञान आणि उपयोजित विज्ञान; अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन; कृषी विज्ञान आणि औषधशास्त्र, वाणिज्य, लेखा व वित्त; आणि मानव्यशास्त्र, सामाजिक विज्ञान आणि ललित कला यांसाठी मास्टर्स लेव्हल कोर्स आणि पीएच. डी. करिता आहे. दरवर्षी १०० शिष्यवृत्ती व १५,४०० अमेरिकन डॉलर्सचा वार्षिक देखभाल भत्ता निर्धारित केला आहे.

**पात्रता निकष:** ■ पीएच.डी. साठी: ५५% गुण किंवा संबंधित मास्टर डिग्रीमध्ये समकक्ष श्रेणी ■ मास्टर्स डिग्रीसाठी: ५५% गुण किंवा संबंधित मास्टर डिग्रीमधील समकक्ष श्रेणी ■ वयोमर्यादा: ३५ वर्षांपेक्षा कमी ■ अर्जदाराची / पालकांची कुटुंबाची वार्षिक कमाल उत्पन्न मर्यादा ६ लाख रूपये.

**इतर मागासवर्गीय (ओबीसी) आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय (ईबीसी) साठी परदेशी शिक्षणासाठी घेतलेल्या कर्जाच्या व्याजावर अनुदान देण्याची डॉ. आंबेडकर केंद्रीय योजना:** मास्टर्स, एमफिल आणि पीएच.डी. स्तरावर परदेशात उच्च शिक्षणासाठी.

**पात्रता निकष**: विद्यार्थ्यांना परदेशात एका विद्यापीठात प्रवेश मिळालेला असावा. स्नातकोत्तर डिप्लोमा, मास्टर्स, एम.फिल, पीएच.डी. लेव्हल कोर्स. ही योजना केवळ एकतर मास्टर स्तरावर किंवा पीएच.डी. अभ्यास करताना एकदाच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असेल, ओबीसी उमेदवारांसाठी उत्पन्न मर्यादा सध्याच्या क्रिमीलेअर निकषांपेक्षा जास्त नसावी आणि ईबीसीसाठी २.५ लाख. मुलींसाठी ५० टक्के शिष्यवृत्ती आरक्षित आहे.

## ओव्हरसीज डॉक्टरल फेलोशीप

ओव्हरसीज डॉक्टरल फेलोशीपचा उद्देश राष्ट्रीय क्षमतेची उभारणी करणे आहे. ही योजना विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या विज्ञान आणि अभियांत्रिकी संशोधन मंडळाद्वारे राबवण्यात येते. परदेशातील उच्च पदवी विद्यापीठांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि औषध क्षेत्रातील

डॉक्टरेट संशोधन कार्यक्रमासाठी ४ वर्षांसाठी निवडक उमेदवार / संशोधकाला प्रतिवर्ष २४,००० रुपये प्रदान केले जातात.

## सांस्कृतिक/शैक्षणिक आदानप्रदान

केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्याउच्च शिक्षण विभागातर्फे सांस्कृतिक/शैक्षणिक आदानप्रदान कार्यक्रमांतर्गत परदेशी उच्च शिक्षण घेण्यासाठी अनेक शिष्यवृत्ती देण्यात येतात. या शिष्यवृत्ती गुणवत्तेच्या आधारावर दिल्या जातात. मंत्रालयाच्या mhrd.gov.in या संकेतस्थळावर, महाविद्यालयांमध्ये, वर्तमानपत्रांमधून तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून या शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागवणारी जाहिरात देण्यात येते. शिष्यवृत्तीची रक्कम, वयोवर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादींची माहिती तसेच अर्जाचा नमुना दिला जातो. विहित मुदतीत प्राप्त अर्जाची छाननी तज्ज्ञ समितीकडून करण्यात येते. बहुतांश शिष्यवृत्ती पदव्युत्तर किंवा डॉक्टरेट शिक्षणासाठी देण्यात येतात. भारतीय विद्यार्थ्यांसाठी पुढीलप्रमाणे शिष्यवृत्ती आहेत, तथापि आधीपासूनच परदेशात असलेल्या उमेदवारांचा अर्ज स्वीकारला जात नाही.

## युनायटेड किंगडम (राष्ट्रकुल शिष्यवृत्ती)

**अभ्यासक्रमाचा स्तर:** पदव्युत्तर (१ वर्षाचा अभ्यासक्रम) / पीएच.डी.
**विषय/ क्षेत्र:** अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, विज्ञान, कृषी आणि संलग्न क्षेत्र, मानव्यशास्त्र व सामाजिक शास्त्र **कालावधी:** १ वर्ष पदव्युत्तरसाठी/ ३ वर्ष पीएच.डी. साठी
**अधिसूचना प्रकाशित कालावधी:** ऑगस्ट/ सप्टेंबर, **शिष्यवृत्तींची संख्या:** २५-३०
**अर्जाची पद्धत:** ऑनलाइन
**अर्हता:** वय- ४० वर्षापेक्षा जास्त नको. किमान शैक्षणिक अर्हता.

- पदव्युत्तरसाठी संबंधित विषयातील पदवी मानव्यशास्त्र व सामाजिक शास्त्र विषयांसाठी किमान ६० टक्के गुणांसह, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, विज्ञान, कृषी आणि संलग्न क्षेत्रांसाठी संबंधित विषयातील पदवी किमान ६५ टक्के गुणांसह.
- पीएच.डी.साठी संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी मानव्यशास्त्र व सामाजिक शास्त्र विषयांसाठी किमान ६० टक्के गुणांसह, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, विज्ञान, कृषी आणि संलग्न क्षेत्रांसाठी संबंधित विषयातील पदवी किमान ६५ टक्के गुणांसह.

**इतर आवश्यक पात्रता:** इंग्रजी माध्यमातून शिक्षण.आय.ई.एल.टी.एस परीक्षा देणे आवश्यक. पीएच.डी.साठी निवड झालेल्या विद्यापीठातील संभाव्य मार्गदर्शकाकडून स्वीकृतीपत्र.
**शिष्यवृत्तीची रक्कम:** शिष्यवृत्तीत समाविष्ट बाबी: युनायटेड किंगडम येथे अभ्यासक्रमासाठी जाण्याऱ्येण्याचा विमान प्रवास खर्च, प्रमाणित शैक्षणिक व परीक्षा शुल्क, स्टायपेंड (निर्वाह भत्ता) १०४३ पाऊंड प्रति महिना किंवा लंडन मेट्रो पॉलिटन क्षेत्रासाठी १२७९ पाऊंड प्रतिमहिना, संशोधन अहवाल तयार करण्यासाठी येणारा खर्च, गरम कपडे खरेदी करण्याचा खर्च, शैक्षणिक कारणासाठी युनायटेड किंगडम किंवा अन्यत्र प्रवासासाठी अनुदान, पीएच.डी स्कॉलर्ससाठी क्षेत्रीय भेटीसाठी अनुदान इ.
**संभाव्य तारखा:** मुलाखतीसाठी निवडसूची- नोव्हेंबर महिन्याचा पहिला आठवडा
**मुलाखत:** २० नोव्हेंबर ते १५ डिसेंबर
**संपर्क:** मंत्रालयाच्या संकेतस्थळावर.
**निवड प्रक्रिया:** पात्र उमेदवारांची तज्ज्ञ समितीकडून मुलाखतीद्वारे निवड.

## न्यूझिलंड (राष्ट्रकूल शिष्यवृत्ती)

**अभ्यासक्रमाचा स्तर:** पदव्युत्तर / पीएच.डी. **विषय/ क्षेत्र:** कृषी, अक्षय ऊर्जा
**कालावधी:** १ किंवा २ वर्ष पदव्युत्तरसाठी/ ३ वर्ष पी.एच.डी.साठी
**अधिसूचना प्रकाशित कालावधी :** फेब्रुवारी/मार्च, **शिष्यवृत्तींची संख्या:** २
**अर्जाची पद्धत:** ऑनलाइन
**अर्हता:** वयोमर्यादा नाही.
**शैक्षणिक अर्हता:** पदव्युत्तरसाठी: संबंधित विषयातील पदवी किमान ६५ टक्के गुणांसह.

- पीएच.डी.साठी: संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी किमान ६५ टक्के गुणांसह.

**इतर आवश्यक पात्रता:** आय.ई.एल.टी.एस. किंवा टॉफेल परीक्षा उत्तीर्ण.
**शिष्यवृत्तीची रक्कम:** शैक्षणिक शुल्क, वैद्यकीय व प्रवास विमा, अभ्यासक्रमासाठी जाण्यायेण्याचा विमान प्रवास खर्च इ.
**संभाव्य तारखा:** मुलाखतीसाठी निवडसूची- मे - जून, **संपर्क:** मंत्रालयाच्या संकेतस्थळावर. **निवड प्रक्रिया:** पात्र

## अल्पसंख्याकांना संधी


ही योजना केंद्रीय अल्पसंख्याक मंत्रालयातर्फे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना परदेशात मास्टर्स लेव्हल अभ्यासक्रम, एम.फिल. आणि पीएच.डी.करिता शैक्षणिक कर्जावरील व्याजात अनुदान देण्यात येते. मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन आणि पारशी या अल्पसंख्याक समुदायांचे कला, अभियांत्रिकी, कृषी व वैद्यकीय क्षेत्रात परदेशी विद्यापीठांमध्ये शिकू इच्छिणारे विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत.

**निकष:** विद्यार्थ्यांना पोस्ट-ग्रॅज्युएट डिप्लोमा, मास्टर्स, एम.फ़िल, पीएच.डी. स्तरीय अभ्यासाकरिता परदेशात विद्यापीठात प्रवेश मिळालेला असावा. उमेदवाराच्या / पालकांसाठी कुटुंबाची मिळकतीची मर्यादा ६ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावी. अल्पसंख्याक समुदायाशी संबंधित असल्याचा पुरावा असणे आवश्यक आहे.



## चीन

**अभ्यासक्रमाचा स्तर:** पदवी/पदव्युत्तर/डॉक्टरेट/जनरल स्कॉलर प्रोग्राम / सिनियर स्कॉलर प्रोग्राम
**विषय/ क्षेत्र:** चिनी भाषा आणि साहित्य, व्यवस्थापन, ललितकला (चित्रकला आणि शिल्पकला), कृषी, रेशीम, जीवशास्त्र, राजशास्त्र/आंतरराष्ट्रीय संबंध, इलेक्ट्रनिक्स, इलेक्ट्रिकल, अर्थशास्त्र, भौतिकशास्त्र, स्थापत्यशास्त्र, आर्किटेक्चर, फार्मसी.
**कालावधी:** ■ पदवीसाठी ४-५ वर्ष, चिनी भाषेचा अभ्यास १-२ वर्ष,शिष्यवृत्ती ४-७ वर्ष. ■ पदव्युत्तरसाठी २-३ वर्ष, चिनी भाषेचा अभ्यास १-२वर्ष,शिष्यवृत्ती २-५ वर्ष. ■ डॉक्टरेटसाठी ३-४ वर्ष, चिनी भाषेचा अभ्यास १-२ वर्ष,शिष्यवृत्ती ३-६ वर्ष. ■ जनरल स्कॉलर्स - १ वर्षापर्यंत, चिनी भाषेचा अभ्यास १ वर्षापर्यंत, शिष्यवृत्ती २ वर्षापर्यंत. ■ सिनियर स्कॉलर्स- १ वर्षापर्यंत, चिनी भाषेचा अभ्यास १ वर्षापर्यंत,शिष्यवृत्ती २ वर्षापर्यंत.
**अधिसूचना प्रकाशित कालावधी:** फेब्रुवारी/मार्च
**शिष्यवृत्तींची संख्या:** ७०-८०, **अर्जाची पद्धत:** ऑनलाइन



**अर्हता:** ■ पदवी: १२ वी पर्यंत शिक्षण व २५ वर्षाच्या आतील. ■ पदव्युत्तर पदवी: पदवीधारक असून ३५ वर्षाच्या आतील. ■ डॉक्टरेट : अर्जदार पदव्युत्तर पदवीधारक असून ४० वर्षाच्या आतील ■ जनरल स्कॉलर्स: ४५ वर्षाच्या आतील व पदवीची किमान २ वर्षे. ■ सिनियर स्कॉलर्स- पदव्युत्तर पदवी किंवा असोसिएट प्रोफेसर व ५० वर्षाच्या आतील.
शैक्षणिक अर्हतेत किमान ६० टक्के गुण.
**इतर आवश्यक पात्रता:** अभ्यासक्रम सुरू होण्यापूर्वी किमान १ वर्षाचा चिनी भाषेचा अभ्यासक्रम.
**शिष्यवृत्तीची रक्कम:** ■ शैक्षणिक शुल्क, निवास. ■ पदवी /पदव्युत्तर पदवी सीएनवाय ७०० (रु.७२५२) ■ डॉक्टरेट : सीएनवाय १००० (रु.१०३६०) ■ स्टायपेंड (दरमहा) : पदवी सीएनवाय २५००(रु.२५९००) ■ पदव्युत्तर : सीएनवाय ३००० (रु.३१०८०) ■ डॉक्टरेट : सीएनवाय ३५०० (रु.३६२६०) **संभाव्य तारखा:** मुलाखतीसाठी निवडसूची- मार्च **मुलाखत -** एप्रिल **संपर्क:** मंत्रालयाच्या संकेतस्थळावर.
**निवड प्रक्रिया:** पात्र उमेदवारांची तज्ज्ञ समितीकडून मुलाखतीद्वारे निवड.

उमेदवारांची तज्ज्ञ समितीकडून मुलाखतीद्वारे निवड.

## दक्षिण कोरिया

**अभ्यासक्रमाचा स्तर:** पदव्युत्तर पदवी/डॉक्टरेट, **विषय/ क्षेत्र:** कोरियन भाषा, आंतरराष्ट्रीय संबंध, जैवतंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरींग, **कालावधी:** ■ पदव्युत्तर - ३ वर्षे (१ वर्ष कोरियन भाषाभ्यास) ■ डॉक्टरेट - ४ वर्ष (१ वर्ष कोरियन भाषाभ्यास)
**अधिसूचना प्रकाशित कालावधी:** फेब्रुवारी/मार्च, **शिष्यवृत्तींची संख्या:** ५-१०
**अर्जाची पद्धत:** ऑनलाइन
**अर्हता:** ■ वय संबंधित वर्षीच्या १ सप्टेंबरला अर्जदार ४० वर्षापेक्षा जास्त नसावा.
■ संबंधित वर्षीच्या ३१ ऑगस्टला पदवी किंवा पदव्युत्तर पदवी असावी.
**शिष्यवृत्तीची रक्कम:** संशोधन भत्ता २१०००० वोन (केआरडब्ल्यू) समाजशास्त्र विषयासाठी, २४०००० वोन (केआरडब्ल्यू) प्रति सत्र मेकॅनिक सायन्ससाठी, रिलोकेशसन, अलाऊन्स २००००० वोन (केआरडब्ल्यू), भाषा शिक्षण - मोफत, आरोग्य विमा २०००० वोन इ.
**संभाव्य तारखा:** मुलाखतीसाठी निवडसूची- मार्च, **संपर्क:** मंत्रालयाच्या संकेतस्थळावर.
**निवड प्रक्रिया:** पात्र उमेदवारांची तज्ज्ञ समितीकडून मुलाखतीद्वारे निवड.

## जपान

**अभ्यासक्रमाचा स्तर:** संशोधन/पदव्युत्तर /पीएच.डी., **विषय/ क्षेत्र:** जीवशास्त्र, राजशास्त्र / आंतरराष्ट्रीय संबंध, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल, अर्थशास्त्र, भौतिकशास्त्र, स्थापत्यशास्त्र, आर्किटेक्चर, फार्मसी, रोबोटिक्स, माहिती तंत्रज्ञान इ.
**कालावधी:** एप्रिल महिन्यापासून २ वर्षे किंवा ऑक्टोबर महिन्यापासून दीड वर्ष (अर्धा वर्ष जपानी भाषा शिक्षणासह)
**अधिसूचना प्रकाशित कालावधी:** फेब्रुवारी/मार्च, **अर्जाची पद्धत:** जपान माहिती केंद्र,जपान दुतावास,५० - जी, शांतीपथ, चाणक्यपूरी, नवी दिल्ली-११००२१ येथे थेट अर्ज करावे.
दूरध्वनी : ०११-४६१०४८६५
ई-मेल: jpemb.sinhand.mofa.go.jp
www.in.emb-japan.go.jp
**अर्हता:** ■ ३५ वर्षाखालील ■ संशोधन-पदव्युत्तरसाठी संबंधित विषयात किमान ६५ टक्के गुणांसह पदवी. ■ पीएच.डीसाठी संबंधित विषयात किमान ६५ टक्के गुणांसह पदवी., **शिष्यवृत्तीची रक्कम:** स्टायपेंड : १ ४३००० येन दरमहा (रु.८७०००/-) , जाण्यायेण्याचा खर्च, शैक्षणिक शुल्क
**संभाव्य तारखा:** मुलाखतीसाठी निवडसूची- १५ जून, **मुलाखत -** जूनचा शेवटचा आठवडा. **संपर्क:** http://www.in.emb-japan.go.jp/Education/Research_Student.html
**निवड प्रक्रिया:** पात्र उमेदवारांची जपान सरकारकडून निवड.

## इटली


**अभ्यासक्रमाचा स्तर:** उच्च शिक्षण/संशोधन प्रकल्प, **विषय/ क्षेत्र:** निश्चित नाही.
**कालावधी:** शिष्यवृत्ती कालावधी :

१/३/६/९ महिने
**अधिसूचना प्रकाशित कालावधी:** मार्च/एप्रिल, **शिष्यवृत्तींची संख्या:** निश्चित नाही. **अर्जाची पद्धत:** ऑनलाइन
**अर्हता:** वयः पदवी, पदव्युत्तर व स्पेशलायझेशनसाठी १८ ते ३५ वर्षे एक महिन्याच्या शिष्यवृत्तीसाठी ४५ वर्षांपर्यंत.
**इतर आवश्यक पात्रता:** इटालियन भाषेचे ज्ञान आवश्यक., **शिष्यवृत्तीची रक्कम:** शैक्षणिक शुल्क, आरोग्य विमा, **संभाव्य तारखा:** मुलाखतीसाठी निवडसूची– एप्रिल, मुलाखत – मे, **संपर्क:** इटली दुतावास, नवी दिल्ली. **निवड प्रक्रिया:** पात्र उमेदवारांची सरकारकडून निवड.

## मेक्सिको
**अभ्यासक्रमाचा स्तर:** व्हिजिटिंग प्रोफेसर, हाय लेवल कॉन्फरन्सेस, फाईन आर्ट फेलोशीप, मीडिया फेलोशीप.
**विषय/ क्षेत्र:** ऑनलाइन अर्जानुसार
**कालावधी:** ५ दिवस – १२ महिने (प्रत्येक अभ्यासक्रमाचा कालावधी घोषित केला जातो.) **अधिसूचना प्रकाशित कालावधी:** एप्रिल/मे, **अर्जाची पद्धत:** ऑनलाइन **अर्हता:** मेक्सिकन सरकारच्या यादीनुसार. **शिष्यवृत्तीची रक्कम:** येण्या–जाण्याचा खर्च, मासिक स्टायपेंड, स्थानिक प्रवास, वैद्यकीय विमा इ. **संपर्क:** मेक्सिकन सरकारच्या जाहिरातीनुसार
**निवड प्रक्रिया:** मेक्सिकन सरकारनुसार

## श्रीलंका (राष्ट्रपतींची शिष्यवृत्ती)
**अभ्यासक्रमाचा स्तर:** पदवी
**विषय/ क्षेत्र:** विषय घोषित केले जातील.
**कालावधी:** ३–४ वर्ष **अधिसूचना प्रकाशित कालावधी:** ऑगस्ट **अर्जाची पद्धत:** ऑनलाइन **अर्हता** : ■ वय : २५ वर्षाखालील ■ जीसीई परीक्षा किमान ६५ टक्के गुणांसह **शिष्यवृत्तीची रक्कम:** शैक्षणिक शुल्क, व्हिसा, सेटलमेंट अलाऊन्स एलकेआर १००००, निर्वाह भत्ता एलकेआर ३०,००० इ.
**संभाव्य तारखा:** मुलाखतीसाठी निवडसूची– सप्टेंबर, **मुलाखत** – सप्टेंबर
**संपर्क:** मंत्रालयाच्या संकेतस्थळावर
**निवड प्रक्रिया:** पात्र उमेदवारांची श्रीलंका सरकारकडून निवड.

## इस्त्रायल
**अभ्यासक्रमाचा स्तर:** संशोधन/ विशेषीकरण
**विषय/ क्षेत्र:** धर्मांचा तुलनात्मक अभ्यास, (मध्य पूर्व अभ्यास,हिब्रू भाषा आणि साहित्य, ज्यू लोकांचा इतिहास, कृषी, जीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान,अर्थशास्त्र, व्यवसाय


बेन गुरियान युनिव्हर्सिटी

व्यवस्थापन,मास कम्युनिकेशन, पर्यावरण शिक्षण आणि रसायनशास्त्र.
**कालावधी:** ८ महिने
**अधिसूचना प्रकाशित कालावधी:** सप्टेंबर/ऑक्टोबर
**शिष्यवृत्तींची संख्या:** ५–१०
**अर्जाची पद्धत:** ऑनलाइन
**अर्हता:** उच्चतम वयोमर्यादा नाही. कृषी, जीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान,अर्थशास्त्र, व्यवसाय व्यवस्थापन,मास कम्युनिकेशन, पर्यावरण शिक्षण आणि रसायनशास्त्र या शाखांसाठी पदव्युत्तर पदवी किमान ६० गुणांसह, उर्वरित विषयांसाठी किमान ५५ टक्के

हिब्रू भाषा व साहित्य पदव्युत्तर पदवी घेणारे अर्ज करू शकतात.
**इतर आवश्यक पात्रता:** इंग्रजी किंवा हिब्रू भाषा आवश्यक.
**शिष्यवृत्तीची रक्कम:** शैक्षणिक शुल्क, आरोग्य विमा, मासिक भत्ता इ.
**संभाव्य तारखा:** मुलाखतीसाठी निवडसूची– जानेवारी मुलाखत – फेब्रुवारी
**संपर्क:** मंत्रालयाच्या संकेतस्थळावर.
**निवड प्रक्रिया:** पात्र उमेदवारांची तज्ज्ञ समितीकडून मुलाखतीद्वारे निवड.

## मिस अगाथा हॅरिसन स्मृती फेलोशीप
**अभ्यासक्रमाचा स्तर:** जुनिअर रिसर्च फेलो
**विषय/क्षेत्र**: इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र
**कालावधी:** १ वर्ष (आवश्यकतेनुसार वाढीव एक वर्षापर्यंत)
**अधिसूचना प्रकाशित कालावधी:** जानेवारी. **अर्जाची पद्धत:** ऑनलाइन
**अर्हता:** वय : ३०ते ४० वर्षे ■ किमान ६० टक्के गुणांसह पदव्युत्तर पदवी व संबंधित विषयात पीएच. डी.

संबंधित विषयात पीएच. डी .पूर्ण झाल्यावर किमान ३ वर्षे पदवी किंवा पदव्युत्तर स्तरावरील अध्यापनाचा अनुभव
**शिष्यवृत्तीची रक्कम:** स्टायपेंड २२,०६३ पौंड ■ प्रवास भत्ता ८९० पौंड ■ भोजन २४०७ पौंड ■ हाय टेबल डिनर ६७९ पौंड ■ इतर प्रशासकीय खर्च ३९३०. ८५ पौंड ■ एकूण २९,९४४. ८५. पौंड ■ येण्या–जाण्याचे विमान प्रवास भाडे
**संभाव्य तारखा:** मुलाखतीसाठी निवडसूची– मार्च. **संपर्क:** मंत्रालयाच्या संकेतस्थळावर
**निवड प्रक्रिया:** पात्र उमेदवारांची सरकारकडून निवड.

या सर्व शिष्यवृत्तींशिवाय विविध राष्ट्रीयकृत तसेच खासगी बँकांच्या शैक्षणिक कर्जाच्या योजना आहेत. स्पर्धात्मक व्याजदर आणि आकर्षक योजना देणारे अनेक पर्याय आहेत. आपण सर्वोत्तम पर्याय निवडायचा आहे. उपलब्ध योजना, कर्ज रक्कम, संबंधित व्याजदर, प्रक्रिया शुल्क या सगळ्यांचा नीट अभ्यास करून योग्य तो निर्णय घेता येऊ शकेल. परदेशी उच्च शिक्षण घेण्यापूर्वी विविध विषयांच्या, देशांच्या शिष्यवृत्तीचा नीट अभ्यास करून नियोजनबद्ध पावले टाकल्यास परदेशी उच्च शिक्षणाचे स्वप्न सहज साकार होऊ शकते. (संकलन)

संपादक महाराष्ट्र अहेड ■■

**सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी आणि आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमाती संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती, शिक्षण प्रतिपूर्ती, निर्वाहभत्ता व वसतिगृह योजना राबवण्यात येत आहे. या योजनांचा लाभ घेऊन या दोन्ही संवर्गातील विद्यार्थी उत्तम व उत्कृष्ट शिक्षण घेऊ शकतात.**

# शिका आणि समर्थ व्हा...

**दत्तात्रय कोकरे / काशीबाई थोरात**

## अनुसूचित जाती संवर्ग

### शिक्षण व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती

**प्रमुख अटी :** विद्यार्थ्यांचे पालक महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असावेत. अशा विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व स्तरावरील मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती प्रमाणित दराने केली जाते.

खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १० वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती

विद्यार्थ्यांना द्यावयाचे दरमहा शिक्षण शुल्क + परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती (वर्षातून दहा महिने कालावधीसाठी) इयत्ता १ ली ते ४ थी रु.१०० दरमहा, इयत्ता ५ वी ते ७ वी रु.१५० दरमहा, इयत्ता ८ वी ते १० वी रु.२०० दरमहा.

### सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती

इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे.

संबधित शाळेचे मुख्याध्यापकांनी मुलींची यादी तयार करून संबधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे पाठवणे आवश्यक आहे.



**प्रमुख अटी:** उत्पन्न व गुणांची अट नाही, विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची आवश्यकता नाही. मात्र, शाळेने ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे

**लाभाचे स्वरूप:** इयत्ता ५ वी ते ७ वी दरमहा ६० रुपये (१० महिन्यांसाठी ६००), इयत्ता ८ वी ते १० वी दरमहा १०० रुपये (१० महिन्यांसाठी १०००)

### माध्यमिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

इयत्ता ५ वी ते ७ वी मधील दोन गुणवत्ता धारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तसेच इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते.

मागील वार्षिक परीक्षेत प्रत्येक इयत्तेत कमीत कमी ५०% गुण मिळवून प्रथम व द्वितीय क्रमांकावर उत्तीर्ण झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

**प्रमुख अटी:** मान्यताप्राप्त प्राथमिक/माध्यमिक शाळेतील इ. ५ वी ते १० वी च्या वर्गामध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी असावा, ही शिष्यवृत्ती मागील वार्षिक परीक्षेत कमीत-कमी ५०% व त्याहून अधिक गुण मिळवून मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून प्रथम व द्वितीय क्रमांकात उत्तीर्ण झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येते, या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट नाही. ही शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता नसते.

**लाभाचे स्वरूप:** इयत्ता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा ५० रुपये (५०० रुपये १० महिन्यासाठी), इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना दरमहा १०० रुपये (१००० रुपये १० महिन्यासाठी).

### ९वी ते १० वी साठी शिष्यवृत्ती

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी केंद्र शासनाने इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे.

**प्रमुख अटी :** ही योजना शासकीय मान्यताप्राप्त शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांस लागू राहील, विद्यार्थी हा अनु. जाती प्रवर्गातला असावा, विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा २ लाख रुपये, यामध्ये विद्यार्थ्यांच्या किमान गुणांची अट नाही, या योजनेंतर्गत विद्यार्थ्याने ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ केंद्राच्या इतर माध्यमिक पूर्व शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांना लागू राहणार नाही.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती ही योजना अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता ८ वी ते १० वी च्या सर्व मुलींसाठी सध्या सुरू आहे. यामध्ये पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा नाही. मात्र इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळू शकतो. मात्र, पालकांचे वार्षिक उत्पन्न २ लाख रुपये असावे.

त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता ८ वी च्या मुली आणि रुपये २ लक्षपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या इयत्ता ९ वी व १० वी च्या मुलींकरिता, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना यापुढे चालू राहील. मात्र एकाच लाभार्थ्यांस दोन्ही योजनेचा लाभ घेता येणार नाही.


**लाभाचे स्वरूप :** ● वसतिगृहात राहणारे – दरमहा ३५० रुपये (१० महिन्यासाठी), पुस्तके व तदर्थ अनुदान वार्षिक रु.१००० ● वसतिगृहात न राहणारे विद्यार्थी दरमहा १५० रुपये (१० महिन्यासाठी) पुस्तके व तदर्थ अनुदान वार्षिक रु. ७५० ● अपंग विद्यार्थ्यांसाठी दरमहा १६० रुपये ● मंदबुद्धी विद्यार्थ्यांकरिता दरमहा २४० रुपये.

## मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिक्षण संधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाने ही शिष्यवृत्ती योजना लागू केली आहे.

**प्रमुख अटी :** अस्वच्छ व्यवसायात काम करणारे, अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबधित सफाईगार, कातडी सोलणे, कातडी कमावणे, या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते, ही शिष्यवृत्ती सर्व जाती–धर्माला लागू आहे, उत्पन्नाची अट नाही, अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिंना ग्रामसेवक व सरपंच, नगरपालिका मुख्याधिकारी, महानगरपालिका आयुक्त / उपायुक्त / प्रभाग अधिकारी यांच्याकडून अस्वच्छ व्यवसाय करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच २० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर अस्वच्छ व्यवसायात काम करीत असल्याचे हमीपत्रक आवश्यक, अनु जाती मध्ये समावेश केलेल्या पालकांच्या पाल्यांसाठी जातीचा दाखला आवश्यक आहे, विद्यार्थी वसतिगृहात राहत असल्यास सबंधित अधिक्षकाचे प्रमाणपत्रक.

**लाभाचे स्वरूप :** ● इयत्ता १ ली ते २री च्या वसतिगृहात न राहणाऱ्या



विद्यार्थ्यांना दरमहा रु ११० व तदर्थ अनुदान रु. ७५० ● इयत्ता ३ री ते १० वी च्या वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रु ११० व तदर्थ अनुदान रु. ७५० ● इयत्ता ३ री ते १० वी च्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रु ७०० व तदर्थ अनुदान रु. १०००.

## सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळावा, सैन्यदलात भरती होण्याची विद्यार्थिदशेतच त्यांच्यात प्रेरणा निर्माण व्हावी, शिस्त, आत्मविश्वास, शौर्य, सांघिक वृत्ती, नेतृत्व, देशभक्ती इत्यादी गुणांची जोपासना होण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना ऑनलाइन सुरू केली आहे.

**प्रमुख अटी :** विद्यार्थी ५ वी ते १० वी मध्ये शिकत असलेला असावा, पालकाचे वार्षिक उत्पन्न २,५०,००० रुपयांपेक्षा जास्त नसावे. याव्यतिरिक्त इतर शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क मंजूर करणे तसेच केंद्र व राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शैक्षणिक योजनांचा लाभ घेण्यास पात्र राहणार नाही.

**लाभाचे स्वरूप :** नाशिक, पुणे, सातारा येथील सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, भोजन, निवास, कपडे, पॉकेट मनी इत्यादीवर होणाऱ्या संपूर्ण खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते, इतर मान्यताप्राप्त सैनिक शाळांना प्रतिविद्यार्थी प्रतिवर्षी १५,००० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्था

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देऊन त्यांना विविध क्षेत्रात व्यवसायिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना लागू करण्यात आलेली आहे.

**प्रमुख अटी :** विद्यार्थी मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकणारा असावा.

**लाभाचे स्वरूप :** संस्थेच्या वसतिगृहात राहणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण विभागाकडून दरमहा रु. ६० विद्यावेतन देण्यात येते त्या विद्यार्थ्यांना समाज कल्याण विभागाकडून दरमहा रु. ४० पूरक विद्यावेतन देण्यात येते. तंत्रशिक्षण विभागाकडून ज्यांना विद्यावेतन देण्यात येत नाही, त्यांना सामाजिक न्याय विभागाकडून दरमहा रु.१०० विद्यावेतन देण्यात येते.

## गुणवत्ता पुरस्कार

इयत्ता १० वी १२ वी च्या परीक्षेत विशेष उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान केले जातात.

**प्रमुख अटी व लाभ :** ● प्रत्येक बोर्डामधून प्रथम आलेल्या अनु. जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यास – रु. १ लाख रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र ● प्रत्येक विभागीय बोर्डाच्या गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या प्रत्येक अनु. जातीच्या विद्यार्थ्यास – रु. ५० हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र ● जिल्ह्यात प्रथम आलेल्या अनु. जातीच्या विद्यार्थ्यास – रु. २५ हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र ● तालुक्यात प्रथम आलेल्या अनु. जातीच्या विद्यार्थ्यास – रु.

१० हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
● प्रत्येक माध्यमिक विद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयामधून इ. १० वी व १२ वी परीक्षेत प्रथम आलेल्या अनु. जातीच्या विद्यार्थ्यास – रु. ५ हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.

### भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

**प्रमुख अटी :** विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे, विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व त्या पुढील शिक्षण घेत असलेला असावा, विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**लाभाचे स्वरूप :** विद्यार्थ्यास निर्वाह भत्ता व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबीवरील शुल्क प्रदान, दरमहा २३० ते ५५० रुपये या दराने निर्वाह भत्ता, वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दरमहा ३८० ते १२०० रुपये निर्वाह भत्ता.

### मॅट्रिकोत्तर शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन/उच्च शिक्षण घेता यावे, विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे.

योजना अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता, अचूकता, पारदर्शकता आणून विलंब टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षण व परीक्षा शुल्क योजना, ई–स्कॉलरशीप योजना २०११–१२ पासून ऑनलाइन सुरू करण्यात आली.

२०१८–१९ या वर्षापासून सर्व विभागांच्या शिष्यवृत्ती व फ्रीशिपच्या योजना या महा–डिबीटी पोर्टलवरून राबवण्यात येत आहेत. अर्जाच्या नोंदणीपासून ते शैक्षणिक लाभ अदा करण्यापर्यंतची संपूर्ण कार्यवाही या पोर्टलद्वारे ऑनलाइन करण्यात येत आहे.

यामध्ये विद्यार्थ्यांना देय होणारी निर्वाह भत्त्याची रक्कम तसेच महाविद्यालयाची शिक्षण शुल्काची रक्कम पोर्टलवरील विद्यार्थ्यांच्या वॅलेटवर जमा करण्यात येते व त्यापैकी शिक्षण शुल्काची रक्कम विद्यार्थ्यांकडून वॅलेटवरील रिडीम बटन दाबून महाविद्यालयास अदा केली जाते.

**प्रमुख अटी :** विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाखापेक्षा जास्त असावे. विद्यार्थी शालांत परीक्षोत्तर व पुढील शिक्षण घेत असलेला असावा. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**लाभाचे स्वरूप :** शालांत परीक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या अनु. जातीच्या विद्यार्थ्यांना त्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व जिल्हा स्तरावरील मान्यता प्राप्त मॅट्रिकोत्तर शैक्षणिक अभ्यास क्रमासाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर विहित केलेले शुल्क देण्यात येते.

### परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पीएच.डी. अभ्यासक्रमाकरिता प्रवेश मिळाला आहे, अशा ७५ विद्यार्थ्यांना (पीएच. डी.–२८ व पदव्युत्तर पदवी–४७) परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. ही योजना २००३–०४ पासून सुरू करण्यात आलेली आहे.

**प्रमुख अटी :** विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. विद्यार्थ्याचे वय पदव्युत्तर पदवीकरिता ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे व पीएच.डी.करिता वय ४० पेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ६ लाखापेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्याने परदेशातील लेटेस्ट क्युएस टॉप ३०० वर्ल्ड रँकिंग विद्यापीठात प्रवेश घेतलेला असावा. परदेशातील विद्यापीठ हे मान्यताप्राप्त विद्यापीठ असावे. क्युएस टॉप १०० वर्ल्ड रँकिंगमध्ये प्रवेश मिळालेल्या परदेशी विद्यापीठांमध्ये तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न मर्यादा लागू राहणार नाही.

अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शासनामार्फत खर्च करण्यात आलेली संपूर्ण रक्कम संबंधित विद्यार्थ्याचे पालक व जामीनदार यांच्याकडून वसूल केली जाईल अशा अर्थाचे बंधपत्र पालक व जामीनदार यांनी निवडीनंतर देणे बंधनकारक आहे.

अनु.जातीच्या विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत पीएच.डी. अभ्यासक्रमाचा कालावधी कमाल ४ वर्ष किंवा यापेक्षा कमी असलेला प्रत्यक्ष कालावधी तसेच पदव्युत्तर पदवीकरिता कमाल २ वर्षे किंवा यापेक्षा कमी असलेला प्रत्यक्ष कालावधी ग्राह्य धरावा.

**लाभाचे स्वरूप :** विद्यापीठाने प्रमाणित केलेले शिक्षण शुल्काची पूर्ण रक्कम व इतर खर्च मंजूर करण्यात येतो. विद्यार्थ्यास



वार्षिक निर्वाहभत्ता अमेरिका व इतर राष्ट्रासाठी अमेरिकन डॉलर १५४०० तर ग्रेट ब्रिटनसाठी पौंड ९९०० इतका अदा करण्यात येतो. विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी अमेरिका व इतर देशांसाठी अमेरिकन १५०० व ग्रेट ब्रिटनसाठी पौंड ११०० इतके देण्यात येतात. पुस्तके, अभ्यासदौरा इत्यादी खर्चाचा यात समावेश आहे. विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम संपल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च तिकीट सादर केल्यानंतर मंजूर करण्यात येतो.

### स्वतंत्र औद्योगिक प्रशिक्षण संस्था

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील उमेदवारांकरिता कमी जागा राखीव




असतात. यासाठी प्रत्येक विभागीय स्तरावर अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यासाठी उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आली आहे. प्रवेशितांना मोफत निवास, भोजन व व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण इ. ची सुविधा दिली जाते. राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त असलेले एकूण १२ व्यावसायिक अभ्यासक्रम यात समाविष्ट आहेत.

## शासकीय वसतिगृहे योजना

अनुसूचित जाती मुलामुलींसाठी २७१ जुनी शासकीय वसतिगृहे, १०३ नवीन शासकीय वसतिगृहे व विभागीयस्तरावरील १००० विद्यार्थी क्षमतेची ७ वसतिगृहे अशी एकूण ३८१ शासकीय वसतिगृहे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मुलींकरिता नवीन ५० वसतिगृहे तर नोकरी करीत असलेल्या महिलांकरिता मुंबई, पुणे व नागपूर येथे तीन वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. विभागांतर्गत अशी एकूण ४३४ शासकीय वसतिगृहे आहेत.

या वसतिगृहांपैकी तालुका व जिल्हास्तरावरील वसतिगृहांमध्ये इयत्ता आठवी ते दहावी, अकरावी ते बारावी तसेच व्यावसायिक/बिगर व्यावसायिक विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. विभागीय स्तरावरील वसतिगृहांमध्ये अकरावी ते बारावी तसेच व्यावसायिक / बिगर व्यावसायिक विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो.

## सुविधा

● विद्यार्थ्यांसाठी जेवण ● निर्वाह भत्ता दरमहा – विभागीयस्तर –रू. ८००, जिल्हास्तर –रू. ६००, तालुकास्तर – रू.५०० ● मुलींना स्वच्छता प्रसाधनासाठी अतिरिक्त रू. १०० दरमहा देण्यात येतात. ● स्नेहसंमेलनासाठी प्रतिशासकीय वसतिगृह प्रतिवर्षी रू. २५००० ● क्रीडा वस्तू प्रतिवसतिगृह रू. १०००० ● ४० ते ५० इंच रंगीत टिव्ही प्रतिवसतिगृह रु. १०००० ● प्रत्येक वसतिगृहात ॲक्वागार्ड व वॉटरकूलर, फायर फायटिंग सुविधा पुरवण्यात येते. ● १० विद्यार्थ्यांमागे एक संगणक प्रिंटर व इंटरनेट सुविधेसह ● वर्षातून दोन वेळा पेस्ट कंट्रोल. ● ग्रंथालय सुसज्ज करण्यासाठी प्रतिवसतिगृह रू.२ लाख प्रतिवर्षी ● वसतिगृहात पालक सभा आयोजित करण्यासाठी रू.१०००० प्रतिवर्षी, प्रतिवसतिगृह.

## राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती

एकविसाव्या शतकामध्ये यशस्वी होण्यास अनु. जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे कौशल्य व ज्ञान उपलब्ध व्हावे व त्यांची स्पर्धात्मक युगामध्ये जडणघडण व्हावी याकरिता देशातील उत्तमोत्तम शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश मिळालेल्या अनु. जाती व नवबौद्ध घटकांतील १०० विद्यार्थ्यांना मोफत उच्च शिक्षण देण्यासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. अनुसूचित जाती / नवबौद्ध विद्यार्थ्यांना एन. आय. टी., आय. आय. टी., आय. आय.एम. या सारख्या देश पातळीवरील संस्थांमध्ये शिक्षण घेण्याची संधी मिळावी या उद्देशाने ही योजना २००३–०४ पासून सुरू करण्यात आली आहे.

**प्रमुख अटी :** विद्यार्थी अनुसूचित जाती/ नवबौद्ध व महाराष्ट्राचा रहिवासी असावा. विद्यार्थी पालकांचे सर्व मार्गांनी वार्षिक उत्पन्न रु. ६ लाख पर्यंत असावे. या योजनेसाठी महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या देशातील २०० नामांकित शैक्षणिक संस्थेत प्रवेशित असावा.

**लाभाचे स्वरूप :** संस्थेने आकारणी केलेले शैक्षणिक शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्काची प्रतिपूर्ती, तसेच क्रमिक पुस्तके व शैक्षणिक साहित्य यांच्या खर्चासाठी प्रतिवर्षी रु. १०,०००.

## शासकीय निवासी शाळा

प्रत्येक तालुक्यात एक शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या ८९ शासकीय निवासी शाळा सुरू आहेत. या निवासी शाळेमध्ये इयत्ता सहावी ते दहावीपर्यंतच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलामुलींना प्रवेश दिला जातो.

## स्वाधार योजना

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांनी स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट उपलब्ध करण्यासाठी शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केली आहे.

वरील सर्व शिष्यवृत्ती व वसतिगृहांचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी व पालकांनी संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याशी संपर्क करावा.

## अनुसूचित जमाती संवर्ग

### पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना

इयत्ता पहिली ते दहावी या वर्गात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्याकरिता सुवर्णमहोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येते

**अर्हता –** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये (जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका) शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनसाठी ही योजना लागू आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.१ लाख ८ हजार पेक्षा कमी असावे. शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, आदिवासी विभागाकडून निधी देण्यात येत असलेल्या सैनिकी शाळा व देण्यात येते. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेण्यासाठी आदिवासी विभागाकडून मंजूर केली जाणारी पोस्ट मॅट्रिकोत्तर स्कॉलरशीप, शिक्षण व परीक्षा शुल्क लाभ ऑनलाइन प्रणालीद्वारे देण्यासाठी https://mahadbtmahait.gov.in हे संकेतस्थळ सुरू करण्यात आले.

**लाभार्थ्यांसाठीची अर्हता**

● विद्यार्थ्याने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा. ● विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा कमी असावे. ● विद्यार्थी इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेणारा नसावा. ● दुरस्थ शिक्षण पद्धतीतील अभ्यासक्रमांना लागू राहील.

**सुधारित निर्वाहभत्ता :** विद्यार्थ्यांना I, II, III, IV या चार गटात निर्वाहभत्ता योजनेंतर्गत संबंधित वर्षात शिक्षण शुल्क समिती/प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण व परीक्षा शुल्काची १००% प्रतिपूर्ती करण्यात येते.

**लाभार्थ्यांसाठीची अर्हता –**

● याकरिता उत्पन्न मर्यादेची अट नाही. ● अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकरिता सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू राहील. ● आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाकरिता सामायिक प्रवेश परीक्षेद्वारा प्रवेश घेतलेले, खासगी विनाअनुदानित महाविद्यालयाच्या वतीने तसेच खासगी संस्थांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे आणि इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारे काही अभ्यासक्रमांकरिता (उदा. नर्सिंग) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू. ● आरक्षणाचा



इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळामधील विद्यार्थ्यांना ही योजना लागू नाही.

**शिष्यवृत्तीचा वार्षिक दर प्रती विद्यार्थी**

इयत्ता १ ली ते ४ थी १,००० रुपये,
इयत्ता ५ वी ते ७ वी १५०० रुपये,
इयत्ता ८ वी ते १० वी २,००० रुपये,

### भारत सरकार पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती

इयत्ता दहावी पासून पुढे उच्च शिक्षणाचा लाभ गरजू विद्यार्थ्यांना घेता यावा या उद्देशाने केंद्र शासनाच्या या योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक सूचनांप्रमाणे मासिक देय दराने निर्वाह भत्ता आणि शिक्षण आणि परीक्षा शुल्क ही रक्कम देण्यात येतो. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मासिक निर्वाहभत्ता अनुक्रमे १२००, ८२०, ५७० आणि ३८० रुपये देण्यात येतो. तर वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मासिक निर्वाहभत्ता अनुक्रमे ५५०, ३३०, ३०० आणि २३० रुपये देण्यात येतो.

### शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती योजना

शासनमान्यता प्राप्त खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती योजना सुरू करण्यात आली आहे. या लाभ न घेता, गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू. ● एक किंवा दोन विषयांमध्ये अनुत्तीर्ण होऊन ए.टी.के.टी.द्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही लाभ घेता येईल. ● कृषी व संलग्न अभ्यासक्रमांसाठी सी.ई.टी. घेत नसल्यास इयत्ता १२ वी च्या गुणांच्या आधारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लागू. ● व्यवस्थापन कोट्यातील विद्यार्थी तसेच अभिमत विद्यापीठात प्रवेशित विद्यार्थी यांना अनुज्ञेय नाही.

### दिव्यांगांना शिष्यवृत्ती व वाहतूक भत्ता

अनूसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यास दरमहा ५०० रुपयेप्रमाणे १० महिन्यांकरिता

रुपये ५०००/- इतकी शिष्यवृत्ती व दरमहा १०० रुपये प्रमाणे १० महिन्यांकरिता रू.१००० इतका वाहतूक भत्ता दिला जातो.

**लाभार्थ्यांसाठी अर्हता-**
इयत्ता ८ वी ते १२ वी मध्ये मान्यता प्राप्त शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणारा व शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेला अनुसूचित जमातीचा विद्यार्थी असावा. विद्यार्थ्याचे अपंगत्व किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे. त्याकरिता जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.
विद्यार्थ्याची हजेरी ७० टक्के पेक्षा कमी नसावी.

## विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता

वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र इ. व्यावसायिक



अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत वसतिगृहात व वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त रक्कम या योजनेद्वारे दिली जाते.

**लाभार्थ्यांसाठीची अर्हता-**

विद्यार्थी व्यावसायिक पाठ्यक्रमात प्रवेशित असावा. विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्तीधारक असावा. भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेस जी उत्पन्न मर्यादा लागू आहे, तीच मर्यादा या योजनेस लागू राहील. स्थानिक विद्यार्थी किंवा स्वत:च्या घरी राहणारा विद्यार्थ्यांस ही योजना लागू नाही. महाविद्यालयाच्या वसतिगृहात किंवा आदिवासी विभागाच्या शासकीय वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय होत नसल्यास तसे प्रमाणपत्र वसतिगृह अधीक्षकांकडून प्राप्त करून घेणे आवश्यक राहील.

## नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत शिक्षण घेता यावे यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. दरवर्षी २५,००० विद्यार्थ्यांना नामांकित निवासी शाळेत प्रवेश देण्यात येतो. पालकाच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा रु.१ लाख इतकी असावी. या योजनेंतर्गत इयत्ता १ ली व २ री च्या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. संबंधित शाळांकडून योजनेंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना आहार, निवास, आवश्यक शैक्षणिक साहित्य मोफत पुरवण्यात येते व त्याबदल्यात संबंधित शाळांना शासनामार्फत निर्धारित केलेले शुल्क अदा करण्यात येते.

## शासकीय वसतिगृह योजना

अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना त्यांच्या गावाबाहेर राहून उच्च शिक्षण घेण सुलभ व्हावे, याकरिता विभागामार्फत विभागीय स्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर आणि ग्रामीणस्तरावर शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. वसतिगृहांमध्ये इ.८ वी पासून पुढील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येतो. प्रवेशित विद्यार्थ्यास निवास, आहार, आवश्यक शैक्षणिक साहित्य इत्यादी सोयी सुविधा मोफत पुरविण्यात येतात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी किंवा अधिक माहिती या संकेतस्थळ :-http://swayam.mahaonline.gov.in यावर उपलब्ध आहे शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वस्तुस्वरूपात मिळणारे लाभ तसेच आहारभत्ता रोख स्वरूपात लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा केली जाते.

## साहित्यासाठी थेट लाभ

सर्व स्तरावरील शासकीय आदिवासी वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून सतरंजी, चादर, बेडशीट, उशी व उशी कव्हर, ब्लँकेट, वह्या व अभ्यासक्रमासाठी आवश्यक इतर शैक्षणिक साहित्य, क्रमिक पुस्तके /संदर्भ पुस्तके, छत्री या बाबी वस्तुस्वरुपात देण्याऐवजी त्याकरिता विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांक संलग्नित बँक खात्यामध्ये रोख रक्कम थेट जमा करण्यात येत आहे.

महानगरपालिका, विभागीय व जिल्हास्तरावरील शासकीय वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना आहाराकरिता आवश्यक रक्कम आधार क्रमांक संलग्नित बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते

## स्वयम् योजना

२०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून विभागाच्या कार्यान्वित शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या एकूण २०,००० विद्यार्थीसंख्येच्या मर्यादेत, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता भोजन,निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्याबाबत, पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम् योजना सुरू करण्यात आलेली आहे.

२०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून तालुकास्तरावरील इ.१२ वी नंतरच्या मान्यताप्राप्त तंत्र शिक्षण तसेच व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या परंतु शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत लाभ देण्यास सुरुवात झाली आहे. आदिम जमातीच्या व अनुसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ प्राथम्याने देण्यात येतो. यासाठी अर्ज करण्यासाठी http://swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सर्व माहिती उपलब्ध आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**नागरी सेवेत दाखल होण्यासाठी परीक्षेची माहिती असणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षेतून सुयोग्य उमेदवाराची निवड व्हावी या उद्देशाने भारतीय संविधान अनुच्छेद ३१५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे. राज्यसेवेतील नेमणुकीसाठी परीक्षा घेणे हे आयोगाचे प्रमुख कार्य आहे. यासाठी आयोगामार्फत स्पर्धापरीक्षा आणि सरळसेवा परीक्षा या माध्यमातून विविध पदांच्या परीक्षा घेतल्या जातात.**

# अशा आहेत राज्यसेवा...

**सुनील अवताडे**

लोकसेवा आयोगाची कामे संविधानाच्या अनुच्छेद ३२० अन्वये विहित करण्यात आली आहेत. आयोगाच्या कक्षातील विविध पदांकरिता स्पर्धा परीक्षा आयोजित करणे, शासनाला सेवा विषयक बाबींसंदर्भात वेळोवेळी सल्ला देणे इत्यादी स्वरुपाची कामे आयोगामार्फत हाताळली जातात.

लोकसेवा आयोगामार्फत विविध पदावरील भरती प्रक्रिया तीन पद्धतीने राबवण्यात येते.



(१) स्पर्धा परीक्षा, (२) अनुभव आणि / अथवा विशिष्ट शैक्षणिक अर्हता आवश्यक असणाऱ्या पदांसाठी राबवण्यात येणारी सरळसेवा भरती, (३) फक्त शासनाच्या संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांना वरिष्ठ पदावर पदोन्नती/नियुक्तीसाठी घेण्यात येणारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा – उदा. सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा, पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा इत्यादी.

## राज्यसेवा परीक्षा

राज्य शासनाच्या सेवेतील राजपत्रित गट–अ आणि ब संवर्गातील खालील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार या परीक्षेच्या माध्यमातून भरली जातात.

**गट–अ :** उपजिल्हाधिकारी, पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, सहायक राज्य कर आयुक्त, उपनिबंधक (सहकारी संस्था), उपमुख्य कार्यकारी / गटविकास अधिकारी (उच्चश्रेणी), सहायक संचालक (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा), मुख्याधिकारी, नगरपालिका / परिषद, अधीक्षक (राज्य उत्पादन शुल्क), शिक्षणाधिकारी (महाराष्ट्र शिक्षण सेवा, प्रशासन शाखा), उपसंचालक / प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) (श्रेणी एक), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प) (श्रेणी दोन) / सहायक आयुक्त (उद्योग) उपसंचालक (तांत्रिक), तहसीलदार, सहायक संचालक (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता).

**गट–ब :** उपशिक्षणाधिकारी (महाराष्ट्र शिक्षण सेवा, प्रशासन शाखा), सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, लेखा अधिकारी (महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा), कक्ष अधिकारी, सहायक गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद, सहायक निबंधक (सहकारी संस्था), उप अधीक्षक (भूमी अभिलेख), उप अधीक्षक (राज्य उत्पादन शुल्क), सहायक आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क) कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता – मार्गदर्शन अधिकारी, उद्योग अधिकारी, तांत्रिक, सहायक प्रकल्प अधिकारी / सांख्यिकी अधिकारी / प्रशासकीय अधिकारी / संशोधन अधिकारी / गृह प्रमुख / प्रबंधक, नायब तहसीलदार.

**परीक्षेचे टप्पे :** तीन, (एक) पूर्वपरीक्षा – ४०० गुण, (दोन) मुख्यपरीक्षा – ८०० गुण, (तीन) मुलाखत–१०० गुण.

**शैक्षणिक पात्रता :** सहायक संचालक आणि लेखाधिकारी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, उद्योग उपसंचालक (तांत्रिक)

### अशा आहेत परीक्षा

**परीक्षेचे नाव–संवर्ग/पदे खालीलप्रमाणे :**

- राज्य सेवा परीक्षा –विविध विभागातील २८ संवर्गाची पदे
- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट–ब संयुक्त परीक्षा–३
- दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा–न्यायिक सेवा
- सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षा–१
- महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा–३
- महाराष्ट्र वन सेवा परीक्षा–२
- महाराष्ट्र गट–क सेवा संयुक्त परीक्षा–३
- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा संयुक्त परीक्षा–५

तसेच उद्योगअधिकारी (तांत्रिक) ही पदे वगळून इतर पदांसाठी मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतूल्य म्हणून मान्य केलेली विहित अर्हता.

### सहायक संचालक आणि लेखाधिकारी

सांविधानिक विद्यापीठाची, किमान ५५ टक्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा

- इन्स्टिट्यूट ऑफ चार्टड अकाऊंट्स ऑफ इंडिया यांनी घेतलेली सनदी लेखापालची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा
- इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट ॲण्ड वर्क्स अकांऊटस यांनी आयोजित केलेली परिव्यय लेखा शास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा
- सांविधानिक विद्यापीठाची वाणिज्य मधील पदव्युतर पदवी, किंवा
- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता प्राप्त संस्थेमधून वित्त व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञते सह पदवी (एम.बी.ए)

**सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी :** पदाकरिता भौतिक शास्त्र व गणित या विषयांसह विज्ञान अथवा अभियांत्रिकी या शाखेतील पदवी.

**उद्योग उपसंचालक (तांत्रिक), तसेच उद्योग अधिकारी (तांत्रिक) :**

सांविधानिक विद्यापीठाची अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील पदवी किंवा विज्ञानशाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी.

**शारीरिक अर्हता :**

**सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट ब – पुरुष उमेदवारांकरिता –**

- उंची – १६३ सें.मी. (अनवाणी)
- छाती – न फुगविता ७९ से.मी.
- फुगवण्याची क्षमता – किमान ५ से.मी. आवश्यक,
- चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी असावी आणि रंगांधळेपणा नसावा.

**महिला उमेदवारांकरिता –**

- उंची – १६३ सें.मी. (अनवाणी)
- चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी असावी आणि रंगांधळेपणा नसावा.



### पोलीस उपअधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, गट अ

- **पुरुष उमेदवारांकरिता**
- (१) उंची – १६५ सें.मी. (अनवाणी)
- (२) छाती – न फुगविता ८४ सें.मी.,
- (३) फुगविण्याची क्षमता – किमान ५ सें.मी. आवश्यक
- **महिला उमेदवारांकरिता** – उंची – १५७ सें.मी. (अनवाणी)

### उप अधिक्षक, गट–ब राज्य उत्पादन शुल्क

- **पुरुष उमेदवारांकरिता–** (१) उंची – १६५ सें.मी. (अनवाणी)
- (२) छाती – न फुगविता ७९ सें.मी.,
- (३) फुगविण्याची क्षमता – किमान ५ सें.मी. आवश्यक
- **महिला उमेदवारांकरिता–**उंची – १५५ सें.मी. (अनवाणी)

### अराजपत्रित गट–ब परीक्षा

राज्य शासनाच्या सेवेतील सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक या तीन संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार या परीक्षेमधून भरण्यात येतात.

या तिन्ही संवर्गातील भरतीकरिता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येते. संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरून, अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडून ते यांपैकी एक, दोन किंवा तिन्ही पदांसाठी बसू इच्छितात की काय, याबाबत विकल्प (ऑप्शन) घेण्यात येतो. संबंधित पदाकरिता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित पद भरतीकरिता अर्ज समजण्यात येतो. संयुक्त पूर्व परीक्षेस अर्ज करताना दिलेला विकल्प तसेच, भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, संबंधित पदाच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करून सामाईक पूर्व

परीक्षेच्या आधारे तिन्ही पदांकरिता स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येतो. संयुक्त पूर्वपरीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित पदाकरिता घेण्यात येणाऱ्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येते. तिन्ही पदांकरिता मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक एक समाईक असतो व या पेपरची परीक्षा एकाच दिवशी एकत्र घेण्यात येते. मुख्य परीक्षेचा पेपर क्रमांक दोन मात्र संबंधित पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन स्वतंत्रपणे घेण्यात येते. पोलीस उपनिरीक्षक पदावरील निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या मुख्य परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेले किमान किंवा अधिक गुण मिळवणारे उमेदवार शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरतात. शारीरिक चाचणीमध्ये किमान ५० गुण मिळवणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतात.

**अर्हता :** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने विहित केलेली समतूल्य अर्हता.

पोलीस उपनिरीक्षक पदासाठी विकल्प नमूद करणाऱ्या उमेदवारांकडे उपरोक्त शैक्षणिक अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक अर्हता असणे आवश्यक आहे.

**पुरुष –**
- उंची – १६५ सें. मी. (अनवाणी),
- छाती – न फुगवता ७९ सें.मी.,
- फुगवण्याची क्षमता किमान ५ सें.मी. आवश्यक

**महिला –** उंची – १५७ सें.मी. (अनवाणी)

## सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षा

परिवहन विभागाच्या अखत्यारीतील सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट–क संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार या परीक्षेमधून भरण्यात येतात.

**परीक्षेचे टप्पे– दोन**

**अर्हता :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी) किंवा महाराष्ट्र शासनाने एस.एस.सी च्या समतूल्य म्हणून घोषित केलेली अर्हता, आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर स्वयंचल अभियांत्रिकी (ऑटोमोबाइल इंजिनिअरिंग) किंवा यंत्र अभियांत्रिकी (मेकॅनिकल इंजिनिअरिंग) विषयातील किमान तीन वर्षाची पदविका वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली अर्हता. (क्रमश:)

**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

## दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी

राज्य शासनाच्या न्यायिक सेवेतील दिवाणी, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार तसेच पदांच्या उपलब्धतेनुसार या परीक्षेमधून भरण्यात येतात.

परीक्षेचे टप्पे– तीन, पूर्व परीक्षा १००–गुण. (२) मुख्य परीक्षा–२०० गुण. (३) मुलाखत–५० गुण.

**अर्हता : वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता यांच्याकरिता**

- जाहिरात/अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या दिनांकास वय २१ वर्षांपेक्षा कमी व ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.
- जाहिरात/अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या दिनांकास विधी शाखेतील पदवी आणि मुंबई उच्च न्यायालयातील किंवा त्यास दुय्यम असलेल्या न्यायालयातील विहित दिनांकास वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता म्हणून किमान ३ वर्षांचा वकिली व्यवसायाचा अनुभव.
- पब्लिक प्रॉसिक्युटर या पदावरील महाराष्ट्रातील सेवा न्यायालयीन व्यवसाय म्हणून समजली जाईल. किंवा



**नवीन विधी पदवीधरांकरिता**

- जाहिरात/अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या दिनांकास वय २१ वर्षांपेक्षा कमी व २५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.
- विधी शाखेतील पदवी. ही पदवी प्राप्त करण्यासाठी घेण्यात येणारी प्रत्येक परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
- विधी पदवीचे अंतिम वर्ष किंवा विधिमधील पदव्युत्तर पदवीचे अंतिम वर्ष (एलएलएम) किमान ५५% इतक्या गुणांनी विहित दिनांकास किंवा त्यापूर्वी उत्तीर्ण असणे आवश्यक

किंवा उच्च न्यायालयाच्या सेवा कर्मचारी वर्गाचे (मिनिस्ट्रियल स्टाफ) सदस्य, उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयाच्या सेवा कर्मचारी वर्गाचे (मिनिस्ट्रियल स्टाफ) सदस्य, मंत्रालयाच्या विधी व न्याय विभागाच्या विधी विभागामध्ये विधी सहायक आणि त्यापेक्षा उच्च पदावर काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाचे सदस्य, उच्च न्यायालय, शहर दिवाणी न्यायालय आणि जिल्हा न्यायालये यामधील सरकारी वकीलांच्या कार्यालयातील सेवा कर्मचारी वर्गाचे (मिनिस्ट्रियल स्टाफ) सदस्य यांच्याकरिता

- जाहिरात/अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या दिनांकास वय २१ वर्षांपेक्षा कमी व ४५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.
- विधी पदवी प्राप्तीनंतर जाहिरात/अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या दिनांकास किमान तीन वर्षांची सेवा झालेली असणे आवश्यक.
- मराठी भाषा उत्तम रीतीने बोलता, वाचता, लिहिता येणे आवश्यक.
- मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र उमेदवाराजवळ असणे आवश्यक.
- (पाच) मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येण आवश्यक आहे.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व गृह राज्यमंत्री दीपक केसरकर यांच्यासमवेत 'मुख्यमंत्री फेलोशीप कार्यक्रम २०१८'चे मुख्यमंत्री फेलो.

**मुख्यमंत्री फेलोशीप कार्यक्रमाची रूपरेषा आखताना हा विचार होता की, प्रशासनात युवा पिढीचा सहभाग वाढवून त्यांच्या सकारात्मक ऊर्जेचा उपयोग राज्याच्या विकासासाठी करण्यात यावा. ही चळवळ आहे सर्वांना पुढे घेऊन जाण्याची, आपल्यातल्या 'स्व'त्वाला ओळखण्याची. अशीच उमेद बाळगून असणाऱ्या युवापिढीसाठी मुख्यमंत्री फेलोशीप कार्यक्रम २०१९, सज्ज झाला आहे.**

# महाराष्ट्राला पुढे नेणारे अभियान

**डॉ. मयूर मुंढे**

जीवनात प्रगतीसाठी आवश्यकता असते ती संधीची. अशी संधी जी तुम्हाला उपलब्धता करून देते समाजात योग्य बदल घडवण्याची, समाजाप्रति तुमचे कर्तव्य बजावण्याची व या बदलाचा साक्षीदार होण्याची. ही संधी मिळते मुख्यमंत्री फेलोशीप या कार्यक्रमातून.

मुख्यमंत्री फेलोशीपच्या चाळणी प्रवेश प्रक्रियेचा टप्पा पार करून मुलाखत होतात. मुलाखतीमध्ये तुमची सामाजाप्रतिची बांधिलकी, संघभावनेने काम करण्याची वृत्ती व सकारात्मक दृष्टिकोन यांची प्रामुख्याने पडताळणी होते. एकूण गुणांनुसार निवड होऊन मंत्रालयातील विविध विभागांमध्ये काम करण्याची संधी मिळते.

आदिवासी विकास विभाग, मंत्रालय मुंबई येथे माझी नेमणूक करण्यात आली. यादरम्यान दंतवैद्यक शास्त्रात माझी पदवी असल्याने व एकंदरच माझा कल पाहता 'व्यापक तंबाखू नियंत्रण' कार्यक्रमाच्या समन्वयाची जवाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली. मात्र, प्रत्यक्ष विभागात रुजु झाल्यानंतर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकरिता आखण्यात येणाऱ्या आरोग्यासाठीच्या अनेक योजनांवर काम करण्याची संधी मिळाली. विभागाच्या प्रधान सचिव मनीषा वर्मा यांनी पहिल्या भेटीमध्ये आरोग्य सेवेबरोबरच इतर बाबींमध्येही लक्ष घालण्यास सुचविले. आदिवासी विकास विभाग शिक्षण, आरोग्य, बांधकाम, विकास इत्यादी शाखांचा यात समावेश आहे. म्हणूनच या विभागातील नियुक्ती, मला अनुभवाने संपन्न होण्यासाठी एक पर्वणीच ठरली.

### योजनेची यशस्विता

प्रमुख जवाबदारी होती योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीची. योजनेच्या धोरणांचा आराखडा तयार होत असताना विविध शक्यतांचा विचार करून तो आखल्याने अंमलबजावणीच्या टप्प्यातील अडथळे कमी होत गेले. इमर्जन्सी रिस्पॉन्स सेंटरच्या माध्यमातून समस्या त्वरित आमच्यापर्यंत पोहोचतात. तातडीने, आवश्यक व योग्य निर्णय घेण्याची मुभा असल्याने समस्यांचे निराकरण करणे सोपे जाते.

विद्यार्थ्यांच्या आरोग्य स्थितीचा अद्ययावत माहितीसाठा नियमित उपलब्ध राहावा, प्राथमिक उपचारांकरिता मार्गदर्शक प्रणाली उपलब्ध असावी व उपचारांकरिता संदर्भ सेवा याकरिता जाणीवपूर्वक 'डिजी हेल्थ प्रणाली' निर्माण करण्यात आली.

डॅशबोर्डच्या माध्यमातून आजाराच्या गंभीरतेचे वर्गीकरण शक्य झाले. क्षेत्रीय अधिकारी असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विविध रुग्णालयात गंभीर स्वरूपाच्या आजारांपासून विद्यार्थ्यांना वाचवण्यात यशस्वी ठरत आहोत.

आदिवासी विकास प्रकल्प धारणी येथे काम पाहताना २० शासकीय आश्रमशाळांचा भौतिक कायापालट घडवून आणण्यात यश आले. या शाळांमध्ये मूलभूत सोयीसुविधांचा दर्जा वाढला असून विद्यार्थ्यांचे राहणीमान उंचावत आहे. मेळघाटातल्या भौगोलिक परीस्थितीशी संघर्ष करून तेथे शैक्षणिक कायापालट घडवून आणण्याचा प्रयत्न करत देऊन जाते. या सर्व भेटींमधून काम करण्याकरिता प्रेरणा मिळते.

## कार्यक्रम २०१९

उमेदीच्या काळात आपली ऊर्जा योग्य ठिकाणी लावून राज्यशासनाच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकासाठी सेवा करण्याची संधी मिळते. असे अनेक फेलो

## अटल आरोग्य वाहिनी

विभागामध्ये आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आजाराचे व मृत्यूचे प्रमाण कमी होण्याकरिता विविध योजनांची आखणी युद्ध पातळीवर सुरू होती. या प्रक्रियेमध्ये 'मुख्यमंत्री फेलो' म्हणून थेट सहभाग मिळाला. महाराष्ट्राच्या अतिदुर्गम भागामध्ये स्थित असणाऱ्या शासकीय आश्रमशाळांमध्ये तातडीची वैद्यकीय सेवा पुरवण्याचा विभागाचा मानस होता. याकरिता सुसज्ज रुग्णवाहिका व डॉक्टरांच्या माध्यमातून एकात्मिक वैद्यकीय सेवा पुरवण्याचे निश्चित झाले. सचिवालयात नकाशाच्या आधारावर एकूण शाळांचे ४८ समूह (क्लस्टर्स) निर्मिले. प्रत्यक्षात ते नियोजनाअन्वये परिणामकारक ठरतील का हे तपासण्यासाठी आदिवासीबहुल जिल्ह्यांचा दौरा केला.



या दौऱ्यादरम्यान आवश्यक त्या ठिकाणी भौगोलिक परिस्थितीनुसार समूहांमध्ये बदल करण्याचे अधिकार प्राप्त होते.

योजनेच्या यशस्वितेची दूरदृष्टी ठेवून योग्य बदल करण्यात आले. आता वेळ आली होती ती योजनेचे नामकरण करण्याची. राज्याच्या जनतेस सेवा पुरवणाऱ्या या योजनेचे नाव, जनतेनेच ठरवावे या उद्देशाने 'नाव घोषवाक्य सूचवा' स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. यातूनच 'अटल आरोग्यवाहिनी – आदिवासी जीवनदायिनी' हे नाव योजनेस प्राप्त झाले. २२ नोव्हेंबर २०१८ रोजी विधान भवनाच्या प्रांगणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ४८ रुग्णवाहिकांच्या लोकार्पणाचा सोहळा पार पडला.

## समृद्ध अनुभव

भारतीय प्रशासकीय सेवेत, फेलोंच्या वयाइतकीच सेवा बजावलेले अधिकारी मेंटॉर (मार्गदर्शक) म्हणून लाभतात. त्यांच्यासोबत राहून प्रशासकीय कामकाजाचा अनुभव घेणे म्हणजे मोठी पर्वणीच असते. गंभीर अडचणीचा प्रसंग सोडवताना विविध दृष्टिकोनातून विचार करून परिस्थितीनुरूप योग्य निर्णय घेण्याची सचोटी, प्रसारमाध्यमांशी बोलताना पाळायचे शिष्टाचार, सहकाऱ्यांची बलस्थाने ओळखून काम करून घेण्याची पद्धती अशा अनेक वैशिष्ट्यातून समृद्ध होता येते.

कायापालट अभियान राबवत असताना याचा खूप फायदा झाला. एकात्मिक आहोत. फेलोशीपच्या कालावधीमध्ये विविध टप्प्यांत सात दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येते. हे प्रशिक्षण अविस्मरणीय अनुभव व आठवणींची शिदोरी ठरते. सहकारी फेलोना जाणून घेत हा प्रवास सुरू होतो. यामध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांशी वार्तालाप, प्रत्यक्ष मुख्यमंत्र्यांशी संवाद, प्रकल्प भेटी, विधानभवन भेटीदरम्यान कायदा पारित होण्याची प्रक्रिया जाणून घेणे इत्यादींचा समावेश असतो. राज्यपाल यांनी मुख कर्करोगाच्या प्रतिबंधात्मक योजनेसंदर्भात रस दाखवून त्याबद्दल माहिती घेतली. मुख्य सचिवांची भेट फेलोशीपच्या पुढच्या वाटचालीस दिशा

राज्याच्या कानाकोपऱ्यांत आपले कर्तव्य बजावत आहेत. ही चळवळ आहे सर्वांना पुढे घेऊन जाण्याची, आपल्यातल्या 'स्व'त्वाला ओळखण्याची. अशीच उमेद बाळगून असणाऱ्या युवापिढीसाठी मुख्यमंत्री फेलोशीप कार्यक्रम २०१९ सज्ज झाला आहे. ३० मे ते १४ जून २०१९ दरम्यान तुम्हाला त्यासाठी अर्ज करता येईल. प्रवेश प्रक्रियेसंबंधी अधिक माहिती https://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**मुख्यमंत्री फेलो**



# संघ लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) नागरी सेवा परीक्षेत (२०१८) उज्ज्वल यश

## बार्टीच्या यशस्वी उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन!





(AIR -25)
वैभव सुनील गोंडाणे


(AIR -401)
वाघमारे वैभव दसु


(AIR-437)
गायत्री देविदास हायलिंगे


(AIR-444)
सचिन प्रकाश पवार


(AIR-447)
अर्चना पंढरीनाथ वानखेडे


(AIR-673)
सुबोध रमेश मानकर


(AIR-684)
विशाल बाबुराव देवके


(AIR-693)
शुभम प्रकाश नागराळे


(AIR-710)
निवडंगे श्वेता शंकरराव


(AIR-718)
विश्वजीत गजानन चिमणकर


(AIR-721)
डॉ.तेजस रमाकांत माहिरे


(AIR-757)
ज्योतीलाल सहदेव शेट


श्री. जीवन मोहन दगडे (AIR-56)
(भारतीय वनसेवा अधिकारी वर्ग–१) (IFS)


श्री. हर्षराज दिनकरराव वाठोरे (AIR-77)
(भारतीय वनसेवा अधिकारी वर्ग) (IFS)


श्री. पियुष अशोक गायकवाड (AIR-85)
(भारतीय वनसेवा अधिकारी वर्ग) (IFS)


श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

## आपल्या भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा !

**श्री. राजकुमार बडोले**
मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग


**श्री. दिलीप कांबळे**
राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

barti

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month


## देशातील सर्वाधिक खपाचे मासिक




सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

अधिकृत आणि अचूक माहिती

'एबीसी'ने उमटवली अधिकृत मोहोर

# लोकराज्य (मराठी)

# ५,१७,०६८

वनिता (मल्याळम)
३,७३,६२४

मल्याळम मनोरमा (मल्याळम)
२,६१,१६६

अन्नदाता (तेलुगू)
३,१८,६२९

गृहलक्ष्मी (हिंदी)
३,००,९१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR


प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० 001

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० 0३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह